
सुधीर कारखानीस
पुष्पगंध

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# पुष्पगंध

लघुकथा संग्रह

सुधीर कारखानीस

# पुष्पगंध

**लेखक: सुधीर कारखानीस**

ए 902 एकता मेडोज

सिद्धार्थ नगर, मागाठणे

बोरीवली ईस्ट, मुंबई 400066

मोबाइल 9223298186

ई मेल sudhirkarkhanis@yahoo.com

**मुखपृष्ठ- सुधीर कारखानीस**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,

ईटर्निटी,

ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन : ३० मे २०२४

©esahity Pratishthan®2024

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## लेखक परिचय :

# सुधीर कारखानीस



शिक्षण व अनुभव

शालेय शिक्षण एच डी हायस्कूल सोलापूर

एंजिनीरिंग ग्रॅजुएट पुना एंजिनीरिंग कॉलेज, पुणे, महाराष्ट्र

पावर सेक्टर मध्ये सुमारे 50 वर्षांचा उच्च पदस्थ अनुभव

टाटा पावर कंपनी, एल अँड टी, महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

लेखन

अनेक तंत्रज्ञानविषयक पेपर व दोन तंत्रज्ञानविषयक पुस्तके प्रकाशित

मराठी लघुकथा संग्रह “प्रतिबिंब”, “तरंग”, “गगन भरारी” व “फुलोरा” प्रकाशित

स्टोरी मिरर मध्ये नियमित ललित कथा लेखन

लघुकथामध्ये शहरी शिक्षित मध्यम वर्गाच्या जीवनाचे आणि तसेच विदेशात राहणाऱ्या भारतीयांच्या जीवनचर्येचेही दर्शन श्री सुधीर कारखानीस यांनी त्यांच्या खुमासदार आणि मनोरंजक शैलीत केलेले आढळून येते.

# अर्पणपत्रिका

मोठ्या धैर्याने आणि हसतमुखाने मोठी झेप घेऊन परदेशात पोहोचलेले आणि तेथे उच्च शिक्षण घेऊन गेली अनेक वर्षे आपआपल्या व्यवसायात अत्यंत यशस्वी रीतीने कार्यरत असलेले माझे दोन जावई,

श्री सुनीत लोहतिया, सान फ्रन्सिस्को-कॅलिफोर्निया

आणि

श्री शंतनू देव, डल्लास – टेक्सास

यांना हा लघुकथा संग्रह सहर्ष अर्पण.

# लेखकाचे मनोगत

गुलाबाला सुगंध असतो. गुलाबाला काटेही असतात. गुलाबाच्या सुगंधाने चित्तवृत्ती उल्हसित होतात. गुलाबाच्या पाकळयांची रचना, रंगांच्या विविध छटा मनाला मोहवून जातात. पण हे सर्व कधी, जेव्हा गुलाबाच्या देठावरच्या काट्यांपासून, त्याच्या काटेरी पानांपासून आपल्याला इजा न होऊ देण्याची खबरदारी घेतली गेली तरच. मला असं वाटतं की परदेशात, विशेषत: अमेरिकेत स्थलांतरित झालेल्या उच्च शिक्षित भारतीय अमेरिकन मंडळींची हीच अवस्था आहे.

नवीन वातावरणाशी जुळवून घेण्याचं अवघड काम लहानापासून मोठ्यांपर्यंत, स्थलांतरित कुटुंबातल्या प्रत्येक घटकाला करावं लागतं. अर्धे आयुष्य भारतात घालवल्यानंतर एकाएकी संपूर्णपणे वेगळ्या देशात, वेगळ्या परिसरात, जीवनाची पुनर्रचना करायची, वाटचाल करायची, या वाटेवर असलेले अनेक हितशत्रू, नैसर्गिक संकटं, प्रोफेशनल चॅलेंजेस याना सामना द्यायचा, घरात समतोल कुटुंबाची रचना करायची आणि यशस्वी व्हायचं हे सोपं नाही आणि कुटुंबातील तसंच कुटुंबाशी संलग्न प्रत्येक घटकाचं त्यात योगदान असावे लागते.

आणि म्हणूनच, वेगळी हवा, वेगळी माणसं, वेगळ्या प्रथा-पध्दती या सर्वांना व्यवस्थित पणे तोंड देत, यशाचे मनोरे चढत जाणाऱ्या आपल्या स्थलांतरित देश बांधवांचं कौतुक करावं तितकं थोडं आहे. हे जीवन जवळून पाहण्याच्या मिळालेल्या संधीमुळे मला जाणवलेल्या विविध अनुभूती मी माझ्या “गगनभरारी”

या कथासंग्रहाद्वरे आणि आत्ता “पुष्पगंध” द्वारे वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे.

ही कथा झाली स्थलांतरित झालेल्या पहिल्या पिढीची, त्यांच्या आंबट गोड आठवणींची. हीच यशोगाथा या दोन कथा संग्रहांमधून वाचकांसमोर आणली आहे.

स्थलांतरित कुटुंबांच्या पुढच्या पिढ्यांची चॅलेंजेस आणखी वेगळी असतील, त्यांची सुख दु:ख वेगळी, दोन अतिशय वेगळ्या संस्कृतींमधला समतोल राखत पुढे जाण्यासाठी केलेली तारेवरची कसरत वेगळी. यामधून निर्माण होणारं खुसखुशीत कथा साहित्य आणखीच वेगळं असेल आणि आत्ता नाही पण कालपरत्वे तेही आपल्या समोर येईल, आपलं मनोरंजन करील अशी आशा आहे.

…सुधीर कारखानीस

# प्रस्तावना

श्री सुधीर कारखानीस (वडील बंधू - "दादा". यापुढील संबोधन "लेखक") यांचा "पुष्पगंध" हा ई_बुक्स वर प्रकाशित होणारा चौथा लघुकथा संग्रह आहे. लेखकाच्या गगनभरारी या कथासंग्रहामधे, परदेश निवासी भारतीयांच्या जीवनातले बारीक सारिक कंगोरे टिपून, त्यावरून लघुकथेची बांधणी करण्याचे लेखकाचे कौशल्य आपण पाहिले आहेच. हेच कौशल्य, हीच लेखनाची पद्धत पुष्पगंध या लघुकथा संग्रहातही जाणवते. या लघुकथा संग्रहातील चार लघुकथा अमेरिकेतल्या डल्लास, टेक्सास येथील पार्श्वभूमीवर लिहिल्या आहेत. माझे स्वत:चे वास्तव्य अमेरिकेत डल्लास भागातच असल्याने या लघुकथा संग्रहाची प्रस्तावना लिहिण्याची संधी मिळणे ही माझ्या दृष्टीने एक पर्वणीच आहे.

लेखकाची ओघवती भाषा, डल्लास भोवतीच्या प्लेनो आणि फ्रिस्कोमधल्या माझा परिचित परिसर, तिथले वेगवेगळे आवाज, लघुकथांमधे रेखाटलेल्या मराठी स्थलांतरित भारतीयांच्या व्यक्तीरेखा, त्यांच्या हालचालीतले लहान सहान बारकावे, तिथल्या रोजच्या आयुष्यात घडणाऱ्या घटना आणि त्यांचे परिणाम, यांच्या अचुक वर्णनामुळे या कथा मला इतक्या जिवंत वाटल्या की माझ्या नकळत मी त्या कथानकांमधे मिसळून गेले. आणि कथांमधील पात्रांशी येथे माझ्या आजुबाजूला वावरणाऱ्या व्यक्तींबरोबरचे साधर्म्य मला स्पष्ट दिसू लागले. त्यांच्या मनातल्या विचारांचे तरंग आणि त्यांपासून निर्माण होणाऱ्या लाटा मला आपल्याच वाटू लागल्या.

भारतीय मनुष्य जगाच्या पाठीवर कोठेही असो, त्याची विचारसरणी आणि मानसिक अवस्था बदलत नाहीत. 'मनात आलं आणि करून टाकलं', ही आपली वागण्याची रीतच नसते. आपले मूलभूत संस्कार आपल्याला या चाकोरीच्या बाहेर जाऊच देत नाहीत. हे आपल्या संस्कृतीचे बळ आहे आणि हेच वास्तव या लघुकथांमधून प्रतीत झाले आहे.

‘धुक्यातील पायवाट’ या कथेत लेखकाने मैत्रीच्या विविध अवस्था, त्यांचे रंग, स्थित्यंतरे खूपच बारकाव्याने दाखवले आहेत.

‘शंभर वर्षांची लीज’ या कथेत लेखकाने दाखवलेले भावा बहिणीतील भावनांचे हेलकावे स्पष्ट जाणवतात आणि लेखकाची अचुक शब्दरचना आपल्याला विचार करायला भाग पाडते. कथेतील व्यक्तींच्या विचारांचे वारे आपल्याही मनात घुमत राहतात, घोळत राहतात आणि कधी अस्वस्थही करतात, या अवस्थांमधून प्रश्नचिह्नही निर्माण करतात आणि आपोआपच आपल्या मनाला उत्तर शोधायला प्रवृत्त करतात. पात्रांच्या शारिरिक अविर्भावांतून लेखकाने प्रकट केलेले विचार अप्रतिमच आहेत.

एखाद्या स्वच्छ ऊन पडलेल्या दिवशी अचानक काळे ढग येऊन, विजा चमकून वादळ येतं, मन घाबरं होतं आणि वादळ ओसरल्यावर सर्व काही शांत होतं, अशी अवस्था ‘देवाचे आभार’ या कथेत छान जमून गेली आहे.

संथ पाण्याच्या प्रवाहात हळुवार तरंगत जाणारी नाव अचानक हेंदकळावी आणि परत संथ सरकत काठाला लागावी, असा अनुभव ‘चौथा टप्पा’ ही कथा देऊन जाते.

‘कोळशाची भट्टी’ तर छानच जमून गेली आहे. ‘अळूची पातळ भाजी’ तर आपल्याच जेवणातली वाटली.

एक गोष्ट प्रामुख्याने सांगावीशी वाटते, आणि ती म्हणजे, प्रत्येक कथा वाचताना, पुढे काय होईल याची उत्कंठा वाचकाला लागून राहते, आणि यातच या कथासंग्रहाचं यश सामावलेलं आहे.

लेखकाने यशाच्या याच वाटेवर पुढे चालत रहावे हीच शुभेच्छा.

——-सुजाता देशमूख,
टेक्सास, युनायटेड स्टेट्स

# अनुक्रमणिका


| क्र | कथा शीर्षक | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| १ | धुक्यातली पायवाट | १ |
| २ | शंभर वर्षांची लीज | २७ |
| ३ | देवाचे आभार | ४१ |
| ४ | चौथा टप्पा | ५७ |
| ५ | कोळशाचा रंग काळा | ७० |
| ६ | अळूची पातळ भाजी | ८६ |

# धुक्यातली पायवाट

अमेरिकेतल्या, डल्लास, (टेक्सास) च्या शांत उपनगरातील वसंत वेलणकरच्या ऐसपैस बंगलीची लिव्हिंग रूम. सोफ्यावर बसून एक नीटनेटक्या कपड्यातला इसम हातातल्या आय पॅडवर काही मजकूर टाईप करत होता.

छाया कॉफीचा ट्रे घेऊन किचन मधून लिव्हिंग रूम मधे आली, छायाची चाहूल लागताच सोफ्यावर बसलेल्या इसमाने नजर वर उचलली, आणि···आणि मोठा भूकंपच जणू झाला. छायाच्या हातातला ट्रे थरथरला, कपातली कॉफी जोरात हेंदकाळली. इसमही थरारला आणि त्याच्या हातातलं आय पॅड खाली पडलं.

वसंता वेलणकर त्यावेळी लिव्हिंग रूम मध्ये नव्हता. तो आतल्या स्टडी रूम मधे लॅपटॉप आणायला गेला होता. त्यामुळे, त्याला हा भूकंप जाणवला नाही

छाया सावरली. तिने कॉफीचा ट्रे मधल्या टीपॉयवर ठेवला.

सोफ्यावरच्या माणसाला तिने विचारलं, "प्रभाकर, तू? मग ए. पी. रामचंद्र कुठे आहे?".

सोफ्यावरचा इसम आतापर्यंत बराचसा सावरलेला होता. खाली पडलेलं आय पॅड त्याने उचललं आणि म्हणाला, "छाया, मी बंगलोरचा ए. पी. रामचंद्र. मुंबईतला भूतपूर्व, प्रभाकर रामचंद्र अय्यर. माझ्या नव्या पासपोर्टवर अय्यर प्रभाकर रामचंद्र असं नाव रजिस्टर्ड झालंय. म्हणून आता ए पी रामचंद्र लावतो झालं. ऑल राउंड कन्व्हीनिअन्स".

छायाने कॉफीचे कप, कूकीजच्या बशा ट्रेमधून काढून टेबलावर ठेवल्या. “घे. कॉफी, गरम आहे. वसंताला चालते कोमट ”.

यावर काही उत्तर येण्याच्या आधी छाया वळली आणि आत निघून गेली.

वसंता लॅपटॉप आणि एक फाईल घेऊन बाहेर आला. “ओ वेल, हिअर इज कॉफी”! वसंता उद्गारला.

“सर, मला मराठी चांगलं येतं. मुंबईत होतो मी काही दिवस. आपण मराठीत बोलू शकतो.” ए. पी. रामचंद्र म्हणाला आणि मग प्रॉजेक्टवर चर्चा मराठी -इंग्लीश-हिंदी भाषांमधे सुरू झाली.

किचन मधुन गॅरेजकडे जाणारा दरवाजा उघडण्याचा आवाज आला, मग गॅरेजचं मुख्य गेट उघडण्याच्या इलेक्ट्रिकल ड्राईव्ह चा आवाज आला. कार बाहेर पडल्याचा आवाज आणि गॅरेजचं इलेक्ट्रिकल गेट बंद झाल्याचा आवाज. मग परत शांतता.

“एक डान्स प्रोग्रॅम आहे जवळच फ्रिस्कोमधे. इवनिंग शो, आणि निमंत्रितांना डिनर. विमलआत्या बरोबर तिकडे गेली आहे ती.” गरज नसतानाही स्पष्टीकरण देत वसंत पुढे म्हणाला, “इथलं ड्रायव्हिंग लायसेन्स नाही नं तिच्याकडे त्यामुळे विमलआत्याच तिला सगळीकडे नेते, आणते. आत्यालाही बरं, कार्यक्रम बघायला मिळतात. डान्समधे मात्र नैपुण्य आहे हं हिचं. अगदी तज्ञ.”

संभाषणाची गाडी परत कामाकडे वळली. सुमारे अर्ध्या तासांनंतर पाहुण्याने मागवलेली उबर टॅक्सी आली आणि तो निघुन गेला.

a

वसंता आपल्या स्टडी रूममधे गेला, मोठ्या कॅाम्प्युटरवर ऑफिशिअल आय डी ने लॉग इन केलं. दीड तास त्याने काम केलं. रात्रीचे नऊ वाजले होते. ऑफिशिअल आय डी लॉग ऑफ केला. पोटाला भूक लागली होती. वसंताने फ्रीज मधून चिकन करी आणि एक भाजी काढली. मायक्रोवेव्ह ओव्हनमधे गरम केली, रोटीमॅटिक मधून दोन तीन रोट्या बनवून घेतल्या आणि स्वत:चं टेबल सेट केलं. जेवण करून घेतलं.

पंधरा मिनिटात जेवण उरकलं. वसंताने डिशेस साफ केल्या, विसळल्या आणि नंतर त्या डिश वॉशरमधे मधे रचून, वसंता आपले हात पेपर नॅपकिनला पुसून फॅमिली रूम मधे आला. फ्रीज मधून बशीमधे चीजचे दोन तुकडे काढले आणि व्हाइट वाइनचा ग्लास घेऊन तो टी व्ही समोर बसला. टी व्ही लावला आणि वाइनचे सिप घेत, टी व्ही पहात, तो छायाची वाट पहात बसला.

रात्री दहाच्या सुमारास गॅरेज दरवाज्याच्या इलेक्ट्रीकल ड्राइव्हचा आवाज आला. गॅरेजच्या किचनच्या दरवाजातून छाया आणि विमलआत्या आत आल्या आणि तडक वर गेल्या. वरच्या बाथरूम मधून पाण्याचे आवाज येत होते. छाया तिच्या बेडरूम मधे गेली आणि बाहेरचे कपडे काढून तिने घरातला गाऊन घातला आणि मग ती फॅमिली रूममधे आली. विमलआत्या काही खाली आली नाही. “दमायला झालंय”, असं म्हणत ती झोपायला गेली.

वसंताने वाईनचा ग्लास अर्धा भरून छायाच्या हातात दिला.

डान्स समारंभाच्या गप्पा सुरू झाल्या. कार्यक्रम तसा बरा होता पण छायाच्या मते त्यात आणखी नेटकेपणा आणता आला असता. तशा सूचनाही तिने स्थानिक नृत्य निर्देशिकेला दिल्याही.

a

“इथे माझा स्वत:चा ट्रूप असता तर करूनच दाखवलं असतं”! छाया म्हणत होती.

वसंताने ऐकले न ऐकल्यासारखे केले. मनात म्हणाला, “अमेरिका पटलेली दिसते”

“चला, बराच उशीर झाला”. असे म्हणत वसंत झोपायला उठला आणि त्याच्या मास्टर बेडरूमकडे गेला. छायाही पाठोपाठ उठली. छोटा जिना चढून तिच्या वरच्या गेस्टरूम कडे गेली.

सकाळी नेहमीपेक्षा लवकरच छाया उठली. आत्याला सुरेशकडे म्हणजे तिच्या मुलाकडे जायचं होतं. ऑफिस मधे जाता जाता वसंता तिला सुरेश दादाकडे सोडणार होता. तिची निघण्याची तयारी चालली होती. त्यामुळे सकाळच्या चहापाण्यापासून सगळ्याच गोष्टी छायाला बघायला लागणार होत्या.

व्यायाम, योगा वगैरे जरा लवकरच आटोपून छाया ब्रेकफास्टच्या तयारी मागे लागली होती. वसंता उठल्यानंतर टॉयलेट, आंघोळ झाल्यावर, पूर्ण तयार होऊनच साडे सातच्या सुमारास बाहेर येत असे. आजही वसंता त्याच सुमाराला तयार होऊन, ब्रिफ केस घेऊन बाहेर डायनिंग रूम मधे आला. विमलआत्याही तयार होउन आणि तिची आटोपशीर बॅग घेउन खाली आली. वसंताला ब्रेक फास्ट देऊन मग आवराआवर करायला छाया किचनमधे गेली. विमलआत्याने स्वत:ला कॉफी करून घेतली आणि फॅमिली रूममधे आपला कप घेउन ती गेली.

तेवढ्यात वसंताचा मोबाइल वाजला. नंतर दबक्या आवाजात वसंता कुणाशीतरी बोलत असल्याचं छायाने ऐकलं. हल्ली हल्ली दोन तीनदा तिने वसंताला दबक्या आवाजात फोनवर बोलताना ऐकलं होतं पण स्पष्ट काहीच ऐकू आलं नव्हतं. आज मात्र वसंताचे शेवटचे वाक्य स्पष्टपणे तिने ऐकले, “छायाला कळू देऊ नका”.

मला कळू द्यायचं नाही! एक थंड शिरशिरी छायाच्या अंगातून गेली. मोठ्या कष्टाने तिने डायनिंग रूम मधे जाऊन वसंताला जाब विचारण्याचा मोह टाळला. कोणाशी बोलत असेल तो? आज प्रभाकर इथे कसा उपटला होता आणि तेही भलत्याच नावाने! पण प्रभाकरही तिला इथे पाहून चकित झाल्यासारखा वाटला. विचारावं का वसंताला प्रभाकरच्या इथल्या येण्याबद्दल? एक ना दोन असंख्य प्रश्न.

वसंता आणि विमलआत्या बाहेर पडले. आत्याला सोडुन वसंता पुढे ऑफिसमधे जाणार होता. इथे प्लेनोमधेच त्याचं ऑफिस होतं. मॉल एरियाच्या जवळ. पंधरा वीस मिनिटांच्या ड्राइव्ह वर. विमलआत्याला सोडल्यावर वसंताने इंडिपेन्डन्स पार्कवे ने गाडी घेतली. मॅक्डरमॉट रोडच्या कोपऱ्यावरच्या विस्तीर्ण रघुनाथ टेंपल जवळ गाडीचा वेग त्याने कमी केला आणि दोन्ही हात जोडून गाडीतून देवाला नमस्कार केला. “यशस्वी कर देवा” त्याने देवाची प्रार्थना केली.

घरी छाया उदासपणे बसली होती. मनात विचारांचे आणि आठवणींचे तांडव सुरु होते. पुणे विद्यापिठाची नृत्य विशारद पदवीधर, तेही उच्च मेरिटमधे पास झालेली. मुंबईत हळू हळू ती नाव कमावत होती. महान नृत्य दिग्दर्शक गुरू

रामप्रसादनी तिला आपल्या पंखाखाली घेतलं होतं. त्यांच्या हाताखाली ती बरंच काही शिकत होती, आत्मसात करत होती.

बिर्ला मातोश्री सभागृहातला वार्षिक कार्यक्रम नुकताच संपला होता. स्टेजच्या मागे चाहत्यांनी बरीच गर्दी केली होती. गुरु रामप्रसादांवर अभिनंदनाचा वर्षाव होत होता. काही वेळाने गर्दी बऱ्याच प्रमाणात ओसरली आणि काही मोजकीच मंडळी तिथे राहिली होती. छाया तिथेच घुटमळत होती, काही बाही आवराआवर करत होती.

“गुरुजी, आपल्या ट्रूपचं चंद्रदीप नृत्य फारच छान झालं हं! आपण स्वत:च त्याचं निर्देशन केलं असणार.” एक प्रसन्न चेहऱ्याचा, सावळ्या रंगाचा तरूण गृहस्थ मोठ्या प्रेमाने गुरुजीं बरोबर बोलत होता.

गुरुजी हसून म्हणाले, “नाही रे प्रभाकर, मला कुठला एवढा वेळ? ते सांघिक नृत्य आमच्या छायाने बसवलं होतं. आवडलं ना सर्वांना? छाया म्हणजे खणखणीत बंदा रुपया आहे आमचा.”

गुरुजींनी छायाची आणि प्रभाकरची ओळख करून दिली.

ओळखीचे रूपांतर मैत्रीत व्हायला वेळ वागला नाही. प्रभाकर सॉफ्टवेअर इंजिनिअर होता आणि भारतीय नृत्य प्रकारांचीही त्याला बऱ्यापैकी माहिती होती. गुरू रामप्रसादांच्या सर्व कार्यक्रमांना तो हजर असायचा. छायाने निर्देशित केलेले कार्यक्रम लक्षपूर्वक पहायचा, अभिप्राय द्यायचा. हळू हळू प्रत्येक कार्यक्रमाला छाया प्रभाकरची आतुरतेने वाट पहायला लागली. कधी कधी कार्यक्रम संपवल्यावर वेळ मिळेल तसं कॅाफी कार्यक्रम किंवा फास्ट फूड कार्यक्रम व्हायला लागले. छायाला यातून चांगलं रिलॅक्सेशन मिळायला लागलं.

a

अशाच मैत्रीमधे सहा महिने गेले. रात्री घरी आल्यावर छाया विचार करायची. व्हॉट आर वी? गुड फ्रेंड्स. वी आर जस्ट गुड फ्रेंन्डस्. बस्स .दॅटस् ऑल! याच्या पुढे तर गाडी सरकतच नव्हती.

छायाच्या ट्रूपचे शो संपले होते आणि नवीन कार्यक्रमाच्या तालमी सुरू झाल्या होत्या. त्यातून छाया सहा वाजेपर्यंत मोकळी व्हायची आणि मग फारसं न रेंगाळता घरी जायची. प्रभाकरच्या भेटी गाठी त्यामुळे बऱ्याच कमी झाल्या होत्या. छायाच्या ट्रूपच्या जरी पुढच्या मालिके साठी तालमी चालू होत्या तरी मालिनी, रेखा, शामला या गुरुजींच्या इतर निर्देशिकांचे, पब्लिक शो आलटून पालटून चालू होतेच. आणि एका रविवारी संध्याकाळी जरा उशीराच, मालिनीला प्रभाकरबरोबर फास्ट फूड जॉइंटवर हसत खिदळत वडा पाव खाताना छायाने पाहिलं.

छायाची खात्री झाली की मालिनीही प्रभाकरच्या ‘‘जस्ट गुड फ्रेंडस्’’ लिस्ट वर असणार आणि सध्या चालू असलेले मालिनीच्या ट्रूपचे शो, प्रभाकर तशाच अभ्यासकाच्या दृष्टीने पहात असणार, अभिप्राय देत असणार.

प्रभाकरनेही दुरुन छायाला पाहिले. हात हलवून हॅलो केले. छाया मैत्रिणींबरोबर आपल्या वाटेने निघून गेली.

छायाचं मन विषण्ण झालं होतं. कधी तिला वाटायचं की आपणच नुसत्या साध्या मैत्रीच्या पायावर उंच मनोरे बांधायला नको होते. छायाचं मन कशातही रमेना. गुरु राम प्रसादजींच्या स्टुडिओ मधे जाणे, इतर निर्देशिकांबरोबर हसत खेळत गप्पा मारणे कठीण झाले होते.

a

शेवटी छायाने गुरूजींचा निरोप घ्यायचं ठरवलं. पण मग करायचं काय? इतर दिग्गज नृत्य दिग्दर्शक पायघड्या घालून बोलावतील इतपत तिची कीर्ती अजून पसरली नव्हती.

तरीपण शेवटी छायाने गुरुजींची नोकरी सोडली, वरळीची खोलीही सोडली. पुण्याला घरी जाऊन बसण्यात काही अर्थ नव्हता. मालाडच्या लीलामावशीला छायाने फोन केला. मावशी एकटीच होती. तिने उत्साहाने छायाला मालाडला येऊन तिच्याबरोबर रहाण्याचं आमंत्रण दिलं.

योगायोग असा की लीलामावशी ज्या कांदिवलीच्या उच्चभ्रू शाळेत उप मुख्याध्यापिका होती त्या शाळेला वार्षिक समारंभाचे कार्यक्रम बसवण्यासाठी कुशल निर्देशिकेची जरूर होती. शाळेने आनंदाने छायाचं स्वागत केलं. लहान मोठ्या मुलां मुलींबरोबर छाया रमली , आजूबाजूच्या वातावरणातला फरक तिला टॉनिक सारखा लागू पडला. आणि घरी मजेदार गप्पा मारायला मावशी तर होतीच.

आणि मावशीकडेच तिला वसंत भेटला. लीलामावशीच्या दिवंगत पतीच्या धाकट्या भावाचा, म्हणजे अशोकचा मित्र तो. वसंत पेशाने प्रोफेशनल मॅनेजर आणि उद्योजक, अमेरिकेत टेक्सास मधे राहणारा. तिथे काही कॉम्प्युटर तंत्रज्ञांच्या सहाय्याने एक नवीन कंपनी त्याने सुरु केली होती म्हणे आणि ऑफ शोअर टीम्स जमवायला, डीलर्सशी नेटवर्कींग करायला वारंवार भारतात यायला लागायचं त्याला.

अशोकच्या मनात त्याच्या लीलावहिनीबदद्ल खूपच आदर होता. लीलावहिनीकडे त्याचं बरंच येणं जाणं असायचं. अशाच एका दिवशी हा त्याचा अमेरिकेचा जिगरी दोस्त वसंताही त्याच्याबरोबर लीलावहिनींकडे आला होता.

a

"वहिनी, हा माझा जिगरी दोस्त वसंत वेलणकर, अमेरिकेत असतो". अशोकने ओळख करून दिली.

"ये, बस." लीला वहिनीनी आगतस्वागत केलं. "झेवियरला माझी एक विमल वेलणकर मैत्रिण होती. लॅमिंग्टन रोडला रहायची". लीला वहिनी म्हणाल्या. "तुमच्या पैकी कोणी आहे का"?

वसंताने मिनिटभर विचार केला आणि त्याचा चेहरा खुलला. हसत हसत तो म्हणाला, "अहो वहिनी, ती तर माझी विमलआत्या. लॅमिन्गटनरोडला आमचा मोठा वडिलोपार्जित बंगला होता. तिथे रहायची आमची फॅमिली. आता विमलआत्या माझ्याबरोबरच प्लेनोला राहते, माझ्या घरची फळी ती पूर्णपणे संभाळते. वहिनी, आत्या आहे म्हणून मी आहे. माझं जेवणखाण वगैरे तीच बघते. हा पहा आमचा फोटो." वसंताने उत्तर दिलं आणि आपल्या हसतमुख आत्याबरोबर प्लेनोच्या घरासमोर काढलेला स्वत:चा सेल्फी दाखवला.

"अरे हीच माझी मैत्रीण. चार वर्षं एकत्र होतो आम्ही कॉलेजला. लाव जरा फोन विमलीला, गप्पा मारू जरा". लीला मावशी म्हणाली होती.

वसंता त्याच्या मनगटी घड्याळाकडे पाहून पुढे म्हणाला, "आत्ता रात्र आहे तिकडे वहिनी. झोपली असेल आत्या. मी सांगेन तिला, तुम्हाला फोन करायला."

दुसऱ्या दिवशी मात्र सकाळीच आत्यांचा अमेरिकेहून फोन आला आणि दोघी मैत्रीणींनी मनसोक्त गप्पा मारल्या.

त्यानंतर लीलामावशीला वसंता म्हणजे अगदी घरचा माणूस वाटू लागला. पण वसंता तसा मितभाषीच होता आणि स्वत:बदल तर कधीच बोलायचा नाही.

a

अशोक कडूनच लीलामावशीला कळलं की वसंता घटस्फोटित होता. पहिल्या फसलेल्या विवाहानंतर वसंताने आपल्या कामात स्वत:ला झोकुन दिलं होतं. यश मिळवलं होतं. महिला वर्गापासून, विशेषत: व्यावसायिक महत्वाकांक्षा असलेल्या महिलावर्गापासून तो जरा दूरच रहात असे.

लीलामावशीने छायाची वसंताशी ओळख करून दिली खरी, पण त्याला नृत्यामधे काही गम्य नव्हतं आणि ना छायाला कंपनी मॅनेजमेन्टची काही माहिती. त्यामुळे सुरवातीचे काही महिने त्यांचे संभाषण "हॅलो हाऊ आर यू" च्या पुढे गेलंच नव्हतं. पण एकदा असं झालं की बोलता बोलता अनावधानाने अशोकने काही भारतीय नृत्य प्रकारावर ताशेरे मारले, आणि मग मात्र इतक्या आवेशाने छायाने भारतीय नृत्य प्रकारांचं समर्थन केलं की सगळेच चुप बसले. वसंताही छायाकडे जरा आदरपूर्वक दृष्टीने पाहू लागला. आणि हळु हळु त्यांच्या मधला बांध केव्हा फुटला आणि मैत्रीचं नातं केव्हा प्रस्थापित झालं ते त्यांचं त्यानाही कळलं नाही.

वसंत आला की छायाच्या मनातही वसंत फुलायचा आणि लीलामावशीने पाहिलं होतं की एरवी जेवढ्यास तेवढे बोलणाऱ्या वसंताला छायाबरोबर गप्पा मारायला कम्फर्टेबल वाटायचं.

एखाद्या विषयाबद्दल आपल्याला माहिती नसावी हे वसंताला चालायचंच नाही. आणि त्यामुळेच नृत्यासारख्या सर्वस्वी वेगळ्या विषयाबद्दलही, कॅाम्प्यूटर नेटवर्क वरून, संदर्भ पुस्तके वाचून त्याने बऱ्यापैकी सामान्य ज्ञान मिळवलं होतं.

लीलामावशीच्या आणि वसंताच्या विमलआत्याच्या, मुंबई ते डल्लास, बऱ्याचदा गप्पा व्हायच्या. काही वेळा छायासुध्दा गप्पांमधे भाग घ्यायची.

a

अशाच एका कॉल दरम्यान विमलआत्या छायाला म्हणाली, “अगं छाया, डल्लासच्या आसपास बरीचशी स्थानिक भारतीयांची सांस्कृतिक मंडळे आहेत आणि त्यांचे नवरात्र, दिवाळी, गणपती अशा सणांच्या निमित्ताने कार्यक्रम चालू असतात. इथल्या नृत्य निर्देशकाना तुझ्यासारख्या तज्ञ व्यक्तीचं मार्गदर्शन मिळालं तर खूप फायदा होईल त्याना. अमेरिकेत ये, ती तर लॅंड ऑफ ऑप्पॅारच्युनिटीज आहे. तिथे तुला खूप संधी मिळेल. चीज होईल तुझ्या गुणांचं. पट्कन् नावारूपाला येशील स्थानिक भारतियांमधे.”

छायाने विचारलं, “अगं पण आत्या, वर्किंग व्हिसा कसा मिळेल मला? वर्क परमिट मिळणं काय सोपी गोष्ट आहे का?”

जरा विचार करून आत्या म्हणाली, “तूर्त काम करायचं राहू दे बाजूला. तू असं कर, टुरिस्ट व्हिसावर ये. आधी अमेरिका पटतेय का ते पहा थोडे दिवस राहून. रहायला आमचं घर आहेच”.

छाया म्हणाली, “छानच कल्पना आहे आत्या, जरूर मी विचार करीन”.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी छाया मैत्रिणीबरोबर सिनेमाला गेली होती. ही संधी साधून छायाच्या लीलामावशीने संध्याकाळच्या सात वाजता विमल आत्याला फोन लावला. डल्लासमधे त्यावेळी सकाळचे साडे आठ वाजले होते.

“हॅलो विमले”, लीला मावशी म्हणाली, “आमच्या छायाला कशाला एवढं आग्रहाचं आमंत्रण दिलंस काल? तुझ्या मनात काही आहे का?”

“अगं लिले,” विमल आत्या म्हणाली, “तुझी छाया फार आवडलीय मला. तिचं आमच्या वसंताशी जमलं तर छान होईल.”

a

“मनातलं बोललीस माझ्या”, लीलामावशी म्हणाली.’’पण तुझा वसंता जरा मितभाषीच आहे, विशेष करून महिलांशी”.

“अगं काय करणार,” विमलआत्या म्हणाली, “दुधाने पोळलं की माणूस ताकही फुंकुन पितो.”

लीलामावशीच्या लक्षात आलं.

नंतर पंधरा वीस मिनिटे दोघींनी याच विषयावर थोडी आणखी खलबतं केली आणि ॲक्शन प्लॅन ठरवला.

छायाने अमेरिकेची टूर करायची, विमलआत्याचा आणि वसंताचा पाहुणचार घ्यायचा आणि जसं जमेल तसं, विमलआत्याच्या मदतीने तिथल्या स्थानिक भारतियांनी बसवलेले कार्यक्रम पहायचे, नव्या कल्पना रुजवून घ्यायच्या, कल्पना द्यायच्या, असं सर्वानुमते ठरलं.

छायाने अमेरिकेच्या टूरिस्ट व्हिसा साठी अर्ज केला. तीन महिन्यानंतर तिला कॉन्सुलेटचा कॉल आला आणि प्रत्यक्ष मुलाखती नंतर तिला सहा महिन्यांचा व्हिसा मिळाला.

“वसंता, तुझ्या पुढच्या ट्रिपहुन परतताना छायाला आण तुझ्या बरोबर. टुरिस्ट व्हिसा आलाय तिचा. मला इथल्या सांस्कृतिक मंडळांचे कार्यक्रम दाखवायचेत तिला. तिलाही जरा नवं बघायला मिळेल आणि जमलं तर मित्रत्वाच्या टिप्स देईल ती त्याना.” आत्याने वसंतला सांगितलं.

a

अशा तऱ्हेने वसंताच्या सोबतीने छाया अमेरिकेत जाऊन पोहोचली.

डल्लासला आल्याबरोबर लगेच विमलआत्याने तिचा ताबा घेतला आणि छायाची ओळख तिच्या माहितीच्या स्थानिक भारतीय सांस्कृतिक मंडळांच्या संचालकांबरोबर करून दिली. फेस्टिवल सीझन चालू असल्याने बऱ्याच संस्थांनी सांस्कृतिक कार्यक्रम बसवले होते. मग सगळयांकडून आमंत्रणं मिळवून लीलाआत्याने एक सामायिक वेळापत्रक तयार केलं आणि त्याच्या प्रमाणे छायाला बरोबर घेऊन त्या सांस्कृतिक कार्यक्रमाना हजेरी लावायला सुरुवात केली.

स्थानिक भारतियांनी सुध्दा तिच्या नृत्यातील नैपुण्याला योग्य ती दाद दिली होती.

कालच्या संगीत नृत्य कार्यक्रमानंतर नजिकच्या भविष्यात, म्हणजे एक दोन महिन्यात कोणी काही कार्यक्रम योजलेले नव्हते. त्यामुळे आत्याचं वेळापत्रक कोरं होतं. इथे रहाण्यातली ही एक उणी बाजू होती खरी. पण नृत्य कार्यक्रमांपेक्षा हल्ली वसंताला काय हवं नको याची काळजी घेण्यात छायाला जास्त गोडी लागली होती आणि विमलआत्याही तिला मोकळीक देत असे.

वसंता तिला म्हणत असे, कॅाम्प्युटर शिकून घे, जेव्हा वर्क परमिट हातात येईल तेव्हा तुला पटकन फुल टाइम जॅाब मिळू शकेल.

छायाच्या अगदी तोंडावर यायचं, “वसंता, मी एका वेगळयाच फुल टाइम जॅाबला अर्ज करतेय. या अर्जाचा सहानुभूतीने नाही, तर प्रेमाने विचार करशील नं?”

a

पण शब्द घशातच अडकायचे. वसंताने जराशी स्थितप्रज्ञ भूमिका अंगिकारली होती. अमेरिकेत रहाणं छायाला तसं स्वीकारणीय वाटत होतं. मुबलकता होती, प्रेमळ मित्रगण जमले होते. पण वसंताच्या हृदयाचं प्रवेशद्वार? त्याची किल्ली आपल्या हातात आहे की नाही हेही छायाला नक्की कळत नव्हतं.

प्रभाकरच्या मैत्रीप्रमाणे वसंताशी असलेलं नातंही मित्रत्वाच्या पुढे सरकणार नव्हतं का? मुंबईला जावं झालं.

आज तर तिला राहून राहून वसंताने सकाळी फोनवर कोणालातरी छायाला काही न समजू देण्याची दिलेली ताकीद डाचत होती. कोणताही रेफरन्स हातात नसल्याने तिला जास्तच भांबावल्या सारखं झालं होतं. कधी कधी अगदी टोकाच्या शक्यता मनात येत होत्या पण ते विचार ती लगेच झटकून टाकत होती.

लिव्हिंग रूम मधल्या टेलिफोनची बेल वाजली.

“लॅंड लाईन वर कॉल?” छायाला आश्चर्य वाटलं. हल्ली कित्येक दिवसात ही बेल वाजली नव्हती. सगळी कामं तर मोबाईलवर व्हायची. पण वसंताने ,”राहु दे आपलं. कंपनीची एक आयडेंटिटि”, असे म्हणत लॅंड लाईन फोन अजूनही ठेवला होता.

छायाने फोन उचलला.

“हॅलो, छाया?” फोन मधुन परिचित आवाज आला.

नाव सांगण्याची जरूर नव्हती. एकेकाळी कानात, काळजात सतत घुमणारा आवाज. न विसरण्याजोगा आवाज. नक्कीच प्रभाकर.

छायाची पहिली प्रतिक्रिया फोन ठेवून देण्याची होती. एरवी तिने फोन तडकाफडकी ठेवूनही दिला असता. पण आजच्या विमनस्क अवस्थेत आणि वसंताचा कोणाला तरी दिलेला त्रोटक आदेश ऐकण्यामुळे आलेल्या संभ्रमावस्थेमुळे, तरण्यासाठी कुठलाही नाममात्र आधार तिला गमावायचा नव्हता.

“छाया, काल अचानक भेटलीस आणि मला काही बोलायची संधीही दिली नाहीस.” प्रभाकर बोलत होता. “अमेरिका बघायला आली आहेस की कायम रहायला हे मला माहित नव्हतं, पण माझी वहिनी ओळखते तुला, नृत्य निर्देशिका आहे ती ॲलन भागातल्या भारतीय मंडळात. तुझ्या नृत्य निर्देशनामधल्या ज्ञानाने बरीच प्रभावित झाली होती ती! तिने हेही सांगितलं की तू इथे व्हिजिटर आहेस म्हणून.”

कैातुकाचा फिडबॅक ऐकून छायाला बरं वाटलं. “थॅंक्स”. ती म्हणाली.

“छाया, मी बंगलोरला असतो हल्ली. पार्टनरशिपमधे सॉफ्टवेअर कंपनी काढलीय.”

“अभिनंदन”. काहीतरी बोलायचे म्हणून छाया म्हणाली.

“आणि बरं का छाया, बंगलोर जसं सॉफ्टवेअर सेन्टर म्हणून प्रसिध्द आहे तसंच ते सांस्कृतिक केंन्द्र म्हणूनही झपाट्याने अग्रेसर स्थानाला येतंय. आणि नृत्याचे, संगिताचे इतके कार्यक्रम सगळीकडे चाललेले असतात की नृत्य निर्देशक कमी पडतायत”.

छायाने कान टवकारले.

“छाया बंगलोरला खूप ऑपॉर्च्युनिटीज आहेत तुला. तिथे असतीस नं, तर डझनावारी असाइनमेंट तुझ्या पायावर मी आणून सोडल्या असत्या.” प्रभाकर बोलत होता.

“खरंच?” छाया ने विचारलं. “प्रभाकर मी आले तिथे तर असाइनमेंट मिळतील मला?”

“हो, हो, का नाही?” प्रभाकरने जरा सावधपणे उत्तर दिलं. “अगदी दोन तीन असाइनमेंट तर आपल्या हातातल्या आहेत. आणि छाया असं पहा, तुझ्या टॅलेंटमुळे दोन एक वर्षांत कुठच्या कुठे पोहोचशील.”

“दोन वर्षं?” छाया उद्गारली.

“ बी रिॲलिस्टिक छाया”. प्रभाकर म्हणाला. “मुंबईची शिदोरी थोडीच इथे पुरणार आहे? पण एक खरं, तुझं टॅलेंट यश खेचून आणेल तुझ्याकडे, वर्तमानपत्रात कला-क्रीडा पुरवणीत तुझे फोटो येतील, तुझ्या नैपुण्याचं कौतुक होईल. आणि कोणी सांगावं, पाच एक वर्षात तू तुझी स्वत:ची ॲकॅडमीही सुरु करु शकशील‥…युवर ओन ॲकॅडमी” प्रत्येक शब्दावर जोर देत प्रभाकर म्हणाला.

या स्वप्नरंजनाने छायाही सुखावली.

वसंताबरोबरचे तिचे स्नेहसंबंध खरोखरच एका अवघड वळणापर्यंत पोहोचले होते. नैतिकतेचे नियम झुगारता तर येतच नव्हते आणि एकमेकाच्या मनाचा ठाव, का कोण जाणे, दोघांनीही लागत नव्हता. भावनांची उकल झाली होती पण उद्रेक होत नव्हता. त्यामुळेच हा देश आपल्याला कुठल्या ऑप्पॉर्च्युनिटीज देणार आहे, कशा देणार आहे, हे तिला कळंतच नव्हतं. काळजावर दगड ठेवून डल्लासला

पडद्याआड करावं का? पण मग नव्याने सुरुवात करायला, पंख फडफडायला वाव बंगलोरमधे मिळणार आहे का?

“अरे पण रहाणार कुठे मी बंगलोरमधे? तुझ्याशिवाय तिथे ना दुसऱ्या कोणाची ओळख ना पाळख.” छायाने विचारलं.

प्रभाकर जरा थबकला. जरी या विषयाचं सूतोवाच त्यानेच केलं होतं तरी वास्तवातली सगळी बंधने झुगारून देऊन नवीन पावले उचलायला छाया एवढ्या सहजा सहजी तयार होईल असं त्याला वाटलं नव्हतं. मग एक क्षणभर विचार करून तो म्हणाला, “छाया, मी राहतो बंगलोरला सदाशिव नगर मधे. माझा टू - बी एच के फ्लॅट आहे. त्याच बिल्डिंगमधे आणखी काही फ्लॅट्स रिकामे आहेत, भाड्याने द्यायचे आहेत. माझ्या ओळखीचे आहेत ओनर्स. माझ्या शब्दाला नाही म्हणणार नाहीत. आणि जा - ये करायला ऑटो आहेतच.”

प्रभाकरच्या बिल्डिंगमधे, त्याच्या फ्लॅटच्या जवळच्या फ्लॅट मधे रहायचं! प्रकरण जरा जास्तच पुढे चाललं होतं खरं, पण कोंडीतून सुटण्याचा एक मार्ग तरी दृष्टीपथात आला.

“बरं प्रभाकर, ...भेटू परत, ....बरं वाटलं बोलून”. असं काहीतरी तुटक बोलून छायाने फोन ठेवला.

तिकडे वसंतासुध्दा छाया प्रमाणे एका बेचक्यात येऊन अडकला होता. त्याच्या आधीच्या पूर्णरूपाने करिअर कॉन्शस बायकोपेक्षा साधी पण नो नॉन्सेन्स टाईप छाया त्याला आवडली होती आणि त्यामुळेच तिला गेस्ट म्हणून अमेरिकेला बोलावण्याच्या विमलआत्याच्या कल्पनेला त्याने विरोध केला नव्हता. पण पुढची स्टेप काय?

वसंता होता हाडाचा प्रॉजेक्ट मॅनेजर. कुठलंही काम त्याला प्रॉजेक्टच वाटायचं आणि मग प्रॉजेक्ट प्लॅनिंगच्या पुस्तकी तत्वानुसार तो कामांची आखणी करत असते. छायाचं प्रेम संपादन करणे, तिला लग्नाबद्दल प्रपोज करणे हे त्याचं तसंच एक कॉम्प्लेक्स प्रॉजेक्ट होतं

संध्याकाळी पाच वाजता वसंत आला. टेबलावर बसून चहा घेताना वसंत म्हणाला, “छाया, पुढच्या महिन्यात काही महत्त्वाचे कार्यक्रम आहेत. मला प्रसंगोचित कपडे वगैरे घ्यायला पाहिजेत. तर उद्या आपण आऊटलेट मॉलला जाऊया का? तुलाही काही नवीन कपडे पहाता येतील.

छायाचा चेहरा खुलला. ॲलन प्रिमियर आउटलेट्समधे म्हणजेच ॲलन एरिया मधल्या रिटेल आऊटलेट मॉलला जाणे ही कपडे खरेदी साठी मोठी पर्वणी. सुमारे मैलभर परिघाच्या वर्तुळात जगातल्या सर्व नामवंत ब्रॅंडस् ची शंभराहून अधिक कपड्याची दुकाने या मॉल मधे आहेत. त्यामुळे एवढ्या सगळ्या विविधतेतून आपल्याला हव्या असणाऱ्या प्रकाराचे कपडे लत्ते अगदी काटेकोरपणे खरेदी करू इच्छिणाऱ्यालाही सहज मिळू शकतात. छायाने त्या मॉलबद्दल बरंच काही ऐकलं होतं पण तिथे जाण्याची संधी मिळाली नव्हती.

वसंता बोलत होता, “कपडे खरेदी होवो वा न होवो, पुढचा कार्यक्रम फिक्स्ड. लंच तिथेच फास्ट फुड आऊटलेटमधे घ्यायचं आणि मग शहांच्या आईस्क्रीम पार्लरमधे बसून भारतीय फ्लेवरच्या आईस्क्रीम ची मजा लुटायची”.

आज वसंता फारच चांगल्या मूड मधे होता. जणू आत्या नसल्यामुळे त्याला अगदी मोकळं वाटत होतं. मनातल्या भावना उघड करायला आज चांगली संधी होती. नवे नवे उद्योग स्थापन करण्यात, व्यवस्थापनात निपुण असणाऱ्या वसंताला

प्रेमाच्या वाटेवर धाडसाची पावलं टाकावयास मात्र शब्द सुचत नव्हते. सुरुवात कुठे करावी ते कळत नव्हतं. भावनांच्या जगात व्यावहारिकतेला वाव नसणार हे तर नक्कीच. मग या वाटाघाटी सुरु कशा करायच्या?

रात्रीच्या जेवणापूर्वी बोर्बॉन ऑन द रॉक्स घेण्याची आयडिया त्याने काढली.

“तू घे बोर्बॉन, मी थोडी रेड वाईन घेईन तुला कंपनी म्हणून”, छाया म्हणाली.

रिस्पॉन्स तर उत्तेजनार्ह वाटला.

वसंता बाटल्या, ग्लास वगैरे काढायला लागलाछाया आत गेली. तिने फ्रोजन चिकन नगेट्स काढले आणि लिहिलेल्या सूचनांबरहुकूम मायक्रोवेव्ह मधे गरम करून आणले.

“सोबत, मंचिंग साठी”, हसत हसत छाया म्हणाली.

वसंताने ग्लास उचलला, छायाच्या ग्लासला लावून टोस्ट केलं, “टु अवर हॅपिनेस”.आणि ग्लास तोंडाला लावता लावता त्याने छायाचा हात आपल्या हातात घेतला. छायाही मूडमधे आली आणि वसंताला हसून प्रतिसाद देत तिने आपला ग्लास ओठांना लावला.

बोर्बॉनची आणि वाईनची उब दोघानाही सुखकारक वाटत होती.

वसंताने छायाचा हात हलकेच दाबला. तो शब्दांची जुळवाजुळव करून काही बोलणार तेवढ्यात त्याच्या फोनची रिंग वाजली. चीनला बिझिनेस डेव्हलपमेन्टसाठी गेलेल्या एक्झिक्युटिवचा फोन होता.

फोन कॅाल पाच मिनिटेच चालला पण नाजुक भावनांचा बांधत आणलेला पत्यांचा बंगला कोलमडवायला तो पुरेसा होता.

शांततेत जेवणं झाली. कोणाला काही हवं नको विचारायची जरूर नव्हती.

जेवल्यानंतर वसंताने ग्लास, बशा, चमचे धुवून टाकले. रिकामी खरकटी भांडी आधीच छायाने धुतली होती. आज दिवसभर फारसं काम नसल्याने छायाने हातासरशी भांडी जमतील तशी धुवून टाकली होती. त्यामुळे डिश वॅाशर लावण्याइतकं भांड्यांचं लोडही नव्हतं. मग धुतलेली सगळी भांडी छायाने सरळ ट्रेमधे निथळत ठेवली.

झोपायला जाण्यापूर्वी वसंता लिव्हिंग रूम मधे गेला. नेहमीच्या सवईप्रमाणे लॅंडलाईनचं कॅाल रेकॅार्ड बघितलं. "सकाळी आठ वाजता दहा मिनिटांचा इनकमिंग कॅाल? कोणी केला? कशासाठी? कोण बोलत होतं? आणि तेही दहा मिनिटे!"

कोणत्याही प्रश्नाचे उत्तर वसंताकडे नव्हतं.

शेवटी इकडे तिकडे न रेंगाळत वसंता सरळ झोपायला गेला होता.

छायाही बाकीची आवराआवर करून तिच्या रूममधे झोपायला गेली. सवयीप्रमाणे खोलीचं दार तिने ओढून घेतलं.

परत मनात विचार आला. वसंता पुढची स्टेप नीटपणे का घेऊ शकत नाही? घोडं एक्झॅक्टली कुठे पेंड खातंय? मुलीनी पुढाकार घ्यायचा की मुलानी? एक गोष्ट खरी. अगदी काटेकोर प्रोटोकॅाल पाळत बसलो तर बंगळुरुची वाटच धरायला लागेल.

मंत्रमुग्ध झाल्यासारखी छाया उठली. खोलीच्या दरवाज्यापर्यंत गेली आणि दरवाजा उघडण्यासाठी दरवाजाच्या गोलकाला हात लावला.

हाताला धातूचा थंडपणा जाणवताच मात्र छाया भानावर आली. तिने हात मागे घेतला. क्षणभर ती तिथेच उभी राहिली.

मग मात्र ती परत पलंगाकडे वळली. पलंगावर आडवी झाल्यावर तिने अंगावर ब्लॅकेट ओढून घेतलं आणि अंगाचं मुटकुळं करून ती झोपी गेली.

दुसऱ्या दिवशी आउटलेट् मॉलची ट्रीप. गाडी पार्क करून दोघेही आत मॉल मधे शिरले. इंग्लीश, अमेरिकन, भारतीय, लॅटिन अमेरिकन …. जगातल्या सगळ्या देशातील दुकानं तिथे होती.

वसंताने स्वत:साठी दोन इटालियन ब्रॅंडेड सूट विकत घेतले आणि मग आग्रहाने छायालाही स्वत:साठी चांगले पार्टीला, समारंभाला वगैरे घालण्याजोगे कपडे घ्यायला लावले.

छाया म्हणाली, “रोज काही आपण समारंभाला जात नाही ना? जरा साधे कपडेही पहायचेत मला”. झराझरा पावले टाकत छाया पुढे निघाली आणि तिच्या मागोमाग वसंतानेही चालण्याचा वेग वाढवला.

फिरता फिरता एकदम समोरून आला प्रभाकर अय्यर, उर्फ ए. पी. रामचंद्र. बरोबर कोणी एक दक्षिण भारतीय दिसणारा इसमही होता. वसंता आणि छाया या जोडीला पहाताच प्रभाकर थबकला.

छायाच्या मनात पाल चुकचुकली. इथे आता कसा उपटला हा? कालच्या फोनवरच्या संभाषणाबद्दल काही बोलला नाही तर बरं. छायाच्या मनात विचार.

“गुड आफ्टरनून मिस्टर वेलणकर, सर”. प्रभाकर म्हणाला.

“ओ, हलो मिस्टर रामचंद्र, तुम्हीही शॉपिंग करताय वाटतं”? वसंताने विचारायचे म्हणून विचारले.

“हो नं, इथे जवळच, या ॲलन भागातच हा माझा कझिन, माधवन राहतो. त्याच्याकडेच उतरलोय मी”. प्रभाकरने उत्तर दिले.

तीन दिवसांत दोनदा प्रभाकर भेटला, एकदा त्याचा फोन आला. हा काही ईश्वरी संकेत तर नसेल ना? छाया विचार करू लागली. याची वसंताबरोबरची भेट कॉम्प्युटर प्रोग्रॅमिंगच्या संदर्भात झाली, हा योगायोग तर खराच. पण मला त्यातून नियती काही संदेश देऊ इच्छिते आहे का?

वसंताकडून हवी तशी हालचाल नाही, करिअर डेव्हलप होण्याचीही आशा नाही. मायदेशामधली माझ्या क्षेत्रात चमकण्याची संधी तर मला बोलावत नसेल ना? जिथे एवढी घुसमट होतेय की तोंड वर काढायला जागा मिळत नाही, कुठलीही ब्रेक थ्रू संधी दिसत नाही, अशा या परक्या देशात कशाला रिकामे आयुष्य घालवायचे! पुढच्या पायवाटा काय, हमरस्ते काय, अनेक दिसत होते, पण सगळेच दाट धुक्याच्या आवरणाखाली होते. त्या धुक्याला फुंकर मारण्यासाठी मोठे निर्णय घेणे जरूर होते आणि तेवढी ताकद छायामध्ये नव्हती.

प्रभाकर आपल्या वाटेने निघून गेला. छाया पाय ओढत पुढे चालली. काहीशा निरुत्साहानेच पुढची खरेदी तिने केली .

a

फूड कोर्ट मधे दोघे शिरले.

“अरे, हे बॉम्बे बिर्याणी सेंटर नवीन झालेलं दिसतंय! घ्यायची बिर्याणी?” वसंताने विचारलं. छायाने मूक संमति दिली.

बिर्याणी नंतर कृष्णा शहाचं आईस्क्रीम सेंटर. तिथे वसंताने नेहमीप्रमाणे दोन बॉम्बे स्पेशल मागवले. दोघांची भूक शांत तर झालीच पण छायाच्या मनात मायदेशी परतण्याची हुरहुर जास्तच वाढली.

परतताना दोघंही शांत होते. मनात वेग वेगळे विचार चालू होते. छाया विचार करत होती. मायदेशी परतणे हा एवढाच आपल्यापुढे मार्ग आहे का? काहीही करण्यापूर्वी विमलआत्याचा सल्ला घ्यायला हवा. कुणाचे हातपाय कोणी बांधलेत? आपल्याकडून काही संधी गमावली जात नाही ना? पण टाळी दोन हातांनी वाजते. कोणी जोर लावायला पाहिजे आणि कुठल्या दिशेने?

विचार करायला हवा. तडकाफडकी काही अपरिपक्व विचारांच्या जोरावर निर्णय घेणे चूक ठरेल का? आणि आपल्या या मंथनात विमलआत्या, लीलामावशी यांचाही सल्ला घेतला पाहिजे.

आणि “परत जाणे” ही काही साधी बाब नव्हती. आतापर्यंत घेतलेले अनेक पवित्रे, टाकलेली अनेक पावले रिव्हर्स गिअर मधे टाकावी लागणार होती.

वसंताच्या मनात वेगळेच विचार चालू होते. आपण आतापर्यंतचं प्रत्येक पाउल यशाच्या मार्गिकेवरच टाकलं आहे. प्रत्येक बाबतीत सखोल अभ्यास करूनच आपण निर्णय घेतला आहे. एक घाव की दोन तुकडे ही भाषाच आपल्याला माहिती

नाही. आपल्या पदरात पडत राहिलेलं यशाचं माप असंच आपल्याकडे झुकत राहील का?

पण भूतकाळातल्या घटनांशी या प्रॉजेक्टची तुलना योग्य ठरत नाही. कारण यात सर्वांचा विजय, विन - विन सिच्युएशन निर्माण करणे हे ध्येय आहे. पण मग विश्वासाचा पाया बळकट असायला हवा नं! त्याला तडा जाता कामा नये.

कालच्या अनामिक फोन नंबरवरून आलेल्या लॅंड लाईन वरच्या दहा मिनिट कॅालच्या टाइम रेकॅार्डने तर त्याला हादरवलं होतंच. कोणाचा असेल तो फोन कॅाल? आणि दहा मिनिटे? लोकल कॅाल? अनामिकाची भीती, हुरहुर.

आपल्या प्रॅाजेक्टमधे कोणी प्रतिस्पर्धी तर अवतरला नाही ना! कोण असेल हा प्रतिस्पर्धी?

प्रॅाजेक्टला आता एक अदृष्य चौकट आली. अदृष्य सीमा आल्या.

आता एकच उपाय. एक्सपिडाइट. दे धक्का, उचल पाय, गाठ टप्पा. शीघ्रता!

या अदृष्य प्रॅाजेक्ट डेडलाइन मुळे आता मात्र झराझरा पावलं उचलायची निकड त्याला जाणवली. त्याच्या इतर कुठल्याही प्रॅाजेक्टला ‘‘प्रायमा व्हेरा’’ किंवा इतर कुठल्याही प्रॅाजेक्ट सॅाफ्टवेअरने झट्दिशी मार्गदर्शन केलं असतं, पण या प्रॅाजेक्टला कुठलही सॅाफ्टवेअर अस्तित्वात नव्हतं.

प्रेमाचंही प्रॅाजेक्ट, पण प्रॅाजेक्टच्या नियमाप्रमाणेच केलेल्या वाटचालीला फारसं यश येत नव्हतं. आता डायरेक्ट चढाई हा एकच मार्ग समोर.

अर्ध्या तासात घर आलं. आपापल्या खरेदीची ओझी संभाळत दोघेही गाडीतून उतरले.

दिवसभर बाहेर फिरल्यामुळे मळके कपडे काढून टाकून दोघांनाही स्वच्छ आंघोळ करायची होती.

छायाने आपला टॉवेल घेतला. वरच्या बाथरूम मधे आंघोळीला गेली. इकडे वसंताही टॉवेल घेउन खालच्या मास्टर बाथरूम मधे शिरला.

शॉवरच्या उबदार फवाऱ्यांनी आपले जादूचे वलय पसरवले. मळलेली शरीरे तर स्वच्छ झालीच पण दमलेल्या, मरगळलेल्या मनांनाही मसाज मिळाला, नवी उभारी आली.

आंघोळ करून, घरातले स्वच्छ कपडे घालून छाया खाली फॅमिली रूम मधे आली. वसंता आधीच आला होता, ग्लासेसची जुळवाजुळव करत होता.

“आज वेगळेच ग्लासेस दिसतायत!” जवळ येत छाया उद्गारली.

“हो नं. ….. शॅंपेनचे‥‥..

स्पेशल ऑकेजन आहे आणि तुझ्यासाठी एक सरप्राईज आहे”. वसंता म्हणाला.

तो छायाच्या जवळ आला आणि छायाच्या हातात त्याने एक कार्ड दिलं.

उत्सुकतेने छायाने कार्ड हातात घेतलं आणि त्याच्यावरून डोळे फिरवायला सुरुवात केली. वसंता तिच्या चेहऱ्यावरचे भाव, तिच्या प्रतिक्रिया निरखत होता.

छायाने वर नजर केली. तिच्या हातात कार्ड होतं आणि चेहऱ्यावर मंद स्मित होतं.

त्या मंद स्मितामधे मग थोडा खट्याळपणा आला.

“छाया वेलणकर डान्स ॲकॅडमी, 7501/7502 कॅारपोरेट ड्राइव्ह, प्लेनो - टेक्सास. ” छाया म्हणाली, “वा: फारच छान. …..पत्ता तर इंप्रेसिव्ह आहे……. जागाही प्रशस्त वाटते!…..पण नाव! या नावाची तर कोणीच व्यक्ती अस्तित्त्वात नाही. आणि उद्घाटन समारंभ पुढच्याच महिन्यात?”

वसंता हसला. तो शेजारच्या टीपॅायजवळ गेला.

तिथल्या फुलदाणीत ठेवलेल्या फुलांमधून एक गुलाबाचे फुल त्याने काढलं.

तो वळून छायाच्या जवळ आला. नाट्यमय तऱ्हेने ते फूल त्याने छायापुढे केलं आणि म्हणाला,

“छाया मोहिते, विल यू मॅरी मी?”

छाया समोरच्या धुक्याला जबरदस्त फुंकर मारली गेली होती.

पायवाट काय, महामार्ग क्लीअर झाला होता.

वसंताच्या प्रॅाजेक्टची पूर्णता झाली होती.

सर्व कवाडं खुलली होती. सर्व शंका लोपल्या होत्या.

————-x————

# शंभर वर्षांची लीज

डल्लास, टेक्सासच्या एका उपनगरात आपल्या घराच्या निवांत शांततेत संगिता चित्रे काम करत होती. समोर लॅप टॉप उघडा होता आणि प्रॉजेक्ट फीजिबिलिटी रिपोर्टवर ती एकाग्रतेने काम करत होती.

संगिताचा मोबाईल खणखणला. संगिताने मोबाईलकडे नजर टाकली. “आशा मावशीचा फोन.”

हसुन संगिताने काम थांबवले आणि फोन उचलला. “बोल मावशी”, संगिता म्हणाली.

“संगिता, मोठा प्रॉब्लेम झालाय रविकडे.” आशाताई फोनवर सांगत होत्या. “अगं मेधाची आई चार दिवसांपूर्वी मुंबईहून आली आणि आज आजारी पडलीय. बहुतेक फ्लाईट मधेच काहीतरी इनफेक्शन झालं असेल, आणि त्यातून ही डल्लास ची थंडी.”

थोडं थांबून आशाताई पुढे म्हणाल्या, “त्या आल्या म्हणून मी आले इकडे नयनाकडे. म्हटलं करतील त्या लेकीला मदत, एवढ्या लांबून प्रवास करून त्याच्यासाठीच तर आल्यात नं. पण झालंय काय, याच आजारी पडल्या. आता मेधा रविचं बघणार, की मुलांकडे बघणार, की तिच्या स्वत:च्या ऑफिसचं काम बघणार, की यांचं औषधपाणी करणार! पण तिनं खूप संभाळलं चार दिवस. मुलांना वेळेवर जेऊ खाऊही घातलं.”

“मेधा खूप धैर्याची मुलगी आहे, मावशी.” संगिता म्हणाली.

“अगं पण पुढे ऐक नं,” आशाताई म्हणाल्या, “अगं आता मेधालाही ताप आलाय. तिला उठवत नाही बिछान्यावरून. ताप वाढला तर ॲडमिट करावे लागेल असं म्हणतोय रवि”.

आशाताई बोलत होत्या , “भारतातली गोष्टी वेगळी गं. असा काही प्रसंग आला तर हाकेसरशी चार माणसं येऊन उभी राहतील. नातेवाईक म्हणा, नोकर म्हणा, कसलीही ददात नाही. पण अमरिकेत सगळेच अतिशय बिझी. कोण तुमच्यासाठी वेळ काढणार!”

संगिता यावर काय बोलणार? ती नुसती हं, हं करत होती.

रवि आणि नयना ही आशाताईंची मुलं. दोघंही चाळीस पंचेचाळीस वयोगटातले. दोघंही कुटुंबवत्सल, कित्येक वर्षे अमेरिकेत रहात असणारे आणि अमेरिकेचे नागरिकत्व घेतलेले. आणि ही दोन्ही कुटुंबं टेक्सासला डल्लास च्या आसपास रहाणारी.

आशाताईंचा मुलगा रवि रहात असे फ्रिस्को मधे, रविची बायको मेधा. त्यांच्या जुळया मुली, संध्या आणि छाया. दोघी मुली मिडल स्कूलमधे होत्या, सिक्स्थ ग्रेडमधे, सहावीत. अभ्यासात उत्तम आणि खेळांमधेही प्रवीण.

आशाताईंच्या मुलीचं, नयनाचं घर होतं प्लेनो मधे. रविच्या घरापासून सुमारे बारा मैल दूर. नयनाचा नवरा प्रमोद आणि नयनाचा मुलगा विहंग, हायस्कूल मधे होता तो, नववीत, नाइन्थ ग्रेडमधे. शाळेच्या बास्केट बॉल टीम मधे घेतलं होतं त्याला यंदा. आशाताई कधी रविकडे तर कधी नयनाकडे, गरजेप्रमाणे, सोईप्रमाणे रहात असत.

a

रवि आणि नयना आता वीस पंचवीस वर्षांनंतर अमेरिकेत संपूर्णपणे रुळले होते. दादासाहेब गेल्यानंतर मुलांनी प्रेमाने आईचा अमेरिकेचा इमिग्रेशन व्हिसा, ग्रीन कार्ड करून घेतलं होतं खरं, पण आशाताईंचा पाय काही पुण्यातून पूर्णपणे निघत नव्हता. पुण्यात डेक्कनवरचा बंगला आणि वडगावचं नदी काठचं फार्महाऊस या वास्तू दादासाहेबानी आणि आशाताईनी स्वकष्टाने बांधल्या होत्या, फुलवल्या होत्या. दादासाहेबांच्या पश्चात आता या सर्व इस्टेटीची मालकी आशाताईंच्या नावावर होती. या सर्व इस्टेटीचं मेन्टेनन्स, सरकारी कर वगैरे खर्च अवाढव्य होता. पण हा खर्च भागवण्यासाठी बॅंकेतल्या ठेवींवर मिळणारं व्याज आणि म्युच्वल फंडस् वरचा भरगोस डिव्हिडंड पुरेसे होते.

वर्षातून एकदा तरी आशाताई भारताची वारी करत असत. तीन महिने भारतात- पुण्यात रहात असत, पुण्याला आल्यानंतर सगळ्या जुन्या मैत्रिणींना त्या फोन करायच्या आणि मग त्यांच्या समवेत लक्ष्मी रोड, कॅंप पासून तुळशी बागेपर्यंत सगळी माहितीची दुकाने तर पालथी घालायच्याच, पण नव्या बाजारपेठाही आवडीने शोधुन काढायच्या.

आशाताईंच्या मुलाचं, रविचं, बालपण, शिक्षण पुण्यातच पार पडलेलं असल्याने तोही हाडाचा पक्का पुणेकर होता. रविलाही त्याच्या आईप्रमाणे पुण्याला यायला फार आवडायचं. पूर्वीप्रमाणे मित्रांबरोबर स्कुटरवरून सिंहगडाची ट्रिप करणे आता शक्य नव्हतं पण डेक्कनवर क्लबच्या बाररूमधे मित्रांसमवेत बसून त्या जुन्या आठवणींना उजाळा देणे, हास्य विनोदाचे फवारे उडवणे ही त्याची मजेत पुण्याला वेळ घालवण्याची एक कल्पना होती. पुण्यावर अगदी मनापासून प्रेम करणारे, “पुणेप्रेमी”, फक्त आशाताई आणि रवि. त्याना पुण्यातला बंगला, वडगावचं फार्महाऊस , सर्व जतन करावं, शक्य असेल तसं एन्जॉय करावं असं वाटत होतं.

a

कुटुंबातले बाकीचे मेम्बर्स मात्र पुणेकर नव्हते आणि पुणेप्रेमी तर नव्हतेच नव्हते..

रविची बायको मेधा होती मुंबईची. नयनाचं कॅालज शिक्षण, देशाबाहेर झालेलं. नयनाचा नवरा प्रमोद, बडोद्याकडचा. मुलांचं काय, त्यांची विचारधारा डल्लासच्या सीमेबाहेर जातच नव्हती. पुण्याशी कुणाचा संबंधच नाही.

नयनाचा नवरा प्रमोद गुजरातकडच्या बिजिनेस वातावरणात वाढलेला असल्याने त्याला या पुण्याच्या प्रॅापर्टीची गडगंज विक्री किंमत तेव्हढी दिसत होती. आशाताईंनी भारतातली सर्व मालमत्ता सुयोग्य भावाने विकावी आणि आलेल्या पैशाची अमेरिकेत गुंतवणुक करावी असे प्रमोदला आणि त्याच्याबरोबर नयनालाही ठामपणे वाटत होतं.

दोन्ही मेहुण्यांचं, नणंदा भावजयांचं आणि मुलांचं एरवी चांगलं सख्य होतं. सगळे एकमेकाशी खेळीमेळीने रहायचे. पण हल्ली मात्र या दोन्ही कुटुंबांमधे, विशेषत: रवि आणि नयना या भावा बहिणींमधे कटुता आली होती. मतभेद होते ते याच एका विषयावरून, आशाताईंच्या पुण्याच्या प्रॅापर्टीवरून.

एरवी सलोख्याने राहणाऱ्या कुटुंबात हा एक नस्ता वादाचा विषय झाला होता. हळूहळू वातावरण जास्त जास्तच गढूळ होत गेलं.

दिवाळी नंतर रविच्या घरी आशाताईंनी कुटुंबाचं एक छोटं गेट-टुगेदर ठेवलं होतं. जेवणं वगैरे झाली. मुलं मजेत खेळत होती, सर्वसाधारण विषयांवर गप्पा चालल्या होत्या.

शेवटी शेवटी आशाताईनी नयनाला सांगितलं, ‘‘नयना, फेब्रुवारीत इंडियाला जातेय मी’’.

नयना म्हणाली, ‘‘आई, सगळं विकूनच ये’’. प्रमोदनेही दुजोरा दिला.

रविला काही हे आवडलं नाही. शब्दावरून शब्द वाढला, काही फारसं कारण नसतानाही बोचरे शब्द वापरले गेले आणि त्या दिवसापासून रविने आणि नयनाने एकमेकांशी बोलणंच टाकलं.

झाल्या प्रकाराचं आशाताईंना खूप वाइट वाटलं. एकाच पर्वतातून निघालेल्या गंगा आणि यमुना नद्या वेगवेगळ्या वाहतात पण प्रवाहाचा मार्ग एकाच दिशेला असतो नं! एक पूर्वेला तर दुसरी पश्चिमेला जाण्याइतपत त्यांच्यात वितुष्ट येत नाही.

हे सगळं वर्तमान संगिताला नंतर आशाताईंकडून कळलं. संगिता ही आशाताईंच्या पुण्याच्या अगदी जवळच्या मैत्रिणीची मुलगी. लहानपणापासून शेजारीच राहिलेली आणि रविला आणि नयनाला सख्ख्या बहिणीसारखीच. आशाताईंची संगिता फारच लाडकी. योगायोगाने लग्नानंतर संगिताही डल्लासलाच रहायला आली होती. त्यामुळे सणासुदीला होणाऱ्या फॅमिली गेट टुगेदर मधे आशाताई तिचा समावेश आवर्जून करत असत. आणि दोन दिवसांतून एकदा तरी तिला फोन करण्याचा आणि गप्पा मारण्याचा परिपाठ त्यानी ठेवला होता.

देशभरात कोविदची साथ आली आणि साथ ओसरलीही. पण साथीच्या दरम्यान सुरु झालेले जीवनक्रमातले काही बदल तसेच चालू राहिले. कोविद साथीच्या काळात काही कंपन्यांनी कर्मचाऱ्याना घरून काम करण्याची मुभा दिली होती. बऱ्याच प्रमाणात ही पध्दत तशीच पुढे चालू ठेवली गेली होती. मेधा, नयना,

संगिता आठवड्यातले दोन-तीन दिवस ऑफिसला जात असत आणि बाकीचे दिवस घरून काम करत. प्रमोदचं रूटीनही तसंच काहीसं. रविचं तर आंतरराष्ट्रीय ऑफिस न्यू यॉर्कला होतं. तो घरूनच काम करत असे.

रवि आणि मेधाने घरातली कामं वाटून घेतली होती. रवि सगळी बाहेरची कामं संभाळत असे. मोठी सुपरमार्केट्स २४ तास उघडी असल्याने जसा वेळ मिळेल त्याप्रमाणे ग्रोसरी, भाजीपाला वगैरे इतर घर सामान आणण्याचं काम रवि आणि मेधा जोडीने किंवा जसे जमेल तसे एकेकट्याने करत असत. संध्याला आणि छायाला शाळेत नेणे आणणे, स्पोर्ट्स क्लास, आर्ट क्लासला नेणे वगैरे कामं मेधा करत असे.

मुलांची रोज रोज शाळेत ने आण करताना, रविला आणि मेधाला आपल्या शाळकरी दिवसांची आठवण यायची. मुंबई पुण्यात स्कूल बस, ऑटो रिक्षांची सोय असल्याने शाळेत काय किंवा क्लासेसना येण्या जाण्यात दोघेही मुलं स्वयंपूर्ण असायची, आणि त्याना नेण्या आणण्याचा भार घरच्या लोकांवर कधी पडलाही नाही.

रविकडे स्वैपाकघर आशाताई पूर्ण संभाळत असत. त्यामुळे आशाताई तेथे असताना मेधाला या कामातून बरीच सुटका मिळत असे. आता मेधाची आई भारतातून काही महिन्यांसाठी आल्यामुळे तिच्या हातात स्वैपाकघर देऊन आशाताईनी आपला मुक्काम नयनाकडे हलवला होता.

आज आशाताई फोनवर सांगिताला सांगत होत्या, “मेधाच्या आईच्या हातात सगळं सोपवून मी इकडे आले खरी, पण आता त्यानी आणि मेधानेही अंथरूण धरल्यामुळे फार मोठी पंचाईत झालीय. सगळा भार बिचाऱ्या रविवर

पडतोय. पण मी तरी इथून लांबून काय करणार? काही पदार्थ शिजवून तिकडे पाठवायलाही इथे हाताशी कोणी नाही.”

संगिताची मेधाशी चांगली मैत्री होती त्यामुळे तिलाही हे ऐकून वाइट वाटलं.

आशाताईनी दुसऱ्या दिवशी संगिताला फोन केला,.

रवि कडची परिस्थिती गंभीर होत चालली होती. छोट्या मुली घरी राहिल्या तरी पंचाईत. त्यांची शाळेत ने आण करायलाच पाहिजे. पण स्वैपाक पाणी? सगळी कामं सोडून त्यात रविला गुंतता येणं अवघड होतं.

संगिताने आशाताईना विचारले, “मावशी, तुम्ही नयनाला सांगितलं का हे? ती नक्की करेल काहीतरी”

“नाही गं संगिता,” आशाताई म्हणाल्या, “मागच्या आठवड्यातल्या बाचाबाची नंतर त्यांचे संबंध पार बिघडलेत. नयनाला सांगितलं आणि तुसड्यासारखं तिने काही उत्तर दिलं तर मला तर वाईट वाटेलच पण सगळं प्रकरण जास्तच चिघळेल. आणि तिला आज सकाळपासून लागोपाठ तीन मीटिंग्ज आहेत असं म्हणत होती ती. प्रमोद सकाळपासून कॉन्फरन्सला जाणार आहे म्हणे आणि विहंगला शाळेत मित्राबरोबर कसल्याशा प्रॅक्टिसला जायचंय.”

संगिताला काही तोडगा सुचेना. संभाषण संपले.

थोड्या वेळाने संगिताला पुन्हा आशाताईंचा फोन आला.

“संगिता, रविचा फोन आला होता. काल म्हणे त्याने इंडिया कॅफेमधुन जेवण आणलं होतं. मुलांना जरा तिखट लागलं म्हणे. आज काय करायचं ते अजून बघायचंय म्हणतोय. पण संगिता, असं करू या का? इथे नयनाकडे येऊन मला पिक

अप करशील का? आपण इंडिपेन्डन्स पार्कवेवरच्या सब्जी मंडीमध्ये जाऊन दोन तीन भाज्या घेऊ, तुझ्या घरी जाऊ, मी पट्कन भाज्या करीन, भात लावीन आणि सगळं घेऊन रविकडे जाऊ. करता येईल ना एवढं? काढशील ना वेळ?"

संगिता काय बोलणार! "येते मी मावशी, अर्ध्या तासात". असे बोलून तिने फोन ठेवून दिला.

संगिताचंही ऑफिसचं काम चालू होतं. लॉग ऑफ न करता जेवढे जमेल तेवढं काम ती करत राहिली.

कबुल केल्या प्रमाणे अर्ध्या तासात संगिता नयनाच्या घरी पोहोचली. आशाताई वाटच पहात होत्या. "संगिताबरोबर शॉपिंगला जाते", असं नयनाला सांगून आशाताई पर्स घेऊन बाहेर पडल्या.

सब्जी मंडी मधे फारशी गर्दी नव्हती. दोन भाज्या त्यानी पट्कन घेतल्या, पैसे देऊन बाहेर पडल्या. परतताना गाडीतूनच रविला आशाताईंनी फोन केला आणि त्यांचा प्लॅन कळवला. रवि निश्चिंत झाला.

दोघी संगिताच्या घरी आल्या. भाज्या धुवायला कापायला संगिताने मदत केली. आशाताईंना तिखट मीठ मसाले कोठे आहेत ते दाखवून दिले. आशाताईंनी एकीकडे भाज्या फोडणीला टाकल्या आणि संगिताने कुकर मधे भात आणि डाळ लावले.

आशाताई हुश्श करून बसल्या. संगिताने कॉफी केली. गरम कॉफीचा कप तिने आशाताईंच्या हातात ठेवला. कॉफीचे घोट घेऊन आशाताईंना तरतरी आली.

डाळ-भात-भाज्या स्वैपाक तयार झाला. संगिताने ॲल्युमिनिअम कंटेनर काढले. भाज्या, डाळ भात, सगळं सगळं भरलं, एक बॅग तयार केली, साडेबारा वाजून गेले होते. संगिताने गाडी काढली आणि दोघी रविकडे निघाल्या.

वीस मिनिटात फ्रिस्कोमधल्या रविच्या घरी दोघी पोहोचल्या.

संगिताने गाडी पार्क केली. गाडीतून उतरून, हातातली बॅग संभाळत दोघी पायऱ्या चढून वर आल्या. आशाताईंकडे दरवाजाची किल्ली होतीच. किल्लीने त्यानी दार उघडलं. दार थोडं किलकिलं होतंय तोच आतून एक सामुहिक हास्याचा फवारा ऐकू आला. दोघीनाही आश्चर्य वाटलं कारण आत कोणी हास्य विनोद करण्याच्या मन:स्थितीत असेल अशी त्यांनी कल्पनाच केली नव्हती.

आशाताई आणि संगिता आत गेल्या. समोरच डायनिंग टेबलावर मोठी पंगत बसली होती. रवि, संध्या, छाया आणि विहंग खुर्च्यांवर बसून जेवत होते आणि नयना तिथेच बसून कोणाला हवं नको पहात होती.

आशाताईना पाहून नयना उभी राहिली. “ये, ये आई, ये संगिता.” नयना म्हणाली. रविच्या तोंडात घास असल्याने त्याने वेलकम केल्या प्रमाणे हात हलवला.

“आई, तू सांगितलच नाहीस मला, इथे एव्हढी आणिबाणी निर्माण झाल्याचे, आणि संगिताबरोबर तशीच निघून गेलीस!” नयना बोलत होती. “माझी पहिली मीटिंग झाली आणि तेव्हढ्यात विहंग शाळेतून आला. त्याने सहजच संध्याला फेस टाईम कॉल केला, तेव्हा तिने सगळं सांगितलं. मग मला राहवेना. मी पुढच्या मीटिंगज् सोडून विहंगला घेऊन गाडी काढली. रविकडे घरात काय मटिरिअल असेल नसेल याची कल्पना नव्हती. मग इथे एल डोराडो पार्कवे वरच्या इंडिया बझार मधून थोडी भेंडी, कांदे बटाटे आणि एक योगहर्टचा मोठा कप घेतला.

a

इथे येउन बघितलं तर रविचा कॉल चालू होता. मग त्याला डिस्टर्ब नाही केलं. संध्या, छाया आणि विहंगला हाताशी धरलं. मुगाची खिचडी, भाजी, दही असं साधं जेवण रेडी केलं. तेवढ्यात रवि बाहेर आला. त्याने रोटीमॅटिक चालू केलं.” नयना पुढे म्हणाली, “आणि बरं का आई, ही मुलं बाहेरचे चिपोटले, पिज्जा, बर्गर खाऊन इतकी कंटाळली आहेत की त्याना हा जेवणाचा साधा बेतच आवडलाय.”

रविने तिकडून अंगठा आणि तर्जनी एकत्र जोडून “एक्सलंट” ची खूण केली.

आशाताईंनी संगिताला खूण केली. आणलेले कंटेनर टेबलावर मांडायला सांगितले. आता मुलांच्या उपाशी राहण्याची काळजी नव्हती.

आता कशाचीही काळजी नव्हती.

गंगा आणि यमुनेचे प्रवाह परत एकाच दिशेने वहायला लागले होते. संगम फार दूर नव्हता.

जेवणं आरामात चालली होती.

मेधा आणि तिची आई, आजारी माणसं. दोघीही वर होत्या. संगीताने आणि नयनाने त्यांच्यासाठी थोडी तांदळाची पेज केली. नयना पेजचं भांडं आणि दोन मग्ज घेउन वर गेली. तिथे पाहते तर दोघी मायलेकी उठून गप्पा मारत बसल्या होत्या. दोघीनाही घाम आला होता, ताप उतरला होता. दोघीनी पेज घेतली. तेवढ्या वेळात खाली जाऊन नयना मऊ डाळ भात घेऊन आली. मेधाला आणि तिच्या आईला थोडं पोषण अंगात गेल्यावर चांगली तरतरी आली.

रवि म्हणाला, "आई तू आता नयनाबरोबर तिच्या घरीच जा. आजचा दिवस महत्त्वाचा होता. ताप रहातो की कमी होतो ते कळत नव्हतं. आता ताप उतरलाय. मी डॉक्टर शहांना फोन केला होता. ते ही म्हणालेत आता काळजीचं कारण नाही."

संगीताला सर्वांनी मनोमन थँक्स दिले आणि ती आपल्या घरी निघुन गेली. पाठोपाठ नयना आशाताई आणि विहंगही निघाले.

जाता जाता आशाताई विचार करत होत्या, की आजारपणाचं संकट तर निभावलं. त्यामुळे मूळ प्रश्नाला थोडं डावललं गेलं खरं पण प्रश्न संपला नाही, तो जसा आहे तसाच आहे. बघुया, देवच मार्ग दाखविल.

सर्वजण घरी पोहोचले. तेवढ्यात प्रमोदही आला. दिवसभर तो कॉन्फरन्समधे गुंतला असल्या कारणाने नयनाला त्याच्याशी बोलायला वेळच मिळाला नव्हता. नयनाने साद्यंत हकिकत त्याला सांगितली. प्रमोदने नुसतं "हं" म्हटलं आणि तो बाथरूमकडे निघुन गेला.

दोन दिवसांनी आशाताईना रविचा फोन आला. "आई, एक गुड न्यूज आहे. मला कंपनीत वरची जागा मिळाली आहे. टेक्सास बरोबरच साउथ कॅरोलिना, आलाबामा आणि टेनेसी या स्टेटस् मधल्या ब्रँचेसचं क्वालिटी कन्ट्रोल पहाण्याची जबाबदारी माझ्याकडे आली आहे."

आशाताई ऐकत होत्या. रवि पुढे म्हणाला, "आई पुढची दोन वर्षं काम फारच असणार. नवीन सिस्टिम्स सेट अप करायच्यात, टेस्ट करायच्यात, आणि नंतरच्या वर्षी या दोघी मुली मिडल स्कूलमधून हायस्कूल मधे जातील. त्यांचा अभ्यास वाढेल, त्यांच्याकडे जास्त लक्ष द्यायला लागेल. तर आई, पुण्याच्या घराकडे, फार्महाउसकडे लक्ष देणं कठीण जाणार आहे मला. नयना -प्रमोदनेही हात

a

झटकून टाकलेत. तेव्हा तुला जसं जमेल तसं पुण्यातले घर आणि फार्महाउस डिसपोज करून टाक.”

पुण्याच्या जागेमधे आईच्या ह्दयाचे धागे कसे गुंतले आहेत ते रविला चांगलं माहिती होतं. त्यामुळे जरा चाचरतच त्याने तिच्यापुढे पुण्याची प्रॉपर्टी काढून टाकण्याबद्दल कल्पना मांडली होती.

आशाताईंना काही बोलण्यास जागाच उरली नाही. सगळ्यांनाच पुण्यातली प्रॉपर्टी नकोशी झाली होती. विकून टाकायची होती. खरंतर विक्रीतून मिळणाऱ्या पैशांची कुणालाही हाव नव्हती. सर्वजण इथे व्यवस्थित बस्तान बसवून होते, भरपूर पैसे कमवत होते. पण ती पुण्याची प्रॉपर्टी त्याना सगळ्यांना गळ्यातल्या लोढण्याप्रमाणे झाली होती. त्या मेन्टेनन्सशी निगडीत कराव्या लागणाऱ्या उलाढाली, सरकारी आणि स्थानिक कर भरणे, इलेक्ट्रिसिटी, गॅस अपटुडेट ठेवणे, सगळंच कठीण होत चाललं होतं. या सर्वापासून सुटका हवी होती.

त्या दिवशी आशाताईंनी संगिताला फोनवर सांगत होत्या, “संगिता, माझी विचित्र मन:स्थिती झालीय बघ. मुलांच्या इच्छेविरुध्द तर मी नाही जाऊ शकत, आणि आपल्या देशाशी कायमचे संबंध तोडुन टाकण्याची कल्पनाही नाही सहन होत मला. या मुलांनी पटापट त्यांचे स्वत:चे निर्णय घेतले. या परक्या देशाला आपली कर्मभूमी मानलं. मायदेशाचा संबंध तोडून टाकणे त्याना सहज शक्य आहे. मला ते अवघड आहे गं संगिता.”

संगिता म्हणाली, “मावशी, सुरुवातीला अवघड पडेल हे तुम्हाला, पण आम्ही सर्व आहोत ना तुमच्या बरोबर. हा देशही सामावून घेईल तुम्हाला.”

थोडं थांबून संगिता म्हणाली, “मावशी, माझा चुलत भाऊ संदीप पुण्यात आहे. रिअल इस्टेट च्या बिझिनेस मधे आहे तो. तुमच्या पुण्याच्या प्रॉपर्टीला काय किंमत येईल, फायदेशीर डील कसं मिळेल याचा अंदाज घेउ का मी त्याच्याकडून. तो अगदी खरी खुरी माहिती देईल आपल्याला”.

“ठीक आहे संगिता, पुढची पावलं आता टाकायलाच हवीत मन घट्ट करून”. आशाताई म्हणाल्या. “सगळया किल्ल्या शेजारच्या शामरावांकडे आहेत. घे म्हणावं संदीपला त्यांच्याकडून. मी त्याना फोन करून ठेवीन. नीट पहा म्हणावं फिरून सगळं”.

एक आठवडा गेला. मेधा, तिची आई, सर्वांचं आजारपण आता इतिहासजमा झालं होतं. थंडीही ओसरली होती.

आशाताईंना संगिताचा फोन आला. “मावशी, संदीपने तुमच्या दोन्ही जागा बघितल्यात. त्याला तुमच्याशी बोलायचंय त्याबद्दल. आज संध्याकाळी करेल फोन तो. देऊ ना तुमचा नंबर त्याला?”

“हो, हो अवश्य दे”. आशाताई म्हणाल्या.

दुसऱ्या दिवशी रात्री दहा वाजताची गोष्ट. आशाताईंचा झोपायला जाण्याचा विचार होता. तेवढ्यात त्याच्या फोनवर इंडीया कॅाल आला. विंटर टायमिंग चालू होतं, भारतात सकाळचे साडे नऊ. संदीपचा फोन होता. “मावशी मी संदीप बोलतोय पुण्याहुन, संगिताचा चुलत भाऊ. नमस्कार. मावशी, मी तुमच्या जागा बघितल्यात. दोन्ही, बंगला आणि फार्म हाऊस.”

"मावशी, दोन बऱ्यापैकी ऑफर आहेत." संदीप सांगत होता. "एका मोठ्या टेलीविजन कंपनीला त्यांच्या सिरियल मधे, सुखवस्तु माणसांचं घर म्हणुन चित्रित करायला तुमचा बंगला आवडलाय, आणि ते तळमजला आणि पुढचा बगीचा लीजवर मागतायत, वरचा मजला, मागचा बगीचा तुम्ही ठेवू शकता, असं म्हणतायत. सर्व मेन्टेनन्स, टॅक्स, सगळी बिलं वगैरे ते बघतील. महिन्याला एक लाख कॉम्पेन्सेशन देतो म्हणतायत."

आशाताईंची झोप कुठल्या कुठे उडून गेली. "एक लाख महिन्याला म्हणतायत?" त्यानी विचारलं.

"ते म्हणतायत एक लाख, पण आपण खेचू त्याना दीड लाखांपर्यंत." संदीप म्हणाला. "मावशी, आणि फार्महाऊस पण पाहिजे त्याना लोकेशन शूटिंग साठी." संदीप बोलत होता. "दोन्ही मिळून महिन्याचे पाच लाख वाजवी होईल मावशी, सर्व खर्च त्यांचा. वर्षागणिक कॉम्पेन्सेशन वाढीव करण्याचा क्लॉज ठेवू शकतो आपण"

आशाताई उभ्या होत्या, त्या जवळच्या खुर्चीवर जाऊन बसल्या.

"पण मावशी, एक प्रॉब्लेम आहे," संदीप बोलत होता. "लीज जरा जास्त वर्षांची पाहिजे त्याना. दहा वर्षांची मागतायत".

"अरे संदीपा, दहा काय विचारतोस?" आशाताई ओरडल्या, "शंभर वर्षाची लीज करून टाक, शंभर".

-------x-------

# देवाचे आभार

सकाळचे आठ वाजले होते. हवा बऱ्यापेकी थंड होती. प्लेनो टेक्सास येथील कॅाईट रोडवरचे रेमन अपार्टमेंट.

अपार्टमेंट कॅाम्प्लेक्सच्या ए ६२१ युनिटमधून रमेश बाहेर पडला. रमेशचा पार्किंग स्लॅाट ए ब्लॅाकच्या समोरच होता. ब्रिफ केस मागच्या सीटवर टाकून रमेशने कार सुरु केली. कार मेन गेटपाशी आल्यावर त्याने मोबाईलवर चार आकडी कोड नंबर दाबला. मेन गेटची दोन्ही विशाल दारं दोन बाजूला आवाज न करता उघडली. रमेशची कार बाहेर पडली. कार पूर्णपणे बाहेर पडल्यावर गेट बंद होण्याची प्रक्रिया आपोआप सुरू झाली. आता आतून किंवा बाहेरून दुसऱ्या एखाद्या रहिवाशांची गाडी गेट जवळ येऊन कोड नंबर दाबला जाईपर्यंत गेट बंद.

रमेशची गाडी रोजचा पायाखालचा रस्ता धावू लागली. कॅाईट रोड, हेजकॅाक्स रोड आणि मग लांबच्या लांब इंडिपेन्डन्स पार्क वे घेऊन गाडी एल डोराडो रोडपर्यंत आली. तिथेच कोपऱ्यावर रमेशचं ऑफिस. ट्रॅफिक जास्त असेल तर २० मिनिटे, नाही तर एरवी १५ मिनिटांचा प्रवास. रमेशच्या कंपनीचं हेड ऑफिस होतं ऑस्टिनला. रमेशचा बॅासही ऑस्टिनलाच बसत असे.

रमेश ऑफिसला पोहोचला. थर्मासमधुन कॅाफी कपामधे ओतली आणि सावकाश घुटके घेत ऑफिस लॅपटॅाप सुरु केला. लॅाग इन केलं. दिवसाच्या कामांची सुरुवात.

दोन तास असेच कामात गेले. रमेशने कामातून थोडा ब्रेक घेतला. खाजगी इ मेल, वाटस्ॲप मेसेजेस वगैरे पाहिले. मग घरी आईला फोन लावला. थोडा वेळ

a

फोनची रिंग वाजली आणि अर्ध्या मिनिटानंतर नो रिप्लाय म्हणून बंद झाली. “आंघोळीला गेलेली असेल” म्हणून त्याने फोन ठेवून दिला आणि परत आपल्या कामाला लागला

इकडे त्यावेळी मीनाताई काही आंघोळीला वगैरे गेल्या नव्हत्या, तर आपार्टमेंट कॉम्प्लेक्सच्या मेन गेटच्या बाजूला असलेल्या छोट्या पादचारी दरवाजाच्या, म्हणजे विकेट गेटच्या बाहेर त्या उभ्या होत्या. पंधरा मिनिटे झाली होती. ना विकेट गेट मधून कोणी पादचारी आले गेले होते, ना मेन गेट मधून वाहनांची आत बाहेर रहदारी झाली होती. मीनाताईंच्या समोरच नंबर बॉक्स होती पण छोटे गेट उघडण्या साठी लागणारे नंबर कोड त्या विसरल्या होत्या. २८३८ की ४८२८ असं कायसं कोड रमेशने त्याना सांगून ठेवलं होतं, आणि आठवणींच्या कप्प्यात कुठेतरी मीनाताईंनी ते नीट जपून ठेवलं होतं. पण आता ऐनवेळी तो आठवणींचा कप्पाच त्याना सापडत नव्हता, आणि आत जाण्यासाठी विकेट गेट उघडता येत नव्हतं.

इतक्यात बाहेरून एक मिनि व्हॅन आली. दोन माणसं गाडीत बसलेली होती. गेटपासून काही अंतरावर असतानाच ड्रायव्हरने नंबर कोड पंच केलं असणार, कारण ती व्हॅन गेटच्या जवळ येईपर्यंत मेन गेटची दोन्ही विशाल कवाडं उघडायला लागली होती. व्हॅन आत गेली आणि कवाडं बंद होऊ लागली. त्या थोडक्या वेळामधे मेनगेट बंद होण्याआधी आत शिरण्याची चपळाई करण्याचं काही मीनाताईंचं वय नव्हतं. त्यामुळे त्या तशाच विकेट गेटच्या बाहेर असहायपणे तिष्ठत उभ्या राहिल्या.

गेटच्या आत गेल्यावर ती व्हॅन थाबली आणि एक तरूण इसम व्हॅनमधून उतरला. विकेट गेट आतून उघडून तो बाहेर आला आणि अस्खलित मराठीमध्ये मीनाताईना म्हणाला, “काकी आत जायचंय का?

a

मीनाताईंनी होकारार्थी मान हलवली. त्या तरुण माणसाकडे कृतज्ञापूर्वक कटाक्ष टाकला. नंबर पंच करून त्या इसमाने विकेट गेट उघडले आणि त्यातुन दोघांनीही आत प्रवेश केला. मागोमाग विकेट गेट परत बंद झाले.

“चला, गाडीने सोडतो मी” त्या तरुणाने ऑफर दिली.

“अं, नको, इथे समोरच ए ब्लॉकमधे राहते मी. आय वील वॉक. थॅंक यू फॅार युवर हेल्प.”

“काळे नाव माझं, मनोहर काळे. मी सी ब्लॉक मधे राहतो. काकी सॅारी टु टेल यू, पण अशा एकट्या दुकट्या बाहेर फिरत जाऊ नका, इट्स नॅाट सेफ”. काळेंनी जाणीव करुन दिली.

“एरवी मी नाही बाहेर जात, इथे आतच वॉक घेते. आज एकादशी आहे ना, म्हटलं साबुदाण्याची खिचडी करू. जवळच दहा मिनिटाच्या रस्त्यावर पटेल ब्रदर्स आहे, तिथे साबुदाणा, शेंगदाणे वगैरे सामान आणायला गेले होते. परत आले पण नंबर कोड शिवाय आत प्रवेश नाही. बरं मोबाईलही नेला नव्हता. नाहीतर रमेशला फोन करून विचारतां आलं असतं.”

चालता चालता ए ब्लॉक आला. “हा आला तुमचा ए ब्लॉक. सावकाश जा हं काकी”. असे म्हणून तो इसम आपल्या गाडीकडे निघुन गेला.

काकी म्हणजे मीनाताई वर आल्या. आपल्या अपार्टमेंटचं दार उघडून आत आल्या. एक कप गरम चहा करून घेतला. थोडं निवांत बसल्या आणि मग कामाला लागल्या.

संध्याकाळ झाली. रमेशला घरी आल्याबरोबर हातात गरम गरम साबुदाणा खिचडीची बशी मिळाली. “वा: सुंदर. एकदम टॅाप क्लास”. खिचडीची दुसरी बशी वाढून घेता घेता रमेशने शेरा दिला.

a

“मनसोक्त खाऊन घे बाबा. सुनबाई कितपत हे सगळं करू शकणार आहे , कोण जाणे”. मीनाताईंनी चिंता व्यक्त केली.

“अगं आई, असं का म्हणतेस? नीताला सगळा स्वैपाक छान येतो, बघितलंय आपण” रमेशने आपल्या नवपरिणित बायकोची बाजू घेतली.

“आई उद्या पण बनव खिचडी. बेस्ट झाली आहे”. टेनिसची रॅकेट उचलून खाली जाता जाता रमेशने फर्माईश दिली.

दुसऱ्या दिवशी सकाळी साडे नवाचा सुमार. रमेश ऑफिसला गेला होता. मीनाताई खाली वॉक घेत होत्या. टेक्सासचा कडक उन्हाळा अजून लांब होता. कोवळं ऊन अंगाला ऊब आणत होता. “गुड मॉर्निंग काकी”, जवळूनच शब्द ऐकू आले. मीनाताईंनी मागे वळून पाहिलं. मनोहर काळे नमस्ते करत हसऱ्या चेहऱ्याने उभा होता.

परक्या देशात ओळखीचा चेहरा पाहून नेहमीच बरं वाटतं. कालच्या प्रसंगामुळे मनोहर काळेबद्दल मीनाताईना आपुलकी वाटू लागली होती.

“काकी, मग साबुदाण्याची खिचडी बनली की नाही?” काळेनी हसत चौकशी केली.

उत्सफुर्तपणे मीनाताई म्हणाल्या, “हो हो, बनली तर. आणि आज संध्याकाळी पण करणार आहे. तुम्ही या नं संध्याकाळी सहाला. खिचडीही मिळेल आणि रमेशचीही ओळख होईल. ए ६२१.”

काळे ताबडतोब कबूल झाला.

आपणहून जाऊन कुणाशी मैत्री करणे रमेशच्या स्वभावात नव्हते. त्यामुळे मित्राचा गोतावळा त्याच्याभोवती कधीच जमला नाही. आता सुध्दा आपार्टमेंट

a

कॅाम्प्लेक्समधे त्याच्या फारशा ओळखी पाळखी नव्हत्या. उद्या व्हिसा झाला की सूनबाई येतील, मीनाताई परत जातील. रमेशला जरा मित्रमंडळींचा आधार इथे असायला हवा अशी मीनाताईंची आपली प्रांजल इच्छा होती.

संध्याकाळ झाली. रमेश घरी आला. हात तोंड धुवुन, फ्रेश होऊन रमेशने मागणी केली, “आई, खिचडी”.

मीनाताई म्हणाल्या, “थांब पाच मिनिटे. शेजारच्या एका सद्गृहस्थानाही बोलवलंय मी”.

पाच मिनिटात काळे आले. मीनाताईना नमस्कार केला, रमेशशी हस्तांदेलन करून हॅलो म्हटलं आणि बसले.

“मी पाहिलंय तुम्हाला बऱ्याचदा खाली टेनिस कोर्टवर”, काळे रमेशला म्हणाले. “बॅक हॅंड फार स्ट्रॅांग आहे तुमचा. सगळे ॲप्रिशियेट करतात.”

रमेशला बरं वाटलं ऐकून. मीनाताईंनाही अभिमान वाटला आपल्या मुलाचा.

“तुम्ही स्वत: खेळत नाही का? कधी पाहिलं नाही तुम्हाला कोर्टवर”. रमेश म्हणाला.

“खेळायला आवडेल मला, पण वेळ नाही मिळत. इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायजर आहे मी. विशेषत: स्टार्ट-अप्सना फंडिंग करण्याबाबत ॲडव्हाईस मी देतो”. काळे म्हणाले

फारसा खोलात विचार न करता रमेशने म्हटलं, “ठीक, ठीक”.

मीनाताई आत गेल्या आणि खिचडीच्या भरलेल्या बशा घेऊन बाहेर आल्या.

साबुदाण्याच्या खिचडीचा आस्वाद दोघेही घेऊ लागले.

“काकी, झकास झाली आहे हं खिचडी” काळेनी मीनाताईना सर्टिफिकेट दिलं.

मीनाताईंच्या आग्रहाला योग्य तो प्रतिसाद देत काळेंनी खिचडीला दाद दिली, रमेशशी सर्वसाधारण विषयांवर गप्पा मारल्या आणि मीनाताईंचे आभार मानून, बाय बाय करून काळे निघुन गेले.

“चांगला माणूस दिसतो. आई तुला कुठे भेटले हे?” रमेशने विचारलं.

“अरे विकेट गेटच्या कोडिंग बॉक्सजवळ माझं काल जरा कन्फ्यूजन झालं होतं, तेव्हा थांबून मदत केली यांनी” मीनाताईंनी थोडक्यात उत्तर देउन विषय संपवला. रमेशनेही रॅकेट उचलली.

थोड्याच दिवसात नीताचा स्पाउज व्हिसा झाला, आणि डल्लासला येण्याची तारीख ठरली. तिच्यावर सगळं सोपवायला मीनाताईना दोन आठवड्यांचा अवधी ठीक वाटला आणि रमेशने त्यानुसार त्यांचं मुंबईचं तिकीट काढलं.

साबुदाणा खिचडी प्रकरणानंतर दोन तीनदा मनोहर काळे मीनाताईना त्यांच्या मॉर्निंग वॉकच्या वेळी भेटले होते. मग कधी पोहे खायला, कधी रव्याचा उपमा खायला मीनाताईंकडून त्यांना निमंत्रण मिळालं होतं, त्यांनी आनंदाने स्वीकारलं होतं, पदार्थांची तारिफ करत त्यांचा समाचार घेतला होता आणि रमेशशी गप्पा गोष्टी करत त्याच्याशी एक मित्रत्वाचं स्थान निर्माण केलं होतं.

असेच काही दिवस गेले.

नीता आली. प्लेनो तिला प्रथमदर्शनीच आवडलं. आठवडाभरातील रमेशच्या रूटीनची तिला माहिती झाली. रमेशने तिच्या कॉलेज ॲडमिशनचे

सोपस्कार सुरु केले. सोशल सिक्युरिटी रजिस्ट्रेशन, कार ड्रायव्हिंग लायसेन्स सगळ्याच फॉर्मॅलिटीज सुरू झाल्या. नीता मुंबईची मुलगी, त्यातून पक्कं होमवर्क आणि अर्धे अधिक क्लासवर्क तिकडून करून आलेली. त्यामुळे रमेशला जास्त सुट्टीही घ्यायला लागली नाही.

मग एक दिवस रमेशचे जे काही मोजके मित्र होते त्यांना, त्यांच्या कुटुंबियांना भेटवण्यासाठी पार्टी ठेवली होती. भोजन व्यवस्था बाहेरून केली होती. मनोहर काळेनाही सहकुटुंब येण्याचं आमंत्रण होतं. मीनाताई आणि रमेश नीताची सर्वांशी ओळख करून देत होते. हास्य विनोदाला पूर आला होता. कोणाला काही हवं नको पहाण्याचा फारसा प्रश्न नव्हता. रमेश सर्वांमध्ये फिरत होता, फोटो काढत होता. नीताही सर्वांमध्ये फिरून बोलत होती, हास्य विनोदाला साथ देत होती. मनोहर काळे एका बाजूला खुर्चीवर बसले होते, हातात प्लेट होती, रेमन आपार्टमेंटच्याच आनंदबरोबर गप्पा मारत होते. नीताला जवळ आलेली पाहून काळे खुर्चीवरून उठले. “हॅलो मॅ’म, मी मनोहर काळे” परत एकदा स्वत:ची ओळख करून दिली. “आईंच्या साबुदाणा खिचडीमुळे माझी ओळख झाली रमेशशी”

“हो लक्षात आहे माझ्या. मीही बनवते हं चवदार खिचडी, करूया एकदा कार्यक्रम.” नीता हसत म्हणाली. “सावकाश होऊन द्या”. नीता पुढे गेली.

दिलखुलास वातावरण. सगळेच उच्चशिक्षित, गगनाला गवसणी घालू पहाणारे. बरं वाटलं नीताला.

नवा आठवडा सुरू झाला. एकदा कॉलेजचा फेरफटका झाला. नीताचा एम बी ए चा शिक्षणक्रम. जे काही विषय मुंबईला पोस्ट ग्रॅजुएट लेव्हलला केले होते त्यांचं नीताला क्रेडिट मिळालं. त्यामुळे फी कमी झाली आणि ग्रॅजुएट क्लासचे विषय ही कमी झाले. बरेचसे क्लासेस घरून अटेंड करण्यासारखे होते. प्रॉजेक्ट

a

वर्कसाठी इतरांशी घरूनच नेटवर्किंग प्रस्थापित करून झालं. एकंदर बऱ्याच गोष्टी सुरळीत सुरू झाल्या.

इंटरनॅशनल फायनान्सिंग व टॅक्सेशनचा नीताचा क्लास युनिव्हर्सीटीमधे आठवड्यातून दोनदा, मंगळवार शुक्रवार संध्याकाळी पाच ते सात असायचा. घरात दुसरी कार नव्हती आणि नीताला अमेरिकेत रात्री गाडी चालवण्याचा कॉन्फिडन्स नव्हता. त्यामुळे क्लासला जाण्यासाठी ती टॅक्सी बोलावत असे आणि परतण्याच्या वेळी मात्र रमेश तिला आणायला कार घेउन जात असे.

आणि मग एका शनिवारी रमेश नीताला घेऊन मोटारींच्या शो रूम मधे गेला आणि नीतासाठी छानशी टोयोटा गाडी घेऊन टाकली.

सुरुवातीला जरा घाबरत पण नंतर सर्रासपणे नीता प्लेनोमधे गाडी चालवू लागली, स्वत: गॅस स्टेशनवर जाऊन गॅस, म्हणजे पेट्रोल भरायला लागली. क्लासला जायची यायची चांगली स्वतंत्र सोय झाली.

एका मंगळवारी क्लासहून नीता परत आली तर आपार्टमेंटच्या लिव्हिंग रूम मधे रमेश आणि मनोहर काळे काही डिस्कशन करत असलेले नीताला दिसले. समोर एका कागदावर काही आकडेमोड केलेली दिसली आणि कसलासा नकाशा उघडा दिसला. विशेषसा विचार न करता नीता फ्रेश व्हायला आत गेली. दहा पंधरा मिनिटांनी नीता बाहेर येईपर्यंत काळे निघुन गेले होते.

“काय एवढी खलबतं चालली होती?” नीताने सहज विचारलं.

“अगं, मनोहरने एक चांगलं इन्व्हेस्टमेंट प्रपोजल आणलं आहे.” काळेंचा एकेरी नावाने केलेला उल्लेख नीताच्या लक्षात आला.

“काय आहे प्रपोजल?” नीताने विचारलं. नाहीतरी इन्व्हेस्टमेंट, फायनान्स हा रमेशपेक्षा मुख्यत्वे नीताचा प्रांत होता.

“अग डल्लासच्या दक्षिणेला ऑस्टिनच्या रस्त्यावर इथून सुमारे दीडतासाच्या अंतरावर वॅको लेक आहे. वॅको सिटी सुध्दा आहे. तिथे खूपशी फार्म लॅंड स्वस्तात मिळतेय. सध्या भाव खूपच कमी आहे, एकरी नऊ हजार डॉलर. पण तिथे खूप डेव्हलपमेंट होणार आहे. कॅमेरॅान झु पार्कचा कायापालट करणार आहेत. मग टूरिस्ट, दुकानं, हॉटेलं येतील. वर्षाभरातच त्या जमीनीचा भाव कुठल्या कुठे जाईल. आत्ता एक मिलियन, म्हणजे दहा लाख डॉलर घातले की एक वर्षात दुपटीने परतफेड.”

“दहा लाख?” नीताचा प्रश्न. “एवढे आणायचे कुठून”?

“काळेंनी एक मार्ग सुचवलाय”. रमेश म्हणाला. “ दोन लाख डॉलर आपले टाकू आणि आठ लाख डॉलर बॅंकेकडून कर्ज घेऊ. सगळे असंच करतात म्हणे.”

नीता विचार करत होती.

वॅकोमधल्या फार्म लॅंडची “फेअर प्राईस”, म्हणजे योग्य किंमत काय? किंमत वाढण्यासाठी कसली एवढी डेव्हलपमेंट तिथे होणार आहे? खात्री काय? कोण डेव्हलपर आहेत? बॅंक लोनचं व्याज काय पडेल? या प्रॅाजेक्ट साठी लोन घेतलं तर मोरॅटोरिअम किती असेल? आणि आपलं क्रेडिट रेटिंग काय राहील?……. एक ना दोन, एवढं मोठं धाडस करायचं असेल तर सांगोपांग विचार नको का करायला!

नीताने विचार केला, बराचसा रिसर्च केला, आकडेमोड केली आणि ती निर्णयाप्रत पोहोचली की सपशेल तोंडघशी पाडणारं हे धाडस आहे. जागांच्या लावलेल्या किमती फारच अवाच्या सवा जास्त आहेत, नजिकच्या भविष्यकाळात त्या फार उंचावण्याची शक्यता कमी आहे आणि नको असलेल्या माळरानाचं धोंगडं गळ्यात घेऊन कर्जबाजारी व्हायला लागेल.

a

संध्याकाळी रमेश आल्यावर ही सर्व आकडेमोड आणि निष्कर्ष सरळ त्याच्यासमोर ठेवायचे आणि यातून अंग काढून घ्यायला भाग पाडायचं. रमेश जरासा हेकेखोर असल्याने ऐकेल की नाही याबद्दल जरा शंका होती पण इतकी महत्वाची गोष्ट तशीच सोडून देणं शक्यच नव्हतं. नीताचं मन शांत झालं.

दुपारी चार वाजता बाहेरची डोअरबेल वाजली. यावेळी कोण आलं असेल हे कळेना. पीप होल मधून पाहिलं तर मनोहर काळे बाहेर उभे.

नीताने दार उघडलं. काळे बाहेरूनच म्हणाले, “आत येत नाही, हे कागद द्यायचे होते रमेशला. नजरेखालून घाला म्हणावं, उद्या बोलू आपण.”

नीता दारातून बाजुला झाली आणि म्हणाली, “आत आलात तर बरं. या प्रॉजेक्टबद्दल काही प्रश्न विचारायचेत मला. बरेच निगेटिव्ह पॉइंट दिसतायत त्यात.”

काळे क्षणभर तिथेच उभे राहिले, स्वत:शीच हसले. आत येता येता म्हणाले, “ही वेळ येणार नाही अशी आशा होती मला, पण आता नाईलाज आहे, नीता शिरूरगावकर पाटील! मलाच विचारायचेत प्रश्न तुम्हाला.”

नीता गोठून गेल्यासारखी तिथेच उभी राहिली.

“मी ओळखतो तुम्हाला. आणि हो, एके काळी कोल्हापुरात तुम्ही एकदमच फेमस झाला होतात. विलास भोसले आठवतात का? की मी जागी करू आठवण?”

नीता काहीच बोलू शकली नाही. तिचे हात पाय गार पडू लागले.

“आठवण नसेल तर हे फोटो, हा व्हिडिओ तुमच्या स्मरणशक्तीला चालना देतील” . आणि एवढे बोलून काळेंनी त्यांचा मोबाईल बाहेर काढला, मोबाईलचे बटण दाबले आणि एक व्हिडिओ सुरू केला. त्या जुन्या, परिचित व्हिडिओचे ते भयानक पार्श्वसंगीत सुरू झालं.

“बंद करा ते.” नीता ओरडली. “ते विडिओ, फोटो सगळे खोटे आहेत. माझा चेहरा मॉर्फ केलाय त्यानी, फक्त आमच्या कुटुंबावर सूड उगवायला केलं होतं त्यानी. हे सगळं पोलीस चौकशीत सिध्द झालं होतं आणि त्याला शिक्षाही झाली होती.”

“तसं असेल हो,” काळे म्हणाले ,”पण सुरवातीला ही सनसनाटी बातमी कॅालेजमधून बाहेर फुटली तेव्हा फार फेमस झाला होतात तुम्ही. नंतर सगळं खोटं सिध्द झालंही असेल हो, पण महिनो न महिने अशा केसचा पाठपुरावा कोण करतो!”

नीताला बोलायला काही सुचेना.

मग काळेच पुढे म्हणाले, “आणि रमेशला सांगितलाय तुम्ही हा तुमचा ढगाळ इतिहास? आणि आहे माहिती त्याला तुम्ही कोल्हापुरातुन कशा अचानक गुप्त झालात ते?”

सगळं रमेशला सांगायचं होतं. पण त्यावेळी वेळच मिळाला नाही, आणि नंतर ….नंतर त्याची आवश्यकता वाटली नाही. पण याच एका चुकीमुळे अनर्थ कोसळण्याची शक्यता होती.

तिच्या गप्प बसण्यामधे काळेना त्यांचं उत्तर मिळालं.

उठता उठता काळे म्हणाले, “द्या ते पेपर रमेशला संध्याकाळी. आणि डोन्ट ॲक्ट स्मार्ट”.

काळे निघुन गेले.

नीताने सोफावर अंग झोकून दिलं आणि डोळे मिटून घेतले. तिच्या दोन्ही डोळ्यांतून आसवांच्या धारा वाहू लागल्या. तिचा जुना इतिहास, तिच्यावर रचले गेलेलं ते कुंभांड, सगळं, सगळं रमेशच्या जवळ बसून त्याला सावकाश सांगायचं होतं. पण त्याला वेळ हवा होता. घाई गडबडीत सांगताना पति पत्नीमधील

a

विश्वासाला तडा जाण्याचा संभव होता आणि तो तडा सांधण्याच्या पलीकडेही जाऊ शकला असता.

मोबाईलची बेल वाजली. रमेशचा फोन. ऑफ शोअर टीम्स बरोबर एकापाठोपाठ एक मीटिंग्ज लागल्या होत्या, परतायला खूप उशीर होणार होता, तू जेवून घे. असा निरोप देऊन रमेशने घाईने फोन बंद केला.

रमेश घरी येईपर्यंत रात्रीचे दहा वाजले होते. नीता जागीच होती. मायक्रोवेव्ह मधे गरम करून नीताने वाढून घेतलं. इतक्या उशीरा काळेचे कागद त्याला दाखवायचं कारण नव्हतं.

पण उद्याचं काय, परवाचं काय? रमेश ते कागद वाचणार, काळेंवर विश्वास ठेवणार आणि नको ते निर्णय घेणार. नीता विचार करत होती. काळे आपली लुटालूट करत असताना आपण घाबरून गप्प बसायचं की रमेशला सविस्तरपणे सगळं सांगून अनर्थापासून वाचण्याचा प्रयत्न करायचा. व्यवस्थित विचार न करता टाकलेल्या पवित्र्यांपासून यशाची खात्री कोणीही देऊ शकणार नव्हतं. इकडे आड, तिकडे विहीर अशी परिस्थिती निर्माण झाली होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी गडबडीनेच रमेश निघून गेला. कामाच्या रामरगाड्यापुढे इन्व्हेस्टमेंटचा विषय त्याच्या मनात थोडा मागे पडला असावा, पण मनातून निघुन जाणे शक्य नव्हतेच.

नऊ वाजले. नीताला क्लासचा अभ्यास करायचा होता, प्रॉजेक्टवर्कसाठी तयारी करायची होती. पण कशातही लक्ष लागेना.

शेवटी नीता उठली, किल्या घेतल्या. गाडी बाहेर काढली आणि कॅाइट रोडवरच्या साईमंदिरात ती गेली. साईचरणांवर डोके ठेवून लवून नमस्कार केला. या पेंचप्रसंगातून सुटका करण्यास परमेश्वराशिवाय दुसऱ्या कोणाचाही आधार तिला

दिसत नव्हता. नुकतीच आरती झाली होती. कोणा भक्ताने आणलेले प्रसादाचे ट्रे बाजूला ठेवले होते. नीताने प्रसाद घेतला, थोडा वेळ तेथेच बसून प्रार्थना केली आणि परत घरी आली.

क्लासचं मटीरिअल डाउनलोड करण्यासाठी तिने लॅपटॉप उघडला.

तेवढ्यात मोबाइलची रिंग वाजली. 91 चा अन् नोन नंबर, इंडिया कॉल. भारतात रात्रीचे आठ वाजले होते.

नीताच्या कोल्हापूरच्या फार जुन्या मैत्रिणीचा, सीमाचा फोन होता. “नीता, अमेरिकेत जाऊन पोहोचलीस नं, अभिनंदन.” सीमा म्हणाली. “काल आरती जोग भेटली होती. तिच्याशी तू कॉन्टॅक्ट ठेवून आहेस नं. अगं तिच्या मोबाईलवर तू पाठविलेले तुझ्या अमेरिकेच्या वेलकम पार्टीचे चार फोटो बघितले. खूप आनंद झाला. आणि पुढेही शिकतेस नं, म्हणे”!

“सीमा, किती वर्षांनंतर तुझा आवाज ऐकला. खूप बरं वाटलं बघ. अगदी शाळा कॉलेजची आठवण झाली”. नीता आनंदाने म्हणाली.

“तुझ्याभोवती इथे नेहमीच मित्रमैत्रिणींचा गोतावळा असायचा. तिथेही जमवलेले दिसतायत.” सीमाने पुढे विचारलं, “पण काय गं नीता, तो मनू काळेले कसा घुसला तुझ्या ग्रुपमधे?”

“कोण मनु काळेले? या नावाचा कोणीच नाही!”. नीता उद्गारली.

“तुझ्या नवऱ्याच्या बाजुलाच आहे बघ एका सेल्फी मधे, हनुवटीवर चामखिळ आहे बघ त्याच्या”. सीमा म्हणाली.

नीताच्या डोक्यात प्रकाश पडला. “मनोहर काळेंबद्दल बोलतेस का? ते आमच्या कॉम्प्लेक्समधेच राहतात. पण तू कशी ओळखतेस त्याना?” नीताने विचारले.

a

“अगं तो नक्की आहे मनु काळेले. आपल्या कॅालेजमधे केमिस्ट्री लॅब मधे डेमॉन्स्ट्रेटर होता. तू आर्टस् ला असल्यामुळे तू ओळखत नाहीस त्याला. चांगला नाही माणुस तो. कॅालेजमधे शिकवण्याबरोबर इतरही अनेक उद्योग होते त्याचे. आणि नीता, कहर म्हणजे मुलांना ड्रग्ज पुरवल्याच्या संशयावरून पकडला होता पोलिसांनी त्याला. माफी मागून सुटला तेव्हा, पण आपल्या कॅालेजने काढून टाकलं होतं त्याला.” सीमा म्हणाली.

“ही तर फारच महत्त्वाची गोष्ट समजली. सीमा, त्याचे पूर्ण डीटेल्स दे तू मला.” नीताने सीमाला सांगितलं आणि मनू काळेले उर्फ मनोहर काळेची सर्व माहिती मिळवली.

हातात आयुधं आल्यावर कोणाही योध्दयाला स्फुरण चढतं. मनोहर काळे विषयीची सर्व माहिती नीताने संगतवार लिहिली. त्याच्या वॅको इथल्या फार्म लॅंड प्रॉजेक्टबद्दल तिने स्वत: केलेली टिपणे, तिच्या मनात उठलेली प्रश्न चिह्ने, आक्षेपांचं जाळं, सगळं सगळं लिहून काढलं आणि रमेशची वाट पहात बसली. मनोहर काळेचा काटा यशस्वी रीतीने काढण्यासाठी तिला आयुधांबरोबर कुमकही पाहिजे होती.

रमेश चा दिवस बरा गेला असावा. रिलॅक्स्ड मूडमधेच तो घरात शिरला. खाणे पिणे, चहा पाणी झाल्यानंतर रॅकेटला हात लावण्यापूर्वीच नीताने त्याला थांबवले. “बस जरा, थोडं फार महत्त्वाचे बोलायचंय.” नीता म्हणाली. आणि मग, हळू हळू, सध्या कमी महत्त्वाच्या असलेल्या गोष्टीना थोडीशी बगल देत तिने सगळ्या गोष्टी रमेश समोर मांडल्या.

वॅको फार्मलॅंडच्या किमती बद्दल, तिथल्या डेव्हलपमेंटच्या शक्याशक्यतेबद्दल काळेंनी जी थापाथापी चालवली होती ते बघून रमेशला धक्काच

बसला. नीताने नंतर रमेशला काळेच्या कोल्हापुरातल्या कारवायांबद्दल, विद्यार्थ्यांना ड्रग्ज पुरवण्याच्या गुन्ह्याबद्दल साद्यंत माहिती दिली.

"त्याला सरळ पोलिसांच्याच हवाली करतो." रमेश म्हणाला. पण नीताला काही ते पटेना. त्यापेक्षा, पोलिसांची, हद्दपारीची टांगती तलवार त्याच्या डोक्यावर कायम ठेवली तर आपल्या वाटेला कधी तो जाणार नाही याची हमी तरी मिळेल.

रात्री साडेआठच्या सुमारास काळेचा फोन आला, "रमेश, वॅको प्रॉजेक्टबद्दल पुढे बोलायचंय ना आपल्याला?" काळेने विचारलं.

"काळे, मला इंटरेस्ट नाही त्या प्रॉजेक्टमधे. त्यामुळे पुढे काही बोलण्यासारखे नाही" . रमेश म्हणाला.

"अरे, कालपर्यंत तर तुम्ही जवळ जवळ तयार झाला होतात, कोणी काही चुकीची माहिती दिली काय तुम्हाला? अहो विश्वास नका ठेवू भलत्या सलत्यांवर आणि गैरसमज करून घेऊ नका. त्या लोकांचे स्वत:चेच पाय खोलात असतात." काळेने आरडा ओरडा, कांगावा करायला सुरुवात केलेली दिसली.

रमेश शांतपणे म्हणाला, "गैरसमज आधी झाला होता काळे, आता व्यवस्थित समज आली आहे. कोल्हापूरच्या मनु काळेलेच्या बेकायदेशीर ॲक्टिव्हिटीज बद्दल, ड्रग्जच्या व्यवहारांबद्दल बरीच माहिती माझ्या हातात आली आहे. सध्या मी ही माहिती माझ्याकडे ठेवतोय पण तुम्ही भाग पाडले तर पोलिसांकडे द्यायला कचरणार नाही, तेव्हा आमच्या कुटुंबापासून दूर राहण्याची काळजी घ्या.. आणि हो, तुमचं इथलं अवतारकार्य संपलंय असं समजा आणि आठवड्याच्या आत इथून चंबुगबाळं हलवा, मनोहर काळे उर्फ मनु काळेले!"

नीता कडे वळून रमेश म्हणाला, "तुझ्या फायनान्सच्या नॉलेजमुळे आणि कोल्हापूरपर्यंतच्या नेटवर्किंग मुळे आपण वाचलो, नीता.

“देवाचे आभार आपल्याला या संकटातून आपल्याला वाचवल्या बद्दल आणि अशा माणसाच्या कचाट्यातयातून आपल्याला कायमचे सोडवल्याबद्दल”. नीता म्हणाली.

“आता पुढची पावलं उचलायला पाहिजेत.” रमेश बोलू लागला, “पहिली प्रायॉरिटी म्हणजे आपार्टमेंट सोडून प्रशस्त घर घ्यायचं. कालच एजंटचा फोन आला होता. तिकडे हेजकॉक्स रोडला चांगली घरं विकाऊ आहेत म्हणे.”

“घर म्हटलं तर फर्निचर आलंच. दोनतीन हजार स्क्वेअर फूट घराला कितीतरी फर्निचर लागेल. मग एक मोठा टी व्ही फॅमिली रूम मधे आणि एक गेम रूम मधे.” नीता म्हणाली.

“गाडीचंही बघायला पाहिजे. दोन सेडनपैकी एक काढून त्याबदली एक एस यू व्ही घ्यायला पाहिजे.” रमेश म्हणाला. “एक गॅस बारबेक्यूही घेऊया. मागच्या पॅटिओ वर ठेवता येईल. एक पेट्रोल लॉन मोअरही लागेल, आपला स्वत:चा असावा.”

अशा तऱ्हेने या लॅंड ऑफ ऑप्पॉरच्युनिटीजमधे या इंडियन अमेरिकन दांपत्याचा भरभराटीचा प्रवास सुरू झाला.

सुमारे पंधरा दिवसानंतर रमेशला ऑस्टिन हून त्याच्या बॉसचा फोन आला, “अरे रमेश, वॅको लोकॅलिटी मधे छान इन्व्हेस्टमेंटची संधी आली आहे. फार्म लॅंड स्वस्तात मिळतायत. आर यू इंटरेस्टेड इन द डील?

रमेश मनात म्हणाला, या मनोहर काळेला जरा आणखी जोरात लाथ मारायला हवी होती. लांब गेला असता.

-------x-------

# चौथा टप्पा

"सर्किट सिरीज" कंपनीची फ्रिस्को, टेक्सासमधली मोठी इलेक्ट्रॉनिक उपकरणांची शोरूम. दुपारची वेळ. गिऱ्हाइकांची फारशी वर्दळ नव्हती आणि बाहेरचा उष्मा पाहता, घराबाहेर पडून शॉपिंग करत कोणी फिरत असण्याची शक्यताही कमी होती. त्यामुळे संदीप खानविलकर कोपऱ्यातल्या एका खुर्चीवर बसून डोळे मिटून काहीशा गुंगीत रिलॅक्स झाले होते.

"मिस्टर खान, अटेन्ड द कस्टमर अॅट बे फाइव". संदीपच्या इअरफोन मधुन आवाज आला. आणि लगोलग, "कोणीतरी येत आहे", असा दिलासा गिऱ्हाइकाला देण्यासाठी तीच अनाउन्समेंट दुकानाच्या साउंड सिस्टिमवर सुध्दा झाली.

एक छोटासा आळस देऊन संदीप खानविलकर तत्परतेने जागचे उठले.

अमेरिकेत काम करायचं म्हणजे आपल्या भारतीय नावांना तिलांजली द्यावी लागते हे सर्वांनीच अनुभवलंय. का कोण जाणे, पण आपल्या नावांचा नैसर्गिक उच्चार करायला त्यांची जीभ वळत नाही आणि तोंडाचं बोळकंही पाहिजे तो आकार घेत नाही. आणि मग जी काही तडजोड होते, ती स्वीकारावी लागते.

संदीप खानविलकर या नावाला दोन शॉर्टफॉर्म पर्याय होते. संदीपचा सॅंडी आणि खानविलकरचा खान. नाम धारकाची मुभा असो वा नसो, लोक राजरोसपणे आणि अगदी नि:शंकपणे यातला कोणताही पर्याय वापरायचे, अगदी लाडात आले असले की सॅंडी खानही म्हणायचे.

बे फाइव, विभाग क्र ५, ऑडिओ व्हिजुवल मनोरंजनाची कक्षा. ही खानविलकरांची जबाबदारी होती, निदान त्यांच्या शिफ्ट पुरती. शोरूममधे दोन शिफ्टस्. सकाळी दहा ते दुपारी चार पहिली शिफ्ट, आणि दुपारी चार ते रात्री दहा पर्यंत दुसरी शिफ्ट. सकाळी ग्राहकांची विशेष वर्दळ नसल्यामुळे पहिल्या शिफ्टला आल्यावर फ्रन्टलाईन स्टाफला, स्टॉक एपडेट, अकाउंट अपडेट, विक्री डेटा एन्ट्री टॅली, वगैरे बरीच कारकुनी कामेही असायची. आणि जर संध्याकाळी ग्राहकांची वर्दळ फारच जास्त असेल तर पहिल्या शिफ्टच्या माणसाला दुसऱ्या शिफ्टसाठी सप्लिमेंटरी म्हणून एक दोन तास ओवरटाईम ड्यूटी करायला लागायची. कंपनीचं काम शिस्तीत. बहुतांशी नियमबध्द. त्यामुळे ऑइलिंग केलेल्या यंत्रावत सुरळीत सगळे व्यवहार चालायचे.

संदीप खानविलकरांनी पंचवीस वर्षं ठाण्याच्या लुकास इलेक्ट्रॉनिक्स कंपनीत काम केलं आणि शेवटी एन्टरटेनमेंट इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे जनरल मॅनेजर म्हणून ते रिटायर झाले. टेलीविजन, ऑडिओ सिस्टिम वगैरे आधुनिक उपकरणे त्यांच्या उत्क्रांत अवस्थेतून जाताना पाहिल्यामुळे खानविलकराना त्यांच्या टेक्नॉलॉजी बद्दल, प्रत्येक मॉडेलच्या खुबीबद्दल, गुणावगुणाबद्दल चांगली माहिती होती. आणि म्हणूनच, रिटायर होताना, “पुढे काय?” हा प्रश्न त्यांच्या समोर आ वासून उभाही नव्हता. जगात कुठेही मी कमवीन अशा पूर्ण आत्मविश्वासाची शिदोरी घेउनच संदीप खानविलकर लुकास इलेक्ट्रॉनिक्स मधून निवृत्त झाले.

खानविलकरांचा रोहन इंजिनियर झाला आणि लगेच पुढच्या शिक्षणासाठी अमेरिकेला गेला. तो परतून काही येणार नाही हे खानविलकराना माहित होतं, पण त्याना त्याची फारशी चिंता नव्हती. निवृत्ति अजून पंधरा वर्षं दूर होती, अंगात रग होती, भविष्याची तशी चिंता नव्हती.

खानविलकरानी लुकासमधुन निवृत्त झाल्यावर, दोन एक वर्षं कानपुरला इलेक्ट्रॉनिक कंपनीमध्ये कॅान्ट्रॅक्टवर कन्सल्टंट म्हणून काम केलं. थोडा बहुत पैसा मिळाला खरा, पण निवृत्तिपूर्व काळात हातात असलेले अधिकार, लोकांवरील जरब, चार चौघातला मानमरातब वगैरे, जे गेले ते काही परत आले नाहीत. रोहन अमेरिकेला बोलावित होता. खानविलकरानी पाहिलं होतं की निवृत्तीनंतर लोक पाच सहा महिन्यांसाठी म्हणून अमेरिकेला जातात आणि दोन महिन्यातच कंटाळून परत येतात. खानविलकरांना तसं करायचं नव्हतं. तिथे जायचं तर स्वस्थ नाही बसायचं. तिथल्या गतिमान आयुष्याचा भाग व्हायचं. आणि त्याना खात्री होती कि एन्टरटेनमेंट इलेक्ट्रॉनिक्सच्या ज्ञानाच्या जोरावर त्याना तिथेही व्यवस्थित अर्थार्जन करता येईल.

रोहनला अमेरिकेत आता वीस वर्षं झाली होती. कालमानाप्रमाणे येणारे सर्व टप्पे पार करून आता तो अमेरिकेचा नागरिक झाला होता. त्याच्या स्पॅान्सरशिपखाली खानविलकरांना स्थलांतरित व्हिसा मिळाला आणि त्याअन्वयाने तेथे काम करण्याची मुभा हाती आली.

एक गोष्ट त्यानी पुरेशी ध्यानात घेतली नव्हती. भारतामधे उच्च पद भूषवून निवृत्त झाल्यावर भारतात त्या माणसाच्या वयाचा, अनुभवाचा, भूषवलेल्या वरिष्ठ पदाचा मान काहीशा प्रमाणात राखला जातो हे खरे, पण परदेशात काय! तडजोड? किती प्रमाणात? कोणकोणत्या बाबतीत? पर्यायी उपाय काही आहे का? नाना प्रश्न, पण त्याना स्टॅन्डर्ड उत्तर नाही. निवृत्त जनरल मॅनेजर संदीप खानविलकरांचं असंच काहीसं झालं खरं.

खानविलकरांचा अनुभव टि व्ही बनवायच्या फॅक्टरीतला. त्यामुळे त्याच प्रकारच्या व्यवसायात जर संधी मिळाली तर त्याना ती हवी होती. लगेच रोहनने

a

आपल्या मित्रमंडळीत चौकशी केली पण मग त्याना कळलं की हा व्यवसाय अमेरिकेत फारसा अस्तित्वात नाही. इथे टी व्ही सेट्स येतात ते सगळे चीन, कोरिया, थायलंड मधल्या बनावटीचे. किमतीला स्वस्त आणि चालतातही बऱ्यापैकी. त्यांचे पार्टही तिकडेच बनतात. त्यामुळे सगळं हल्ली बाहेरच्या बाहेर होऊन जातंय.

तेवढ्यात कोणी तरी माहिती पुरवली की अमेरिकेतली मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्री अजून पूर्ण लोपलेली नाही. नेट वर संशोधन करून तीन चार टी व्ही बनवणाऱ्या कंपन्यांचे नांव-पत्तेसुध्दा मिळवले. हे तर फारच उत्तम झालं.

रोहनच्या मदतीने खानविलकरांनी या सगळया कंपन्यांना फोन केले. त्यापैकी, सोनी टी व्हीच्या लायसेन्स खाली टी व्ही सेट बनवणाऱ्या जेफरसन सिटी, टेनेसी राज्यामधल्या एका कंपनी कडून चांगला प्रतिसाद आला. "इकडे या, पॅकेज निगोशिएबल" असा मेसेज सुध्दा आला.

"रोहन जरा जेफरसन सिटीला जायचं तिकिटं काढतोस का? जरा चाचपून तरी येतो, काही पक्का निर्णय घेण्याआधी". खानविलकरांनी मुलाला विचारलं. रोहन ने इंटरनेटवर तपास केला.

"बाबा, डल्लासवरून फ्लाइट घेउन नॉक्सविल ला जावं लागेल आणि पुढे पस्तीस मैल टॅक्सी. आणि बाबा, त्याच दिवशी परत यायला फ्लाइटचं वेळापत्रक जमत नाही. एक रात्र रहावं लागेल नॉक्सविलला. सगळे मिळून दोन हजार डॉलर खर्च आहे, बाबा." रोहन ने माहिती पुरवली.

त्याच संध्याकाळी जेवता जेवता या विषयावर संभाषणाला तोंड फुटले. ललिताने म्हणजे सुनबाईनी सुचवले, "बाबा, अमेरिका आता मोठ्या प्रमाणात उपभोक्त्यांचा देश झालाय. कारखानदारीपेक्षा दुकानदारी जास्त वाढलीय. बाबा,

माल वितरणाच्या, म्हणजे दुकानदारीच्या क्षेत्रात तुम्हाला जास्त वाव मिळेल कदाचित.”

“हो बाबा, ललिता बरोबर बोलतेय”, रोहनने पत्नीची री ओढली. “बाबा, इथे जवळच फ्रिस्कोच्या मॉलमधे “सर्किट सिरीज” आणि “बेस्ट बाय” ही मोठी इलेक्ट्रॉनिकची दुकानं आहेत. तिथल्या सुपरमार्केट मधेही इलेक्ट्रॉनिकचा मोठा विभाग आहे. ही सगळी दुकानं माझ्या ऑफिसला जाण्या येण्याच्या रोजच्या वाटेवरच आहेत. बाबा, तिकडे बघायचं का?”

अगदीच घायकुतीला आलेल्या बाबांनी मुक संमती दिली.

आणि संदीप खानविलकराना “सर्किट सिरीज” मधे “सिनिअर एक्झिक्यूटिव्ह, कस्टमर रिलेशन्स, व्हिडिओ अप्लायन्सेस”, उर्फ, साध्या भाषेत, टी व्ही सेल्समन, म्हणून नोकरी लागली. त्या पदाला पगार होता ३० डॉलर तासाचे, पण खानविलकरांची एकंदर पार्श्वभूमी पाहून त्याना तासाचे ३५ डॉलर पगार दिला गेला. दिवसाचे सहा तास, महिन्याचे पंचवीस दिवस. सुमारे महिन्याचे साडे चार हजार डॉलर नक्की. सुट्टी घेतल्यास कमी, ओवरटाईम झाल्यास जास्त. प्रतिभाताईनी म्हणजे मिसेस खानविलकरनी पुण्यातल्या त्यांच्या बहिणीला कळवून टाकलं की यांना इकडे चांगला महिन्याला पावणेचार लाख पगार आहे, (रुपये, अर्थात).

“बाबा, सकाळी माझ्याबरोबरच निघत चला तुम्ही. तुम्हाला दहाला पोहोचायचंय पण अर्धा एक तास आधी पोहोचाल.” रोहनने सांगितलं. “आणि बाबा, पार्किंग लॉटच्या दुसऱ्या बाजुला मदुराई कॅफे आहे. त्याचा मालक रामण्णा ओळखीचा आहे माझ्या. तुमचं शॉप उघडलं नसेल तर तिथे बसू शकता तुम्ही थोडा वेळ. संध्याकाळी मात्र मला पाच सव्वापाच वाजणार. आधी कोणाची लिफ्ट

मिळाली तर निघुन जा तुम्ही, नाहीतर मदुराई कॅफेमधे तासभर थांबावं लागेल. चालेल ना?"

चालवून तर घ्यायलाच पाहिजे होतं. इलाजच नव्हता. खानविलकराना कामाचं टेन्शन, कामाचा त्रास वाटत नव्हता, पण जेथे बस, ऑटोरिक्शा बगैरेचं नामोनिशाण नाही अशा या अति प्रगत देशात थोडीबहूत तडजोड तर करावीच लागणार होती.

"मिस्टर खान, अटेन्ड द कस्टमर ॲट बे फाइव". खानविलकरांचा इअरफोन परत किरकिरला.

खानविलकरानी पाहिलं, बे फाईव ला एक दांपत्य उभं होतं. भारतीय किंवा पाकिस्तानी असावेत असं वाटत होतं. खानविलकरानी आपलं कमर्शियल सुहास्य चेहऱ्यावर आणलं आणि बे फाईव ला ते पोहोचले. खानविलकर जवळ पोहोचता पोहचताच ते सद्गृहस्थही हसले आणि दिलखुलासपणे म्हणाले, "अस्सलाम आलेकुम खानसाब".

हा अनुभव खानविलकराना नवीन नव्हता. खान नाव ऐकून बऱ्याचदा अपरिचित व्यक्तींनी संभाषणाची सुरुवात अशीच केली होती

"वालैकुम सलाम", खानविलकरानी यथोचित प्रतिसाद दिला. नंतर मात्र खानविलकरानी आंग्ल भाषेचा आश्रय घेऊन गिऱ्हाइक दांपत्याला विचारलं की ते त्यांची काय सेवा करू शकतील!

सद्गृहस्थानी हिंदी-उर्दूमधे समजावलं की आदल्या दिवशी संध्याकाळी ते एकटेच शोरूम मधे आले होते आणि एक टी व्ही सेट त्याना आवडला होता, त्याची किंमत ५००० डॉलर लावली होती. पण त्या सेटच्या शेजारी दुसरा एक त्याच

a

आकाराचा सेट ठेवलेला होता, त्याची किंमत ४५०० डॉलर लावली होती. या दोन सेट मधला फरक त्यांना समजाऊन घ्यायचा होता. त्यासाठी ते परत आले होते. दोघंही आले होते. "क्या, आप हमें बता सकते हैं?"

या विषयात तर खानविलकरांची मास्टरी होती. त्यामुळे पुढची दहा मिनिटे सोप्या इंग्लिश भाषेत, मोठं तांत्रिक शब्दजंजाळ न वापरता, खानविलकरानी त्या दोन्ही सेटमधले गूण, खुब्या, असलेले फीचर्स, अगदी सगळं समजाऊन सांगितलं. मग त्याच्याशी निगडित किमतीतला फरक, डिस्काउंट वगैरेचीही माहिती दिली.

गिऱ्हाइक दांपत्याने खुष होऊन "समजलं" या अर्थाने माना डोलावल्या.

सद्गृहस्थ म्हणाले , "आपका टेक्निकल नॉलेज बहुत अच्छा है | शायद आपने कुछ ट्रेनिंग लिया है!"

खानविलकर आंग्ल भाषेतच उत्तरले की पूर्वी त्यांनी टी व्ही बनवणाऱ्या कंपनीत बरीच वर्षे काम केलंय.

"ऐसा, बहोत खूब". सद्गृहस्थ म्हणाले.

त्या सद्गृहस्थांचाही इलेक्ट्रॉनिक व्यवसायाशी हार्डवेअर सप्लायर म्हणून संबंध होता म्हणे. इंडियात असताना, महाराष्ट्रातल्या आणि गुजरातमधल्या बऱ्याच कंपन्याना पुशबटन, मायक्रो पुशबटन, टच पॅड, टच स्विच, पावर सप्लाय युनिट, असे हार्डवेअर ते पुरवत असत. जवळ जवळ मोनॉपोली होती म्हणे.

आणि "बिजनेस बहोतही अच्छा चल रहा था"|

पण म्हणे ठाण्यातल्या लुकास कंपनीत कोणी नवा जनरल मॅनेजर आला कानविले की काय अशा नावाचा, आणि प्रॉब्लेम झाला. त्याने म्हणे सगळी सिस्टिमच बदलून टाकली.

"मेरे एजंट ने उसे डबल कट ऑफर किया, पर वो गधा माना नही"|

शेवटी म्हणे बाकीचे अनेक सप्लायरही आले, चढाओढ आली आणि प्रॉफिट मार्जिन एवढं कमी झालं, की, “धंधा करनेमे कुछ चार्मही नही रहा|”

सद्गगृहस्थांचं हे सर्व बोलणं ऐकून खानविलकराना घाम फुटायला लागला.

कोटाच्या वरच्या खिशातला रुमाल त्यांनी आपली नेम प्लेट झाकली जाईल अशा तऱ्हेने ॲडजस्ट केला.

सदगृहस्थानी दबलेल्या आवाजात माहिती पुरवली की त्या कानविल्याचा त्याना एवढा राग आला होता म्हणे, की त्याला समज द्यायला कोणा गुंडाला सांगितलंही होतं. तेवढ्यात म्हणे तो कानविल्या रिटायर होऊन कुठेतरी निघुन गेला.

सद्गृहस्थांची ही आतषबाजी चाललेली असताना श्रीमतीजी जरा शरमिंद्या झाल्या आणि न राहवून म्हणाल्या, “भाईसाब, इनकी बाते नही मानना जी| उस कमीनेसे ये बहोत नफरत करते हैं |”

सद्गृहस्थानीही मग स्वत:ला आवरलं. “चलिये, रहने दीजिये | विदा लेते है अभी, परसो मंडे आकर फायनल करेंगे. खुदा हाफीज |” असे बोलून गिऱ्हाइक दांपत्य निघून गेले.

खानविलकर शेल्फचा आधार घेऊन बे फाइव्हलाच काही वेळ उभे राहिले.

“गुंडाला सुपारी!?” खानविलकराना घाम फुटला आणि हुडहुडीही भरली. कसेबसे चालत ते स्टाफरूममधे गेले आणि धप् दिशी खुर्चीवर बसले. घटाघटा पाणी प्यायले. मग रोहनला फोन लावला. “रोहन, ……त त त त प प प.. अरे मी…. मला”

“काय बाबा, बरे आहात नं?” रोहनने काळजीने विचारलं.

“घरी जायचंय, …….बरं नाही.” खानविलकरांनी जेमतेम सांगितलं.

"बाबा, येतो मी तासाभरात, तुम्ही मदुराई कॅफेमधे रामण्णाच्या ऑफिसमधे जाऊन बसा. मी फोन करतो त्याला". रोहन म्हणाला, आणि तो दिवसाचं काम वाइंडअप करण्याच्या मागे लागला.

शॉप मॅनेजरला सांगून खानविलकर सर्किट सिरीज शोरूमच्या बाहेर पडले, मदुराई कॅफेमधे पोहोचले. रामण्णाने गरम फिल्टर कॉफीचा कप त्यांच्या हातात दिला आणि त्याना ऑफिसमधे बसवलं. खानविलकर जरा रिलॅक्सड झाले.

जरा शांत झाल्यावर खानविलकर विचार करू लागले. असे खुनी प्रवृत्तीचे आपले आणखी किती शत्रू इथे मोकाट सुटले असतील कोण जाणे! इथे रहाणं काही सुरक्षित वाटत नाही. भारतात आपल्या वरच्या थराला ओळखी पाळखी असतात, गुंडांना जरा जरब असते. इथे काय? जर त्या गृहस्थाला कळलं असतं की त्याच्या ध्याना मनी कायम वसलेला शत्रू कानविल्या म्हणजे मीच, तर कोणी सांगावे, तिथेच कदाचित त्याने रक्तपात केला असता.

ऑफिसचं दार उघडून कप घेउन जायला वेटर आत आला. खानविलकर सावध झाले. वेटरच्या हालचाली लक्षपूर्वक पाहू लागले. वेटरने कपचा ट्रे बाजूला ठेवला आणि खिशात हात घातला. आता पिस्तुल किंवा चाकू निघणार या भीतीने खानविलकर उभे राहिले. वेटरने खिशातून दोन टिश्शू पेपर काढले, टेबल साफ केलं आणि ट्रे घेऊन तो निघून गेला.

खानविलकरांनी विचार केला, असं जीव मुठीत धरून फुल ॲलर्ट किती दिवस राहू शकणार? उद्यापासून "सर्किट सिरीज"ला राम राम आणि परवा अमेरिकेला राम राम ठोकावा झालं.

तेवढ्यात रोहन आला. रामण्णाला थॅंक्स देऊन खानविलकर रोहनबरोबर निघाले. रोहनने त्याना एका शब्दानेही काही विचारलं नाही. जेव्हा जमेल तेव्हा बाबा आपल्याला सगळं संगतवार सांगतील याची खात्री होती त्याला.

a

गाडीत बसल्या बसल्या खानविलकरांनी मनात शब्दांची जुळवा जुळव केली. मग त्यांनी घसा खाकरला. “रोहन, इंडियाला जायला लागणार आहे जरा”, खानविलकर म्हणाले. “ ठाण्याच्या टिकुजीनी वाडी जवळच्या आपल्या फ्लॅटच्या रिपेरीचं बरंच मोठं काम करायचंय आणि गावाकडच्या जमीनीच्या सात बाराचंही काम निघालंय. आमची परवाची तिकिटं काढतोस का?”

“अहो बाबा, असे झटक्यासरशी निर्णय थोडेच घेता येतात!” रोहन म्हणाला. “तुम्हाला जायचं असेल तर जरूर जाऊ शकता, पण तुमच्या कमीटमेंट्स, देशाचे नियम वगैरे विचार करून मग तिकिटाचे बघायचं”.

थोडं थांबून रोहन म्हणाला, “ सर्किट सिरीजमधे तुम्ही कॅान्ट्रॅक्ट जॅाब करताय. पहिला टप्पा म्हणजे, तिथे राजिनामा दिला पाहिजे. नोटीस पिरियड वगैरेचे काही नियम असतील, त्यांचे पालन केलं पाहिजे. दुसरा टप्पा म्हणजे तुमचा हा वर्किंग व्हिसा आणि ग्रीनकार्ड अर्ज यांच्या संदर्भात देश सोडण्याचे आणि पुनरागमनाचे काय नियम आहेत ते पाहिलं पाहिजे. आणि बाबा तिसरा टप्पा म्हणजे तिकिटांची अवेलिबिलिटी. हे सगळं होऊन मगच चौथा टप्पा, म्हणजे विमानात पाय ठेवायचा. काय, पटतंय ना?”

गंभीर आणि तणावाचे वातावरण थोडे शिथिल करण्यासाठी, हास्याचा एक फवारा सोडून रोहन म्हणाला, “आणि हो, बाबा, या सगळ्यावर व्हेटो गाजवण्याचा अधिकार आईला आहे, हे विसरू नका हं”.

खानविलकरही हसले आणि वातावरणातला तणाव निघून गेला.

घर आलं. “येतोय” म्हणून रोहनने पुढे कळवलंच असल्याने चहा, कुकीज तयारच होते. सोबतीला एका प्लेटमधे खानविलकरांची आवडती बाकरवडीही ठेवलेली दिसली. मग काय, आनंदी आनंद.

चहा झाल्यावर मात्र “जरा पडतो”, असे म्हणत खानविलकर थेट आपल्या बेडरूम मधे गेले आणि डोळे मिटून पडले. भेडसावणाऱ्या सावल्यांना हाकलता हाकलता त्याना चांगली गाढ झोप लागली.

अर्धा तास गाढ झोप झाल्यावर खानविलकर एकदम फ्रेश उठले. दहा बारा फुटी बागुलबुवा आता मॅनेजेबल चार पाच फुट लहान झाला होता. तरी शेवटी बागुलबुवा तो बागुलबुवाच ना? पडल्या पडल्या खानविलकर विचार करू लागले. सुदैवाची गोष्ट म्हणजे आजच्या राक्षसाने त्याना समक्ष कधी पाहिलं नव्हतं. पण त्याचे इतर कोणी बांधव जर त्यांचा चेहरा ओळखणारे असतील तर?? आता बाहेर वावरताना थोडं वेषांतर करुन, म्हणजे जास्त काही नाही, पण काळा चष्मा लावून फिरावं, दाढी मिशा वाढवाव्या किंवा खोट्या लावाव्या असे विचार त्यांच्या मनात यायला लागले. चौथा टप्पा गाठेपर्यंत सुरक्षेचे उपाय केलेच पाहिजेत.

खानविलकर उठून बाहेर आले. प्रतिभाताई तिथेच होत्या. “या, उठलात? बरं वाटतंय नं आता”? प्रतिभाताईंनी चौकशी केली. खानविलकरांनी मान डोलावली.

“आज कधी नव्हे ते लवकर आला आहात, चला, रसेल क्रीक पार्कला फिरून येऊ. मोकळी हवा मिळेल आणि मित्र मंडळीही भेटतील.” प्रतिभाताईंनी सुचवले.

“नको, नको”. खानविलकर म्हणाले. “मोकळी हवा आपल्या बॅक यार्ड मधेही आहे. तिथे लॉनवर बसू या दोघं खुर्च्या टाकून. आय पॅडवर झी मराठीचं सिरियलही बघता येईल.”

प्रतिभाताईंची हरकत नव्हती.

a

रात्री जेवणाच्या टेबलावर खानविलकरांनी भारतात जाण्याचा मनोदय जाहिर केला.

रोहन म्हणाला, “जायला हरकत नाही पण नीट कायदेशीरपणे एक्झिट प्रोसेस करायला हवा म्हणजे कधीही परत यायची आणि काम करायची मुभा राहील”.

ललिता म्हणाली, “छान वाटेल तिकडे तुम्हाला आई, जुन्या मैत्रिणींना भेटून, मामांना भेटून”.

प्रतिभाताईंनी मान डोलावली.

रात्री झोपण्याआधी गोळ्या घेताना प्रतिभाताईंनी विचारलं खानविलकरांना, की ऑफिसमधे काही वेडंवाकडं झालं का आज, एवढं तडकाफडकी इंडियाला जायचा निर्णय घेण्यामागे?

मग खानविलकरांचा बांध फुटला आणि घडाघडा त्यांनी जे काही घडलं ते सांगितलं. प्रतिभाताईनी सगळं ऐकून घेतलं आणि त्यानाही प्रसंगाचं गांभीर्य ध्यानात आलं. खानविलकरांच्या निर्णयाला पूर्ण दुजोरा देत त्यानी अंगावर ब्लॅंकेट ओढून घेतलं.

वीक एन्ड आला. रोहनने लॉनच्या, बगीच्याच्या मशागतीची कामं काढली. घराच्या कौलाच्या कामाचं एस्टिमेट द्यायला कोणी मेक्सिकन कॉन्ट्रॅक्टर आला. अशा तऱ्हेने वेळ घरातल्या घरातच बरा गेला. खानविलकर सावध होते. चौथा टप्पा, विमानात पाय, कसा लवकर गाठता येईल याचा विचार करत होते.

रविवारी एक एक तास खर्चून त्यानी आपलं राजीनामा पत्र लिहिलं आणि त्यात शेवटी, “मला कृपया ताबडतोब मोकळे करावे”, अशी प्रार्थना केली.

a

सोमवार आला. मनावर दगड ठेवून खानविलकरांनी बॅग उचलली आणि रोहनबरोबर गाडीत येऊन बसले. छातीत नेहमीपेक्षा जरा जास्तच धडधडत होतं. कोटाच्या आतल्या खिशात ठेवलेलं राजिनामा पत्र त्यानी चाचपलं.

शोरूमला पोहोचेपर्यंत साडे नऊ वाजले होते. स्टाफचा छोटा दरवाजा उघडायची वेळ. यावेळेपर्यंत सिक्युरिटी गार्ड स्टाफ मेंबर्सचे आय डी तपासून एकेकाला आत सोडायला उभा असतो. पण आज बाहेर स्टाफ मेंबर घोळक्याने उभे होते आणि शोरूमचा छोटा दरवाजाही बंद होता.

खानविलकर गाडीतून उतरले. कुतुहलाने रोहन सुध्दा त्यांच्या मागोमाग उतरला.

शोरूमच्च्या दरवाज्यावर नोटीस लावली होती.

“सर्किट सिरीज काही अपरिहार्य कारणांमुळे बेमुदत बंद आहे” आणि ग्राहकांच्या तसेच स्टाफ च्या सोयी साठी, संपर्क गाठण्यासाठी फोन नंबर. इ मेल आय डी दिले होते.

ग्राहकांचा, स्टाफचा घोळका वाढतच चालला होता. रोहनने बाबांना खुणावलं आणि दोघांनी तेथून काढता पाय घेतला.

“इंडियाला जाण्याच्या प्रोसेस मधला पहिला टप्पा संपला”. खानविलकरानी हुश्श करत सुस्कारा सोडला आणि देवाला हात जोडले, “देवा, पुढचे टप्पेही असेच पटापट पार पाड आणि चौथा टप्पा, -विमानात पाय,- येऊ दे रे लवकर.”

-------X-------

# कोळशाचा रंग काळा

अमेरिकेतल्या सान फ्रान्सिस्को शहरामधलं मोहन आणि संध्याचं घर. सकाळची वेळ.

"मोहन, अरे मोहन, एक काम कर, ओकलॅंड ते मुंबई, व्हाया जे. एफ. के. न्यू यॉर्क, दोन तिकिटं बुक कर ताबडतोब, लवकरात लवकरच्या फ्लाईटची". राजेंद्रने जावयाला फर्मान दिलं. "हो आम्हा दोघांची, अगदी ताबडतोब.

"डॅडी, ओकलॅंड एअरपोर्टहून कशासाठी? सान फ्रान्सिस्को इंटरनॅशनल एअर पोर्ट, म्हणजे एस एफ ओ वरुन डायरेक्ट मुंबई बुक करतो नं. पण डॅडी, एवढी घाई काय आहे? आणि माझी नाईट शिफ्ट संपेपर्यंत तरी इथे रहायचं तुम्ही कबूल केलं होतं नं?" मोहनने सासरेबुवाना विचारलं.

राजेंद्र जरा विचारात पडला. मग थोडं थांबून म्हणाला, "मग असं कर, माझं एकट्याचंच काढ. शैला राहिल इथे. पंजाबी लोक बायकांना रिस्पेक्ट देतात. तिला धोका नाही."

मोहन आणखीच बुचकळ्यात पडला. धोका? हे काय चाललंय? हा तोंड चुकवून पळ काढल्यासारखा काय प्रकार आहे? कोणी हात धुवून मागे लागलंय कि काय यांच्या?

आणि खरोखर तसाच काहीसा प्रकार होता. जावईबापूंना यातलं काही माहित नव्हतं आणि माहित असण्याची तशी जरूरी नव्हती.

सान फ्रान्सिस्कोहून १०१ नॉर्थ हायवेने सुमारे चाळीस मैल अंतरावर, गोल्डन गेट ब्रिजच्याही उत्तरेला सान राफेल शहर आहे. मुख्य शहर भाग सपाट जागेत वसलेला असला तरी हिरव्या झाडीने नटलेल्या डोंगर दऱ्यांमधे बरेचसे घरांचे समूह, बंगले, शाळा, शॉपिंग सेंटर्स विखुरलेले आहेत.

सान राफेलच्या, मिलर क्रीक रोड आणि लास गॅलेनास ॲव्हेन्यूच्या कोपऱ्यावर आहे राजेंद्र आणि शैलाचं प्रशस्त घर. बऱ्याच वर्षांपूर्वी हे घर घेण्याचा सौदा राजेन्द्रला फारच किफायतशीर पडला होता. आता मात्र या रांगेतल्या सर्वच घरांच्या किमती दहा लाख डॉलरच्या वर गेल्या होत्या. नाहीतरी, गोल्डन गेट पुलाच्या पलीकडचा, साउसोलिटो, सान राफेल, नोव्हॅटो हा पट्टा श्रीमंतांचे आगरच मानला जातो ना!

बॅंकिंग व्यवसायातून निवृत्त झाल्यामुळे म्हणा, किंवा मुळचा व्यासंग पुढे मोठ्या प्रमाणात वाढवल्यामुळे म्हणा, राजेंद्रला फायनान्शियल सेकंडरी मार्केट बद्दल म्हणजे स्टॉक एक्सचेंजच्या घ्या -विका व्यवहारांबद्दल बऱ्यापैकी माहिती होती. मरीन काउंटी इंडियन अमेरिकन सिनियर क्लबमधे या विषयात विशेष माहिती, विशेष इंटरेस्ट असणारे राजेन्द्रसारखे इतरही काही मेंबर होते. रविवारच्या मीटिंग नंतर हॉलच्या एका कोपऱ्यात हे मेंबर खुर्च्या टाकून बसायचे, एकमेकांशी थोडी फार चर्चा करायचे. दोघं तिघं जणं त्यातल्या त्यात अधिकारवाणीने बोलायचे, एकमेकांशी वाद करायचे, बाकीचे पाच सहा भक्तगण नुसतेच बसायचे, ऐकायचे,

मिळालेल्या टिप्स लक्षात ठेवून दुसऱ्या दिवशी छोटा मोठा शेअर्सचा व्यवहार करायचे.

त्या भक्तगणांपैकी एक होते ब्रिगेडियर (रिटायर्ड) भल्ला. उंची पुरी देहयष्टी आणि करारी चेहरा असं ब्रिगेडियर साहेबांचं मोठं इंम्प्रेसिव्ह व्यक्तिमत्व होतं. पण हा होता सैन्याच्या शिस्तीत वाढलेला सरळ माणूस. तापट माणूस, पण काही बाबतींच अगदीच भाबडा. ब्रिगेडियर साहेब ग्रीन कार्ड धारक होते आणि मीलर क्रीकलाच त्यांच्या मुलाबरोबर, म्हणजे सहदेव बरोबर तेही आपल्या पत्नीसह रहात होते. त्याना स्टॉक, इक्विटी हे सगळे नवीन शब्द होते. हा प्रांतच मुळी त्याना नवखा होता. पण क्लबमधल्या त्या कोपऱ्यातल्या कोंडाळयात बसून बसून त्यांचा इंन्टरेस्ट पालवला होता आणि ब्रोकरच्या माध्यमातून छोटे छोटे व्यवहार त्यानीही सुरु केले होते.

सकाळची वेळ. मीलर क्रीक मिडल स्कूलच्या पाठीमागे असलेल्या गोलाकार जॉगिंग ट्रॅक वर मोजकी मंडळी होती. काही जण ब्रिस्क वॉक घेत होते, काही जण वॉक अँड रन असं आलटून पालटून करत होते. राजेंद्रचं अति धीम्या गतीने जॉगिंग चाललं होतं. राजेन्द्रला पाठीमागून धप धप धप असा आवाज आला आणि लवकरच त्या आवाजांचे मालक, ब्रिगेडियर भल्ला, जॉगिंग करत राजेंद्राच्या खांद्याला खांदा लागण्याइतपत जवळ आले. ब्रिगेडियर साहेबानी आपला जॉगिंगचा वेग कमी केला. राजेंद्राच्या गतिइतपत खाली आणला.

“कैसे हो राजभाई, आज अकेले आये हो, भाभीजी नही आयी!” ब्रिगेडियर साहेबांनी ऑब्जरवेशन नमूद केलं.

a

राजेंद्र म्हणाला, “हांजी| इसिलिये तो जॉगिंग कर रहे हैं, नही तो सिर्फ ब्रिस्क वॉक करते |”

ब्रिगेडियर साहेबांनी लक्षात आल्यासारखी मान डोलावली.

थोडा वेळ शांततेत गेला. धप धप असा एका तालामधे आवाज येत राहिला. काही वेळाने राजेंद्राने जॉगिंग बंद केलं आणि तो ब्रिस्क वॉक करू लागला. ब्रिगेडियर साहेबाना आता पुढे जाणं भागच होतं. मग जाण्यापूर्वी त्यानी राजेंद्राला तो महत्त्वाचा प्रश्न विचारला, “राजभाई, कलके लिये कुछ टिप्स?”

सर्वसाधारणपणे, शेअर्स घेण्या विकण्याच्या टिप्स द्यायला राजेंद्र नाखुष असे. कुणी तरी दिलेल्या टिप्सवर विश्वास ठेवून निर्बुध्दपणे व्यवहार करणे त्याला अजिबात पसंत नव्हतं. चर्चा करा, विचारविनिमय करा, उणं-अधिक पहा, फंडामेंटल्स पहा, टेक्निकलस् पहा, मार्केटचा कल पहा आणि मग स्वत:च्या हिंमतीवर निर्णय घ्या असं त्याचं प्रांजल मत होतं. आपल्या निर्णयाला आपण जबाबदार. नो ब्लेम गेम. पण ब्रिगेडीयर साहेबांना तेवढं ज्ञानही नव्हतं आणि विचार करण्याची कुवतही नव्हती. त्यांचा आपला राजेंद्रवर पूर्ण विश्वास. तो सांगेल तसं करायचं, हमखास यश मिळणारच अशी त्यांच्या मनाची धारणा झाली होती. त्यांच्या अशा वृत्तीने राजेन्द्राला चीड यायची खरी, पण शेवटी त्यांचा भाबडेपणा पाहून राजेन्द्र त्याना काही बाही मार्गदर्शन करायचा. आणि योगायोग असा की राजेन्द्राच्या सांगण्यावरून टाकलेल्या प्रत्येक पाऊलाने ब्रिगेडीयर साहेबाना उत्तम फायदा झाला होता.

राजेन्द्राला भिती वाटायची कि असे अंधश्रध्देने व्यवहार करून ब्रिगेडीयर साहेबानी काही चुकीची पावलं उचलली आणि त्यांचं नुकसान झालं तर?

"ब्रिगेडीयर साब स्टॉक एक्सचेंज, सेकंडरी मार्केट इसके बारेमे आप कुछ पढो, कुछ सीखो, सोच समझके व्यवहार करो"| असं राजेन्द्र ब्रिगेडीयर भल्लाना नेहमी सांगत असे. एकदा ब्रिगेडीयर साहेबानी शिकायचं मनावरही घेतलं होतं. पण दुसऱ्या दिवशी ब्रिगेडियर विचारत आले, "राज भाई ये नासडॅक क्या है, डाव क्या है, एस अँड पी ५०० क्या है?"

एवढे फंडामेंटल प्रश्न पाहून राजेन्द्र हताशच झाला, पण तरीसुध्दा राजेंद्राने आपल्या परीने त्याना समजावले, अगदी ट्यूशन दिल्याप्रमाणे.

या खटाटोपात राजेंद्र दमून गेला, शारीरिक श्रमांनी नाही, तर मानसिक श्रमांनी. आणि मग मार्केट कॅपिटालायझेशन, इंडेक्स, वेटेज वगैरे बाबी ट्यूशनच्या अभ्यासक्रमात घ्यायचा प्रश्नच आला नाही.

अमेरिकन कंपन्यांशीही ब्रिगेडीयर साहेबाना नातं जुळवतां येईना, "ये ॲमेझॉन, आल्फाबेट, टेस्ला इनको इतना इंम्पार्टन्स क्यों?" असे मूलभूत प्रश्न ब्रिगेडीयर विचारायचे. त्यांच्याकडे दुर्लक्ष करणेही अवघड आणि त्याना उत्तर देणंही अवघड.

दिवस चालले होते. रविववारच्या क्लब मीटिंग्ज होत होत्या. मेंबर्सना एकमेकांबरोबर हसत खेळत मजेत दोन तीन तास वेळ घालवायला फार आवडायचं. हवा चांगली असेल तेव्हा आउटडोअर पिकनिक सुध्दा व्हायच्या.

अशाच एका शनिवारी सान राफेल पासून २० एक मिनिटांच्या अंतरावर असलेल्या चायना कॅंप पॉइंट पिकनिक एरिया ला जायचं ठरलं. सकाळी ब्रेकफास्ट नंतर निघायचं आणि लंच वगैरे तिकडे रिसॉर्टला. तिथल्या फास्ट फुड आउटलेटला काही ऑर्डर दिली होती, काही पदार्थ सान राफेलच्या इंडियन स्पेशालिटीज रेस्टॉरंट

मधुन घ्यायचे होते. चिकन लेग्ज आणि ब्रेस्ट पीसेस ची पॅकेट्स राजेंन्द्राने आणून ठेवली होती बारबेक्यू मात्र साईटवर करायचं होतं. पिकनिक साईटवर बारबेक्यूचं ग्रिल होतं पण कोळसा मात्र बरोबर न्यायचा होता. ब्रिगेडियर साहेबांना कोळशाचे दुकान माहिती होतं त्यामुळे त्यांच्याकडे कोळसा आणायची जबाबदारी होती आणि त्यानी चांगला दहा पाउंड कोळसा खरीदला होता.

पिकनिक स्पॉटवर शौकीन मंडळी बारबेक्यूच्या समोर उभी होती. चिकनमध्ये खुपसलेले स्क्यूअर्स गोल गोल फिरवणाऱ्या निष्णात लोकांकडे कौतुकाने पहात होती. हातात बीअरचे, वाईनचे ग्लास होते.

राजेन्द्र सांगत होता, “यह काला कोयला नही, सोना है सोना |”

माहितगार लोकांनी स्मित हास्य करत मान डोलावली. ब्रिगेडियर साहेबांना काही लक्षात आलं नाही आणि त्यानी राजेंद्राला सरळ विचारलं, की याचा अर्थ काय?

काही कळलं नसूनही गप्प बसलेले दोघं तीघं जण पण उत्सुकतेने पुढे आले.

राजेंद्रने जरा दबलेल्या आवाजात सांगितलं कि भारतामधे कोळसा खाणींच्या वाटपावर सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली आहे आणि दोन एक आठवड्यात निकाल येईल म्हणतात. काही कंपन्याचे क्लेम बोगस आहेत, त्यांची हकालपट्टी होणार आणि मोजक्या कंपन्याना खाणीचे अग्रक्रम मिळतील. आणि कोळशाला, विशेषत: कोल गॅसिफिकेशन साठी, एवढी मागणी आहे की त्या कंपन्यांचं सोनं होईल सोनं.

a

अलिकडे राजेंन्द्राने आपली नजर भारतीय स्टॉक मार्केट कडे वळवली होती. अमेरिकन स्टॉक मार्केट जरा सुस्तच झालं होतं. मोठ्या उलाढाली केल्याशिवाय फारसा नफा होत नव्हता. त्यामानाने भारतीय स्टॉक मार्केट मधे आठवड्याला मोठे चढ उतार व्हायचे. डोळे आणि कान उघडे ठेवले तर चांगला फायदा होण्याची शक्यता दिसत होती.

आणि राजेंद्रला भारतात मोक्याच्या ठिकाणी कानही होते आणि डोळेही होते. राजेंद्राकडे ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया, उर्फ ओ सी आय कार्ड, असल्यामुळे त्याच्या एन आर ओ अकाउंटला संलग्न भारतीय डिमॅट अकाउंट तो उघडू शकला होता आणि थोड्याफार प्रमाणात व्यवहारही करत होता. त्याच्या स्वत:च्या मार्केट च्या अभ्यासाला आतल्या बातम्यांची जोड मिळत गेल्याने त्यातूनही राजेंन्द्रला बऱ्यापैकी प्राप्ती होत असे.

ब्रिगेडियर साहेबांचं राजभाईवर बारीक लक्ष होतंच. “राजभाई, इंडिया मार्केटका हमेभी टिप्स देते जाओ”| ब्रिगेडियर साहेबानी राजेन्द्राला विनंती केली. विनंती कसली, गळ घातली म्हणाना. त्यांच्या भावाचा म्हणे भारतात डी मॅट अकाउंट होता पण राम भरोसे व्यवहार केल्यामुळे त्याला बराच तोटा सहन करावा लागला होता. ब्रिगेडियर साहेबाना त्याला आता फायद्याच्या रस्त्यावर आणून सोडायचे होतं म्हणे. राजेंन्द्रने त्याना परोपरीने सांगितलं होतं की टिप्सवर पूर्ण अवलंबून राहणं योग्य नाही, अभ्यासपूर्वक विश्लेषणाला दुसरा पर्यायच नाही. पण राजेन्द्रवरच्या अपार भक्तीमुळे ब्रगेडियरसाहेब हा मोलाचा सल्ला दुर्लक्षित करत असत.

a

राजेन्द्राने सकाळी भारतात त्या अतिमहत्त्वाच्या मित्राला फोन लावला. भारतातली रात्र. दिवसभरात अनेक घडामोडी होऊन रात्रीपर्यंत बऱ्याच बाबी निष्कर्षाप्रत पोहोचलेल्या.

“संजा, काय बातमी आहे” राजेन्द्राने विचारलं, “कोणाचं कोणाचं तोंड कोळशाने काळं होणार आणि कोण हळदीने पिवळं होणार”. सगळेच शब्द जपून वापरलेले आणि जवळ जवळ सांकेतिक भाषा. सुप्रीम कोर्टाच्या निकालाधीन असलेल्या कोळसा खाणींच्या वाटपाच्या प्रकरणाबद्दल ही पृच्छा होती. ज्या कंपन्यांचे क्लेम ग्राह्य धरले जाणार त्यांचे शेअर वर जाणार.

मग भारतातून संजयने हळू हळू, सहजसंवाद केल्यासारखं काहीशा सांकेतिक रीतीने सांगितलं. कोर्टात म्हणे सगळ्या खाण कंपन्याबद्दल विस्तृत माहिती अगदी पुराव्यासकट सादर केली गेली होती. साक्षीदार आणले गेले होते, आणि मग “अरवली कोल”, “विंध्याचल कोल”, “रामकृष्ण कोयला” या अगदी बोगस कंपन्या असल्याचं सत्य उघड झालं होतं. “कोयला इंडिया” या कंपनीचा कारभार कोर्टासमोर आलेल्या साक्षीपुराव्यानुसार ठीक ठाक वाटला होता. त्याना दिलेल्या अधिकारपत्रात कोर्टाला काही फारसं अधिक-उणं आढळल्यासारखं कोणाला वाटलं नाही .

राजेन्द्रने शांतपणे ऐकून घेतलं. या केसचा त्याचाही बराचसा अभ्यास होता. राजेन्द्राने संजयला उलट विचारलं, “संजय, पण “कोयला इंडियाला” दिलेल्या काही खाणी जंगल भागात आहेत म्हणे, काही खाणी आदिवासी क्षेत्रात आहेत म्हणतात. मग हे कोर्टाला उणे पॉईंट वाटले नाहीत?”

a

संजयने सारवासारव केली की अशी उदाहरणे अगदी मोजकी आहेत आणि “कोयला इंडिया” म्हणजे खणखणीत बंदा रुपया आहे.

“ठीक आहे संजा, थॅंक्स.” असे म्हणून राजेन्द्रने फोन ठेवून दिला.

दुसऱ्या दिवशी पार्कमध्ये ब्रिस्क वॉकिंग करताना ब्रिगेडियर भल्ला धप धप आवाज करत राजेन्द्राच्या पाठीमागून आले. नेहमीप्रमाणे राजेन्द्राच्या जवळ आल्यावर त्याच्या स्पीडने चालू लागले. नेहमीप्रमाणे प्रश्न आला. “राजभाई, कुछ टिप है क्या?”

राजेन्द्राने ब्रिगेडियर साहेबाना सांगितलं की “कोयला इंडिया” घेण्याची स्ट्रॉन्ग टिप आहे. आत्ता फारसा वरचा रेट नाही आहे पण आठ दिवसांनी कोर्टाचा फेवरेबल निकाल लागला की खूप वर जाईल. ब्रिगेडियर साहेबानी योग्य प्रश्न विचारला की, खात्रीपूर्वक कोर्टाचा निकाल “कोयला इंडिया” च्या बाजूनेच लागेल नं? राजेन्द्रालाही वाटलं की निकाल विरुध्द लागण्याची पाच दहा टक्के का होईना, शक्यता होती. मग क्षणभर विचार करून त्याने ब्रिगेडियर साहेबाना सल्ला दिला की त्यांनी तूर्तास तरी “कोयला इंडिया”चे शेअर घ्यावे आणि चार दिवसांनी राजेन्द्राला परत फोन करावा म्हणजे तोपर्यंत काही अधिक माहिती हाती आली असेल तर त्याप्रमाणे पावलं उचलता येतील.

ब्रिगेडियर साहेब म्हणाले , “जी, जी, थॅंक यू व्हेरी मच”, आणि धप धप आवाज करत पुढे निघुन गेले.

आणखी एक राउंड घेउन मग राजेन्द्राने घराकडे मोर्चा वळवला.

a

त्याच दिवशी दुपारी संध्याचा, राजेन्द्रच्या मुलीचा फोन आला होता. “बाबा, तुम्हाला आणि आईला आज संध्याकाळपर्यंत इथे माझ्याकडे यायला पाहिजे. मोहनला आजपासून नाईट ड्यूटीला जावं लागणार आहे आणि रात्रीची मला आणि मुलांना सोबत लागेल. रोहन फारच लहान आहे अजून. रात्री बेरात्री रडत उठतो आणि मग अतुलचीही झोप चाळवल्यासारखी होते. त्यालाही जाग आली तर बघायलाच नको.” संध्या तिच्या सहा महिन्यांच्या छोट्या रोहन बद्दल आणि दोन वर्षांच्या अतुल बद्दल बोलत होती.

डिफिकल्टी जेनुईन होती. गडबडीत, हातातली कामं सगळी असतील तशी सोडून राजेन्द्र आणि शैला संध्याकाळ पर्यंत संध्याच्या घरी आले होते. मोहनने आणि संध्याने सुटकेचा नि:श्वास सोडला होता.

संध्याच्या घरी कामांना काही तोटा नव्हता. अतुल -रोहन च्या जोडीला बघणे हेच मुख्य काम. नऊ वाजता मुलांना सांभाळणारी मुलगी आल्यावर ती मुलांना पाळणा घरात घेऊन जायची. त्यानंतर जरा जिवाला शांतता. नाईट ची इमर्जन्सी ड्यूटी करून आल्यामुळे मोहनला दिवसाचा बराचसा भाग विश्रांतीची गरज असायची आणि संध्याला तिचं रिसर्चचं काम. एकंदर काय, राजेन्द्र आणि शैला ना स्वत:कडे बघायला वेळ मिळायचाच नाही.

सहा सात दिवस निघून गेले होते आणि या दिनक्रमामधे काही बदल झालेला नव्हता. स्वत:ची दिनचर्या, घरातल्या इतर सदस्यांची दिनचर्या, कर्तव्ये, विश्रांती, ज्ञान, मनोरंजन या सगळयांचं एक मिश्रण झालं होतं. पण मजा येत होती. दिवसाच्या शेवटी कातावलेल्या चेहऱ्याने कोणी झोपायला जात नव्हतं.

a

मंगळवारची सकाळ होती. भारतात मंगळवारची संध्याकाळ संपून रात्र सुरू झाली होती. मोहन नाईट ड्युटीवरून आला होता. राजेंन्द्र आणि मोहन चहा घेत होते. मोहन म्हणाला, "बाबा, भारतातली मोठी न्यूज आहे हं, तिकडच्या मीडिया मधे. तुमच्या त्या कोळसा खाणींच्या खटल्याचा निकाल लागलाय. इंडियाची सगळी न्यूज चॅनेल्स हीच बातमी देतायत. अहो इंडियातल्या मोठ्या कोर्टाने सर्वच खाणींचं वाटप रद्द केलंय आणि वाटप करणाऱ्या यंत्रणेवर ताशेरे झोडलेत असं म्हणतायत".

राजेन्द्राला एकदम दचकायला झालं. गेल्या सात आठ दिवसात रोहन - अतुल- संध्या - मोहन या सीमांनी कटिबध्द असलेल्या विश्वाबाहेर दुसरं काहीही जग त्यांच्या दृष्टीनी अस्तित्त्वात नव्हतं.

राजेंद्र खडबडून जागा झाला. गडबडीने एकाच वेळी तो टी व्ही चा रिमोट कंट्रोल, मोबाईल, लॅपटॉप, सगळंच शोधायला लागला. मोहनने बाजूच्या खुर्चीवर पडलेला मोबाईल राजेन्द्राच्या हातात दिला. "हा घ्या तुमचा मोबाईल", मोहन म्हणाला.

राजेन्द्राने भारताची न्यूज पहायला सुरुवात केली. खरोखरच, मोठ्या कोर्टाने कोळसा खाणी वाटप व्यवहार पूर्णपणे अवैध ठरवला होता आणि पुन्हा पारदर्शक रीतीने वाटप करण्याची आज्ञा दिली होती. राजेन्द्राने कपाळावर हातच मारला. ब्रिगेडियर साहेबांचं काय झालं असेल? लाखो रुपयांचे त्यांचे "कोयला इंडिया" चे शेअर्स आता कवडीमोल झाले असतील.

राजला आठवलं की चार दिवसानी फोन करा म्हणून त्याने ब्रिगेडियरना सांगितलं होतं. त्यांनी केला नाही फोन. खरंतर फोन केला असता तरी राजेन्द्राने त्याना

काय ॲडव्हाईस दिला असता! कोळसा खाणी प्रकरण गेल्या आठ दिवसात पूर्ण नजरेआड गेलं होतं.

चूक कुणाचीही असो, नुकसान ते नुकसानच. तो आर्मी मॅन भडकला तर काय करेल कोणास ठाउक. त्याचा राग शमेलही म्हणा सावकाशीने, पण आत्ता या क्षणाचं काय? तूर्त इथून, म्हणजे अमेरिकेतून पाय काढता घ्यावा हेच उत्तम. पण आपली संभाव्य चाल ओळखून आपल्या पलटणीसह तो फौजी सान फ्रान्सिस्को इंटरनॅशनल एअरपोर्टवर तळ ठोकुन बसला असेल तर? नाही, नाही. पळ काढायचा तर मागच्या दरवाजाने पळ काढला पाहिजे. मग त्याना ओकलॅंड एअरपोर्टची आठवण झाली.

ओकलॅंड एअरपोर्ट हा सान फ्रान्सिस्को बे एरियातला एक छोटा पण पर्यायी एअरपोर्ट आहे. काही थोडी आंतरराष्ट्रीय उड्डाणं या एअरपोर्टवरून हाताळली जात असली तरी मुंबईच्या बाजूला जाणाऱ्या - येणाऱ्या उड्डाणांचा त्यात समावेश नक्कीच नव्हता. आणि त्यामुळेच राजेंद्राला हा अगदी बेस्ट चॉईस, बेस्ट एक्झिट पॉईंट वाटला असल्यास नवल नाही.

राजेन्द्राचं भांबावलेलं आणि गळाठलेलं मन टॉप गिअरमधे सुसाट धावत होतं. विचारातील सूज्ञपणा, विचारांची योग्य दिशा, औचित्य या सगळ्यांच्याच तारतम्याच्या सीमा पूर्णपणे कोसळून पडल्या होत्या. त्या तिरिमिरीतच त्याने जावईबापूना म्हणजे मोहनला हाक मारली होती आणि ओकलॅंड ते मुंबई व्हाया जे एफ के न्यू यॉर्क फ्लाईटची तिकिटं बुक करायला सांगितलं होतं.

मोहनने त्याचा मोबाईल उचलला. फ्लाइट प्लॅनर ॲप उघडून तो ओकलॅंड न्यू यॉर्क मुंबई रूटच्या किफायतशीर आणि सोईस्कर फ्लाइट्स पाहू लागला.

a

राजेन्द्र पैसे किती लागतील याचा आदमास घेऊ लागला, पैशांची व्यवस्था कशी करता येईल ते पाहू लागला.

बाहेर फॅमिली रूम मधे अशा आणीबाणीच्या घडामोडी चालल्या असल्या तरी आतमध्ये रोहन-अतुलच्या विश्वात अडकलेल्या शैला आणि संध्याला त्याची तिळमात्रही कल्पना नव्हती.

तेवढ्यात राजेन्द्राच्या फोनची रिंग वाजली. ब्रिगेडियर भल्लांचा फोन. राजेन्द्राला काय करावे ते सुचेना. तो मेस्मराईज झाल्यासारखा फोनकडे पहातच राहिला. बाबा फोनचं हिरवं बटण दाबण्याच्या ऐवजी नुसतेच फोनकडे काय पहात बसलेत ते मोहनला कळेना. शेवटी न राहवून मोहन ओरडला, “बाबा घ्या नं फोन”.

नाईलाजाने राजेन्द्राने फोनचं हिरवं बटण स्लाईड केलं.

“हॅलो, राजभाई, कहां हो तुम?” पलीकडून ब्रिगेडियर साहेबांची पृच्छा.

खरं सांगावं की खोटं सांगावं? चढाईचा पवित्रा घ्यावा की नरमाईचे धोरण अंगिकारावे? राजेन्द्राच्या मनात विचार चालू होते. काही सेकंद वेळ अशा विचारातच गेला.

तेवढ्यात ब्रिगेडियर साहेबच परत बोलायला लागले. ते म्हणे मिठाईची बॉक्स घेऊन तोंड गोड करायला मिलर क्रीक रोडवरच्या राजेन्द्राच्या घरी गेले होते पण अर्थात, घरी कोणीच नव्हतं. एवढा मोठा फायदा करून दिल्याबद्दल त्याना राजेन्द्राचे आभार मानायचे होते. राजेन्द्राने मागच्या गुरुवारी केलेलं मार्गदर्शन अचुक होतं आणि त्याप्रमाणे त्यानी भावाला सगळे शेअर विकायला सांगितले होते म्हणे

a

आणि या व्यवहारात चांगला फायदा झाला होता. परत परत ब्रिगेडियर थॅंक यु म्हणत होते.

राजेन्द्राला वाचा फुटली, “ब्रिगेडियर साब, गुरुवार को·········”

“जी, आपसे मेरी डायरेक्ट बात नही हुई, आप कहीं बाहेर गये थे ना? लेकिन भाभीजी से बात हो गयी मेरी और मेरे लिये मेसेज जो रख्खा था आपने वो उन्होने मुझको दे दिया| उसीकी बात कर रहा हूं मै|” ब्रिगेडियर साहेब बोलत होते. “खैर, सुबह का वक्त है, आप बिझी होंगे, मिलेंगे बादमे|”

ब्रिगेडियर भल्लानी फोन डिस्कनेक्ट केला.

कोडं सुटण्याऐवजी जास्तच गुंतागुंतीचं झालं होतं. ब्रिगेडियरनी भाभीजींचं नाव घेतलं होतं तेव्हा शैलाला या प्रकारणाची काहीतरी माहिती असणार नक्की. राजेन्द्राने शैलाला हाक मारली. दोन तीन हाकांनंतर हातातलं काम पुरं करून शैला बाहेर आली.

“शैला, गुरूवारी ब्रिगेडियर भल्लांचा फोन आला होता आणि तू बोललीस त्यांच्याशी?” कोडं सोडवण्याच्या निकडीमुळे प्रश्नांचा भडीमारच झाला राजेन्द्राकडून.

“गुरुवारी?” शैलाच्या कपाळावर आठ्या उमटल्या. विचारचक्र चालू झालं.

“आठवलं. हो आला होता ब्रिगेडीयरजींचा फोन. तुमच्याच मोबाईलवर आला होता.” शैला म्हणाली.

“माझ्या फोनवर! मी कुठे होतो”? राजेंद्राची सरळ सरळ पृच्छा.

"अहो, गुरुवारी नाही का, तुम्ही केस कापायला सलून मधे गेला होतात, आणि फोन घरीच राहिला होता. आणि मग अपॉइंटमेंट नसल्यामुळे तुम्हाला जरा वेटिंग बसावं लागलं होतं तिथे, नाही का". शैलाने राजेन्द्राला आठवण करून दिली.

"अच्छा, अच्छा. तेव्हा आला होता होय फोन? काय पाहिजे होतं त्याना"? राजेंद्राने विचारलं.

"काही नाही हो, तो मागच्या आठवड्यातल्या पिकनिकच्या वेळी बारबेक्यूसाठी कोळसा आणला होता नं त्यानी, त्याबद्दल विचारत होते". शैला म्हणाली.

राजेन्द्राची उत्सुकता वाढली. हे प्रकरण भलतीकडेच चाललं होतं.

"एक्झॅक्टली काय विचारत होते ते?" राजेन्द्राची उत्सुकता वाढत होती.

शैला सांगू लागली, "असं बघा, तुम्ही गेलात आणि तुमचा फोन वाजला. मी बघितलं तर ब्रिगेडियरजी. मी सांगितलं त्याना तुम्ही नाहीत घरात, आणि विचारलं त्याना, काही निरोप आहे का, तर ते म्हणाले, "हां उन्हे कोयला के बारेमे पूछना था| इतना लेके बैठे हैं हम तो अब उसको रखना है कि निकालना है वो पूछना था |"

"बरं, मग"? राजेंन्द्राने विचारलं.

"अहो मग काय? चांगला दहा पौंड कोळसा आणला होता त्यानी बारबेक्यूसाठी. त्यातला निम्मा फारतर वापरला गेला असेल. बाकीचा उरलेला त्यानी घरी नेला आणि पोतं गॅरेजमधे ठेवलं असणार. मी म्हटलं आता एवढ्यात क्लब मेंबर्सचा पिकनिक वगैरे काही प्लॅन नाही, मग कोळसा बाळगत कशाला

a

बसायचं त्यांनी बिचाऱ्यानी! मी सांगितलं त्याना, “उसमे सोचनेका सवालही नही, निकाल दो सब कोयला|”

ब्रिगेडियरजी विचारत होते, “राजभाईने येही मेसेज रखा है क्या मेरे लिये?”

“आता ही काय चार लोकांना विचारत फिरायची गोष्ट आहे का?” शैला म्हणाली. “मी आपलं दडपून त्याना “हो” म्हणून सांगितलं. मग दोनदा तिनदा थॅंक यू म्हणून त्यांनी फोन बंद केला. त्यानंतर तुम्ही बऱ्याच उशीराने घरी आलात, मग या मुलांच्या गडबडीत तुम्हाला सांगायचंही राहून गेलं.”

राजेन्द्र आवाक होऊन ऐकतच राहिला. ब्रिगेडियर साहेब विचारत होते त्यानी विकत घेतलेल्या “कोयला इंडियाच्या” शेअर्स बद्दल. आणि त्या विषयाशी सुतराम संबंध नसताना, शैलाने त्याना दिला ॲडव्हाईस बारबेक्यूसाठी आणलेल्या कोळशाची विल्हेवाट लावण्याबद्दल. गैरसमज तर सर्वांचेच , पण प्रकरणाचा शेवट झाला होता मिठाईहून गोड गोड.

——x———

# अळूची पातळ भाजी

“लले, साडे बारा वाजून गेले. तुझ्या नवऱ्याला आणखी किती उशीर होईल ते सांगता येत नाही. मुलांची जेवणं आटोपून घ्यायची का?” शोभाताईनी ललिताला विचारलं.

“हो मावशी, बोलावते मी मुलांना. माईकला सेमिनारहून यायला आणखी एखादा तास तरी लागेलसं वाटतंय” . ललीता म्हणाली, आणि लगेच तिने मुलांना हाक मारली.

रोहन, वय वर्षे पाच आणि माया, वय वर्षे तीन, तिथेच कोचावर आय पॅड घेऊन बसले होते.

“बट मम्मा ******” रोहनने लगेच त्याच्या मम्माला उत्तर दिलं खरं, पण पहिल्या दोन शब्दांनंतरचं बाकीचं सर्व उत्तर रोहनच्या टेक्सास उच्चारांमुळे शोभाताईंच्या तरी डोक्यावरून गेलं.

“काय म्हणतोय गं तो?” शोभाताईंनी ललितेकडे स्पष्टीकरणाची विचारणा केली.

“गेम चाललाय, म्हणे” , असं त्रोटक उत्तर ललिताने शोभाताईना दिलं आणि ती परत रोहन कडे वळली. ललिता आणि दोन्ही मुलं यांच्यामधे त्याच

a

अनाकलनीय भाषेत थोड्या फटाकड्या उडल्या आणि दोनच मिनिटात आय पॅड आणि मोबाइल बंद करून मुलं ललितेसमोर येउन उभी राहिली.

शोभाताईंना आज कित्येक वर्षांनंतर ललिता भेटत होती. ललिताची आई मालती, ही शोभाताईंची अगदी शाळा कॉलेज पासूनची जीवाभावाची मैत्रीण. दोघींची लग्नंही पुण्यातच झाली. सासर पुण्यातले, नवऱ्यांच्या कायमस्वरुपी नोकऱ्या मात्र मुंबईत. त्यामुळे त्या दोन मैत्रीणींमधील जीवाभावाचं नातं दोन्ही कुटुंबांतही पसरलं, वृद्धिंगत झालं. त्यामुळेच, ललितेला शोभा मावशी तिच्या सख्ख्या मावशीपेक्षाही जवळची वाटायची आणि शोभा मावशीही या खट्याळ भाचीवर तिच्या स्वत:च्या मुलींइतक प्रेम करायची.

मुलं मोठी झाली. उच्च शिक्षणासाठी ललिता अमेरिकेला गेली. शिकली, तिला चांगली नोकरी लागली आणि तिथेच तिच्या गौरवर्णीय सहाध्यायाशी, माईकशी तिचा विवाह झाला. लग्नानंतर ललिताला टेक्सासमधे एका मोठ्या बॅंकेच्या कॉम्प्युटर विभागात नोकरी मिळाली आणि त्याच शहरात माईकनेही सौर ऊर्जेमधे प्रवीण अशी स्वत:ची कन्सल्टिंग कंपनी चालू केली. कंपनी लवकरच नावारूपाला आली आणि जगभरात चांगला लौकिक कमावला.

शोभाताई जरी मुंबईत असल्या आणि त्यांची मैत्रीण सांगलीमध्ये असली, तरी शोभाताईना मालतीकडून ललिताच्या प्रगतीची, तिच्या दोन छोटूंच्या गमती जमतींची बातमी कळत असे. त्या दोघां मैत्रिणींना आपापल्या प्रिय व्यक्तींच्या आयुष्यातल्या आनंदाच्या क्षणांबद्दल किंवा चिंतेच्या बाबींबद्दल, एकमेकींशी हितगुज केल्याशिवाय चैनच पडत नसे.

a

मालतीचा धाकटा मुलगा दीपक पीएचडी झाला. सांगलीच्या कॉलेजमधे त्याला प्राध्यापकाची नोकरी मिळाली आणि आता मालती आणि तिचे मिस्टर केशव, मुंबई सोडून सांगलीला दीपककडे कायमचे रहायला गेले होते आणि जरी मोबाईल, वाट्स् ॲप सारखी साधने हाताशी असली तरी त्या दोघा मैत्रिणींना हातात हात घेऊन गप्पा मारण्याची सर कशालाही येत नव्हती. त्यामुळे आताशा या दोन कुटुंबातला संपर्क बऱ्याच प्रमाणात आटल्यासारखाच होता.

.

ललिताने आणि माईकने ही इंडिया ट्रिप केली ती मुंबईत भरलेल्या आंतरराष्ट्रीय सौर सम्मेलनाच्या निमित्ताने. माईक हा सौर ऊर्जा विषयातील अधिकारी व्यक्ती असल्याने त्याला सम्मेलनाच्या संयोजकांनी मानाचं आमंत्रण दिलं होतं. सम्मेलनाची मुख्य अधिवेशने फोर्ट भागातल्या एका मोठ्या हॉटेलमधे भरत असल्याकारणाने, संयोजकांनी माईक आणि इतर मान्यवर वक्त्यांची राहण्याची सोय फोर्ट मधल्याच एका अलिशान हॉटेल मधे केलेली होती. सम्मेलनाचे शेवटचे समारोपाचे अधिवेशन मात्र जोगेश्वरी येथील नॅशनल एक्झिबीशन सेंटर मधे आयोजित केलेले होते. ही संधी साधून ललितेने हा सहकुटुंब पूर्ण दिवस कांदिवलीला शोभामावशीबरोबर घालवायचा घाट घातला होता.

मंडळी सकाळी लवकरच फोर्टमधल्या त्यांच्या हॉटेल मधून टॅक्सींने निघाली. ललीता गेल्या पाच सहा वर्षात काही ना काही अडचणींमुळे भारतात आलीच नव्हती. मुंबईत जरी ती लहानाची मोठी झालेली होती तरी अलीकडेच झपाट्याने झालेल्या बदलांमुळे तिला ही मुंबई वेगळीच वाटत होती. वाटेत

a

जोगेश्वरीच्या नॅशनल एक्झिबीशन सेंटर मधे माईक उतरला होता आणि सकाळचे अधिवेशन झाल्यावर दुपारी जेवण्याच्या वेळी तो कांदिवलीला येणार होता. मुलांबरोबर ललिता सरळ पुढे कांदिवलीला शोभामावशीच्या घरी आली होती. छोट्या मुलांची ही पहिलीच इंडिया ट्रिप होती. मुलं शोभाताईंना परकी आणि शोभाताई मुलांना परक्या. त्यातून हा एकमेकांची भाषा न कळण्याचा प्रॉब्लेम. त्यामुळे आपुलकीचा प्रवाह ललीतेपर्यंतच जाऊन थबकला होता. मुलांशी जवळीक साधण्यामधे हा प्रॉब्लेम, मग माईक बरोबर तरी समन्वय, मैत्री साधणे जमेल का? धास्ती.

आणि या धास्तीमागे कारणही तसं होतं. गोऱ्या अमेरिकन मनुष्याच्या सान्निध्यात एवढे जवळ जाण्याचा अनुभव रमेशनाही आणि शोभाताइनाही नव्हता. त्यामुळे या पाहुण्याची आवड निवड काय असेल, जेवणाबद्दल त्याच्या काय अपेक्षा असतील आणि पाहुणचारातले आपले श्रम कितीसे पुरे पडतील याबद्दल दोघेही जरा साशंक होते.

शोभा ताईंनी जेवणाच्या मेनूच्या बाबतीत ललिताला चांचपण्याचा प्रयत्न केला होता, पण ललिताने फोनवर उलट शोभाताईंनाच विचारलं होतं, “मावशी तू माझ्यासाठी स्पेशल काय करणार आहेस?”

“अगं तुला माझी कांदे बटाट्याची चमचमीत भाजी आणि आळूची पातळ भाजी आवडते नं, तोच बेत ठेवलाय” . शोभाताई म्हणाल्या, “पुरी आणि आम्रखंड आहेतच. नॉनव्हेज मधे चिकन करी करावी म्हणते. पण म्हणूनच विचारलं, की हा तुझ्यासाठी बेत झाला, आता तुझ्या नवऱ्याला आणि मुलांना काय आवडेल ते सांग” .

a

“मावशी, फार सुंदर बेत आहे.” ललिता म्हणाली. “माईकलाही आळूची पातळ भाजी फार आवडते. अगदी चाटून पासून खातो तो. त्याच्यासाठी काही वेगळं नको करायला, आणि चिकन करी करण्याचीही काही जरूरी नाही. तेवढाच तुला खटाटोप कमी. आणि मुलांचं जेवण मी आणेन माझ्याबरोबर” .

गोऱ्या अमेरिकन माइकला आळूची पातळ भाजी आवडते आणि तो ती चाटून पुसून खातो, ही कथा नसून परिकथा वाटत होती खरी, पण जेवणाच्या मेनूचा प्रश्न सुटल्याच्या आनंदात शोभाताईंनी तिकडे दुर्लक्ष केले.

इकडे रमेश मात्र स्वस्थ बसले नाहीत. हे गोरे अमेरिकन काय खातात या विषयावर, सकाळ संध्याकाळ पार्कमध्ये भेटणाऱ्या मित्रवर्गाशी त्यांनी चर्चासत्र चालू केले होते. या विषयावर बहुतेकाना पुस्तकी आणि फिल्मी ज्ञान होते. विश्वासार्ह माहिती कोणाकडेही नव्हती आणि प्रांजलपणे सर्वजण ते कबूल करतही होते. बहुतेक मित्रांनी आवर्जून याबाबतीत सद्य काळातला तज्ञ म्हणून मनू पाटकरकडे बोट दाखवलं, कारण मागच्याच वर्षी मनू ह्यूस्टन, टेक्सास मधे त्याच्या भाचीचे लग्न अटेंड करून आला होता आणि पार्कमध्ये तिथल्या सुरस कथा अजूनही सांगितल्या जात होत्या, ऐकल्या जात होत्या.

रमेशला पाहिल्यावर मनू पाटकर तोंड भरून हसला. “या , या रमेश, बऱ्याच दिवसांनी आलात या बाजूला” . पाटकराने रमेशचं स्वागत केलं. सुरुवातीचे नमस्कार चमत्कार झाल्यावर रमेशनी सरळ विषयालाच हात घातला” .

a

“पाटकर साहेब, ह्यूस्टनमधल्या तुमच्या भाचीच्या लग्नाला गोरे अमेरिकन लोक आले होते का हो?” रमेशनी विचारलं.

“अहो, म्हणजे विचारतां काय?” पाटकर म्हणाला, “निम्मे लोक गोरे होते आणि निम्मे होते आपले देशी. अहो नवरा मुलगा गोरा होता नं. काही फार मोठा जमाव नव्हता, असतील सगळे मिळून शंभर सवाशे लोक. नाही, म्हणजे आपल्या कडच्या मानाने क्षुल्लक की हो! पुण्याला आमच्या कुसुमच्या लग्नाला बघा, सातशे आठशे लोकं जेवून गेली. पण अमेरिकेतली शिस्त अगदी झकास हो. प्रत्येक निमंत्रित कुटुंबाचं टेबल राखून ठेवलेलं, त्यावर त्यांची नेम प्लेट. सर्व निमंत्रितानी आपापल्या नेमून दिलेल्या टेबलावर बसायचं. आपल्या कडच्यासारखं घोळक्या घोळक्याने गप्पा मारत हॉलभर विखरून अजिबात उभं नाही रहायचं” .

“चांगली गोष्ट आहे” , रमेश म्हणाले, “पण जेवणाचं काय? अर्धे अधिक गोरे लोक म्हटल्यावर तुम्हाला दिसलं असेल नं ते लोक काय खातात ते!”

“बुफे जेवणाचा तीन टेबलांचा स्प्रेड होता बघा, “पाटकरांनी माहिती पुरवली. “एक टेबल भारतीय जेवणाचं. त्यात चिकन करी, पुलाव राईस, कोफ्ता करी, पनीर बटर, रायतं एव्हढं होतं. दुसरं टेबल मेक्सिकन - इटालियन जेवणाचं होतं. तिथे वेगवेगळया प्रकारच्या सॉस मधले पास्ता होते, वेगवेगळे मिनि पिझ्झा, नूडल्स होते आणि व्हेज रिसोटो सुध्दा होता. आपले बरेच लोक त्या टेबलावर सुध्दा गर्दी करून होते.”

“वा:, फारच छान,” रमेश म्हणाले. त्यांची खात्री पटली , की आपण अगदी योग्य ठिकाणी आलोय. आणि पुढे त्यांनी विचारलं, “आणि पाटकर साहेब, गोरे

अमेरिकन गेस्ट काय खात होते. भारतीय, इटालियन जेवण्याच्या टेबलावर त्यांनीही गर्दी केली होती का?"

"नाही हो, अगदी तुरळक." पाटकर म्हणाले "बहुतेक गोरे अमेरिकन गेस्ट, ते कॉन्टिनेन्टल, अमेरिकन जेवणाचं टेबल होतं नं, त्याच्या भोवतीच गर्दी करून होते."

"काय जेवण्याच्या डिशेस होत्या तिथे, आणि गोरे गेस्ट कशा कशाला जास्त प्राधान्य देत होते" ? रमेश नी टु द पॉइंट प्रश्न टाकला.

"ते काही कळलं नाही बुवा, फार गर्दी होती तिथे त्या लोकांची. त्यामुळे नीट काही दिसलं नाही बुवा." पाटकरांनी त्यांच्याकडून एवढी मोलाची बातमी दिली.

रमेश बाकावरून उठले आणि पाटकरांचे आभार मानण्याचे औचित्यही न दाखवता पाठ फिरवून चालू लागले.

दुसऱ्या दिवशी सकाळी चहा पिता पिता रमेशना आठवण झाली ललिताच्या बाबांची, केशवची. जावयाच्या खाण्यापिण्याच्या सवयींबद्दल त्यांना खचितच माहिती असणार. त्यांना सांगलीला फोन करायला पाहिजे. पण रमेश थांबले. चांगला अर्धा तास जाऊ दिला. आठ वाजले तेव्हा त्यांची खात्री झाली की सांगलीला आता उठायची वेळ झाली, त्यांनी केशवना फोन लावला.

ललीताचे वडील केशव म्हणजे महा संशयी आत्मा. सगळ्याच गोष्टींचा त्याना संशय. रमेशची ओळख पटवून घेण्यातच पहिली पाच मिनिटे गेली. नंतर

a

रमेशने त्यांना सांगितलं की फोन करण्याचं मुख्य कारण म्हणजे ललिताच्या नवऱ्याच्या, माईकच्या जेवणातल्या आवडी निवडींबद्दल विचारायचे होतं.

त्यावर ललिताच्या बाबांचा प्रश्न, “तुम्ही ते का विचारतांय?” जागृत संशयात्म्याचा रोखठोक प्रश्न. त्यावर त्यांची खात्री पटवण्यात रमेशची दहा मिनिटे गेली, की आमच्या मनात काही वाइट हेतू नाही, त्यांना आवडीच्या पदार्थांचं जेवण आमच्या घरी करून घालता यावं या सद्हेतूनेच आम्ही ही विचारणा करत आहोत.

बाबांचं समाधान झालं. त्यानी पळभर विचार केला आणि मग घसा खांकरला. रमेश जीव ओतून ऐकू लागले. केशव म्हणाले, “आम्ही दोनदा गेलो होतो अमेरिकेला ललिताकडे, पण ती दोघं फारच बिझी हो! माईकचं तर चीन, भारत वगैरे लांबलांब देशांत विखुरलेल्या लोकांशी रात्री उशिरापर्यंत बोलणं चालायचं. त्यामुळे, ब्रेकफास्ट, लंच, डिनर यांचं आमचं वेळापत्रक कधी जुळलंच नाही त्याच्याशी. म्हणून झालंय काय, त्याच्या खाण्यापिण्याच्या आवडी निवडींबद्दल आम्हाला काहींच माहिती नाही. खरं तर आम्ही कधी त्याचा विचारच केला नाही. तुम्ही त्यापेक्षा असं करा, ललिताला विचारा. ती बरोबर सांगेल तुम्हाला.” रमेशनी आभार मानले आणि फोन खाली ठेवला.

“बॅक टु स्क्वेअर वन, पृथ्वी गोल आहे” . रमेश स्वत:शीच पुटपुटले.

दोन्ही हातात डोकं धरून रमेश बसले होते. शोभाताई ट्रेमधे दोन कप चहा घेउन आल्या. चहा घेता घेता शोभाताई म्हणाल्या, “अहो कशाला उगीच धावपळ करताय? ललिता कशाला चुकीचं सांगेल आपल्याला?”

पण आळूची पातळ भाजी बोटं चाटून खाणारा गोरा अमेरिकन काही त्यांच्या पचनी पडत नव्हता.

रमेश विचार करू लागले, आणखी काही मार्ग आहे का, ते शोधू लागले. हॉलिवूडच्या पिक्चरमधे तर सदैव फक्त गोरे असतात नाहीतर काळे. ते तर चुइंगम चघळत असतात नाहीतर बर्गर, हॉटडॉग, सब वे सॅंडविच असं काही बाही खात असतात. पण आपणही नाही का, बाहेर वडा पाव, मेदू वडा खातो. याचा अर्थ असा नाही की घरी जेवताना तेच पदार्थ आपल्या जेवणात असतात!

विचार करून थकल्यावर रमेशनी शेवटी श्रीगणेशाला हात जोडले. "तूच तार रे देवा भगवंता" !

आणि मग तो शुक्रवार आला. ललिता आणि मुलं टॅक्सींने सकाळी आले. वाटेत माइक गोरेगावला एक्झिबीशन सेंटरवरच उतरला आणि हे लोक पुढे कांदिवलीला आले. नाही म्हटलं तरी दहा वाजलेच पोहोचता पोहोचता.

मुलं प्रथम जरा बुजली पण मग हातात आय पॅड आणि मोबाईल मिळाल्यावर त्यातच हरवून गेली.

ललीताच्या आणि मावशीच्या गप्पा सुरू झाल्या. अगणित विषय, वेगवेगळे कालखंड. सुखाचे क्षण, गमतीदार प्रसंग सगळ्याची उजळणी झाली.

साडे बाराची वेळ. ललिताने मुलांना जेवायला बोलावलं. त्यांच्यासाठी पॅनकेक्स, चीज टोस्ट असं साधं जेवण ललिताने आणलं होतं. सुरुवातीला मुलांनी

a

फ्राइज दे, मिनि बर्गर दे वगैरे मागण्या केल्या, पण ललिताने त्यांना हसत खेळत खाऊ घातलं आणि पोटं भरल्यानंतर मुलेही शांत झाली आणि मग झोपायला गेली.

सकाळपासून रमेशना आजचं जेवण सुरळीत पार पडेल की नाही याची धाकधुक वाटत होती. शोभा ताईंचा आपल्या भाचीवर पूर्ण विश्वास असल्याकारणाने आपला आळूची भाजी, बटाट्याची भाजी मेनू गोऱ्या साहेबाला खरच चालेल की नाही याचा त्यांनी विचारही केला नाही.

मनात चाललेल्या धाकधुकीचा मान ठेवून रमेशनी त्यांच्या ड्रायव्हरला दीड- पावणे दोन च्या सुमारास एक स्पाइसी चिकन बर्गर आणि एक पेपरोनी पिझ्झा घेऊन यायची सूचना दिली.

दुपारचा एक वाजून गेला. दारावरची बेल वाजली आणि माईक आला. ललिता, शोभाताई, रमेश सगळेच बाहेर आले. ललिताने औपचारिक ओळख करून दिली. दिलखुलासपणे हसत माईकने रमेशशी हस्तांदोलन केलं आणि शोभाताईंना नमस्ते केलं.

प्रथमदर्शनीच रमेशना माईक खूप आवडला. त्याचं मोकळेपणाने बोलणं, वागणं पाहून रमेशना मनात वाटायला लागलं की कदाचित असेलही बुवा हा आळूची भाजी आनंदाने खाणारा गोरा इसम.

“या , बसा” झाल्यानंतर माईक आणि रमेश सोफ्यावर टेकतायत न टेकतायत तोच, ललिताने जरासं अधिकारवाणीनेच सुचवलं की उशीर फार झालाय, आता सरळ जेवायलाच बसू.

रमेशचा चिल्ड बियर वगैरे विचारायचा बेत होता पण ललिताचा एकंदर अविर्भाव पाहून त्यांनी तोंड उघडलं नाही.

मंडळी डायनिंग टेबलावर आली. शोभाताईंनी सगळी भांडी मधे आणून ठेवली होतीच.

“हाऊ डिड द सेमिनार गो? सेमिनार कसा काय झाला?” रमेशनी एक औपचारिक प्रश्न फेकला.

“ओह, वंडरफुल” . माईकची प्रतिक्रिया. “आणि माझ्या दृष्टीने अत्यंत समाधानाची गोष्ट म्हणजे माझं भाषण उपस्थितांना फार आवडलं.”

वाढून घेणे चालूच होते. आळूची भाजी, बटाट्याची भाजी, आम्रखंड, टोमॅटोची कोशिंबीर सगळं वाढून घेतलं गेलं. पुऱ्या आल्या.

ललिताने पुरी- आळूची भाजी, पुरी - बटाटा भाजी, पुरी -आम्रखंड असा चौफेर हल्ला सुरू केला. माईकने आणखी काही येतंय का म्हणून दोन मिनिटे वाट पाहिली. नंतर त्यानेही एक पुरी उचलली, फोडली, चमच्याने तिच्यात आम्रखंड ओतलं आणि थोडी थोडी खायला घेतली. कोशिंबिरीचा छोटा घास घेतला. भाज्यांना काही तो हात लावेना.

ललिताचं भाज्यांचं वारेमाप कौतुक चाललं होतं. “वा: मावशी, आळूच्या भाजीला आणि कांदेबटाट्याच्या भाजीला अगदी एकशे एक मार्क. काय चव आहे!” आणि पुढे माईक कडे वळून, अमेरिकन भाषेमध्ये, “माईक, अरे तुला वाढलेली आळूची भाजी अजुन चाखलेलीही दिसत नाही. तुला आवडतेना? मागच्या आठवड्यात रेखा दळवी कडे नाही का तू अगदी कौतुक करत आळूची

a

भाजी खाल्ली होतीस, आणि त्यानंतर पूजा सावंतकडे तशीच बटाट्याची भाजीही कौतुक करत करत खाल्ली होतीस.”

माईकने नजर वर केली आणि ललिताच्या नजरेला नजर मिळवत तो उद्गारला, “ओह, कमॉन ललिता, कम आउट ऑफ इट. दोन्ही ठिकाणी परिस्थिती काय होती आणि त्या तुझ्या दोन्ही मेत्रिणींच्या होला हो म्हणण्याची काय जरूरी होती, हे तुला चांगलंच माहिती आहे” .

रमेश आणि शोभाताई चपापले. दोघांनीही अर्थपूर्ण नजरेने एकमेकांकडे पाहिलं. त्यांच्या ताबडतोब लक्षात आलं, की हे प्रकरण साधं नाही. अमेरिकन भूमीवरचे युध्द अकारणच भारतात खेळले जात असल्याचं स्पष्ट दिसत होतं. तोफा डागल्या जात होत्या. कोणत्याही प्रकारे त्यात मधे पडण्याने आगीत तेल आणखीच ओतलं जाण्याची शक्यता होती. हवेत तणाव खूपच वाढला होता. भुकेल्या पोटी अशा कुरबुरी निश्चित धोकादायक. हलक्या कुरबुरीतून वाद कधीही वादळी स्वरूप धारण करण्याची भीती होती. हा वाद विझवायला हवा.

आणि तो बर्गर -पिझ्झा दीड वाजता आणायला सांगितलेला ड्रायव्हर कुठे होता?

तेवढ्यात दारावरची बेल वाजली. “आला, आला” असे मनात म्हणत रमेश उठले आणि लगबगीने जाऊन त्यांनी दरवाजा उघडला. बघतात तर बाहेर एक सुटा बुटातला तरूण इसम उभा होता आणि त्याच्या मागेच दोन जड पिशव्या हातात घेऊन त्याचा असिस्टंट होता.

a

“माइक ब्राउन इथे आलेत काय?” त्या तरुणाने विचारले. आपले नाव उच्चारलेले ऐकताच, माइक डायनिंग टेबलवरून उठला आणि , “येस, हू इज इट?” असे म्हणत बाहेर आला.

नवागत तरुण माइकला पाहुन आनंदीत झाला. “हॅलो सर” .

माइक म्हणाला, “आह, विकी, हाऊ आर यू” ? रमेशशी विकीची ओळख करून देत माइक पुढे म्हणाला, “रमेश, हा विकी, म्हणजे विक्रम. आमच्या सौर ऊर्जा कॅान्फरन्सचा उत्साही कार्यकर्ता.”

“काही काम आहे का विकी?” माईकने विचारलं.

“यस सर, तुम्ही इतकं सुंदर मार्गदर्शन केलत पण न जेवताच निघुन गेलात. ऑल ऑफ अस वेअर व्हेरी अपसेट सर.” विक्रम म्हणाला, “म्हणुन कार्याध्यक्षांच्या आदेशानुसार तुमच्यासाठी फुड पॅक करून आणलंय. सर यात चिकन बिऱ्याणी आहे, चिकन टिका आहे, सर्व कमी तिखट, आल्फ्रेडो सॉस मधला पास्ता आहे, रशियन सॅलड आहे आणि थोडे मिक्स पकोडे आहेत. सगळ्याची मी डबल हेल्पिंग आणली आहेत म्हणजे तुमच्या मिसेस तुम्हाला जॅाइन होऊ शकतील. गुड डे टु यू सर”

“थॅंक यू विकी, आय ॲप्रिशियेट ऑल दॅट यू हॅव डन.” माइकने तोंडभरून हसून आभार मानले. सामान ठेवून विक्रम निघून गेला.

भारतातल्या सौर उर्जेच्या कार्यकारी मंडळांचे आपल्या नवऱ्यावरील प्रेम पाहून ललिताला सद्गदित व्हायला झालं. भारताने माईकचं कौतुक केल्याचा अभिमान वाटला. रमेश आणि शोभाताईही खूपच प्रभावित झाले होते.

पाच एक मिनिटे अशीच गेली. मग सर्वजण भानावर आले. ललिताने आणि शोभाताईनी परिस्थितीचा ताबा घेतला आणि गरम करायला नेण्यासाठी त्या डबे एकत्रित करू लागल्या.

माइक सोफ्यावर एकदम रिलॅक्स्ड होऊन पहुडला.

रमेशना काहीच सुचत नव्हते. इतक्यात दरवाजाची बेल परत वाजली. हातात पिशवी घेऊन ड्रायव्हर उभा होता. "बर्गर आणि पेपरोनी पिझ्झा सर" इतके बोलून त्याने पिशवी पुढे केली.

माइकच्या तोंडावरचं हसू जास्तच फुललं. वातावरणातला तणाव पूर्णपणे निवळला होता.

"काय चिल्ड बियर घेणार का", रमेशने माइकला विचारलं.

"या, या, दॅट विल गो वेल विथ ऑल धिस" . माइकने खुशीत होकार दिला.

बियरचा भरलेला ग्लास वर उचलून माइकने केले "चियर्स"


रमेश म्हणाले, "सौर ऊर्जेचा उदे उदे" , आणि सर्वांनीच त्याना साथ दिली. "उदे, उदे" .


अळूच्या पातळ भाजीवरून अमेरिकेत सुरू झालेले युद्ध आता संपले होते.


———-x———

a

श्री सुधीर कारखानीस यांची या पूर्वीची तीन पुस्तके. क्लिक करताच उघडतील.



# ई साहित्य प्रतिष्ठानचे सोळा वर्षाचे होत आहे.

# श्री. सुधीर कारखानीस यांचे हे ई साहित्यवरील चवथे पुस्तक.

श्री सुधीर कारखानीस हे एक ज्येष्ठ इंजिनियर व तंत्रज्ञ आहेत. त्यांची यापूर्वी तंत्रज्ञानावरील पुस्तके प्रकाशित झाली आहेत तसेच दोन कथासंग्रहही आहेत. त्यांच्या पुस्तकांना प्रकाशक मिळणे कठीण नाही. पण त्यांनी आर्थिक फ़ायदा मिळवण्याऐवजी आपले पुस्तक ई साहित्य तर्फ़े वाचकांना विनामूल्य देणे पसंत केले. सुधीरजींनी आपल्या आयुष्यात अनेकदा आणि बराच काळ विदेशात व त्यातही प्रगत देशांत व्यतीत केला आहे. आणि त्यांच्या कथांतून तेथील जीवन आणि भारतातले जीवन यांच्या तुलना येत असतात. या कथा स्वानुभवातून आलेल्या असल्याने त्या वास्तवाच्या जवळच्या आहेत आणि त्यातून दोन्ही जगांच्या ऋण आणि धन बाजू समजतात.

श्री सुधीर कारखानीस यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (५१ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस

a

आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३९), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (८), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (४), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (९), पांडुरंग सूर्यवंशी (३), सुधीर कारखानीस (4), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (२), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात

a

ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।